
# पाच

# एकांकिका

## महोत्सव



नथुराम परत आलाय  ऑपरेशन सक्सेस परप्रांतीय मैत्रिण झिंदाबाद


**लेखक**

संदीप  शांताराम  सुर्वे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदीप शांताराम सुर्वे

लिखित

# पाच

# एकांकिका

## महोत्सव

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

पाच एकांकिका महोत्सव (पाच एकांकिका)

संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359 किंवा 9324466129

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : 30 जानेवारी 2019

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## एकांकिका परिचय

# नथुराम परत आलाय
# ऑपरेशन सक्सेस
# परप्रांतीय
# मैत्रिण
# झिंदाबाद



# मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी ज्वलंत, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **"यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना."**

एकांकिका व नाटक लिहिताना आणि ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **"माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी..."** म्हणूनच हे पुस्तकपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

# <u>ओळख</u>



**संदीप शांताराम सुर्वे.**

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद मिळते आणि मग

अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या अनेक नाटक, मालिका तसेच चित्रपटामधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेशजी वाडकर, सुदेशजी भोसले, साधना सरगम, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

# नथुराम परत आलाय



( काळोख . गोंधळ.. घोषणा...)

घोषणा : नथुराम गोडसे अमर रहे. देश का सपूत कैसा हो नथुराम गोडसे जैसा हो...

टीव्ही : संपूर्ण शहर पेटून उठलंय. सगळीकडे एकच चर्चा .. एकच वाद.. ज्याने राष्ट्रपित्याची हत्या केली त्याच्या नावाने जयंती साजरी करायची का? आणि आज याच चर्चेसाठी आपण आपल्या स्टुडीओमध्ये आमंत्रित केले आहे आपल्या देशातील काही महत्वाच्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना... सोबत आहेत... ( टीव्हीचा आवाज कमी होत जातो .)

घोषणा : नथुराम गोडसे अमर रहे. देश का सपूत कैसा हो नथुराम गोडसे जैसा हो...

## घर

(प्रकाश... बाप पेपर वाचतोय... आई चहा घेवून येते.)

बाप : काय चाललंय देशात कळायलाच मार्ग नाही. हातात पेपर धरावासाच वाटत नाही.

आई : चहा प्या. गरम आहे. थंड झाला कि पुन्हा गरम करून आण म्हणाल.

बाप : तुम्हा बायकांना वेळेचं काही गांभीर्यच नसतं. विषय काय आणि तुला चहा महत्वाचा वाटतोय.

आई : मग नाही पिणार का चहा? घेवून जावू का?

बाप : अगं..

आई : सकाळी पेपर हातात पडला रे पडला कि सगळे लगेच तत्वज्ञांनी होतात. ( तो चहा पिऊ लागतो.) पेपर हातात धरावासा वाटत नाही म्हणत चार तास पेपर मधेच घुसून राहायचं. काल टीव्हीवर पाहिलेल्या बातम्याच आज पुन्हा पेपरात चवीने वाचायच्या.

बाप : कालची शिळी चपाती आज खाकरा म्हणून खाता ना?

आई : या महागाईत ती फेकून द्यायची हिम्मत होत नाही हो. देश बदलतायत. आधी घर बदला... घरामध्ये सुख येईल तेव्हा आपोआप देश सुखी होईल.. ( ती चहाचा कप घेवून जाते.)

बाप : मुद्द्याचं बोलून गेली. आपण बदललो तरच देश बदलेल. ( पेपर वाचू लागतो आणि मुलगा येतो.)

राम : बाबा आई कुठेय ? ( बाप पेपरमधून मान बाहेर काढतो.)

बाप : चिरंजीव आले. रात्री कुठे होता आपण ?

राम : मित्राकडे होतो सिद्धांतकडे. प्रोजेक्ट पूर्ण करताना वेळ झाला. मी आंघोळीला चाललोय. मला लगेच निघायचंय. आणि हो तुम्ही दोघे आज घराबाहेर पडू नका. माजी मंत्र्याचा खून झालाय.

बाप : काय ? पेपरमध्ये बातमी नाहीये.

राम : बाबा, लाइव्ह न्यूजसाठी टीव्ही बघा ना. ( तो आंघोळीला जातो. बाप घाई घाईने टीव्ही लावतो.)

टीव्ही : आपण पाहताय ती दृश्य अंगावर शहारा आणणारी आहेत. सगळीकडे फक्त रक्तच पसरलेलं दिसतंय. सर्व दृश्य आम्ही आपणास दाखवू शकत नाही परंतु आज सकाळी म्हणजे फक्त काही मिनिटांपूर्वी आपले माजी मंत्री मॉर्निंग वॉकसाठी निघाले होते आणि त्यांचा अतिशय निर्घुणपणे खून करण्यात आलेला आहे. तुम्ही

पाहताय पोलिस या ठिकाणी पोहोचलेले आहेत. सगळया बाजूनी हा रस्ता रहदारीसाठी बंद करण्यात आलेला आहे. ( आई येऊन टीव्ही पाहत उभी राहते.)

बाप : ( टीव्हीचा आवाज कमी करीत ) भर दिवसा खून तोही भर रस्त्यात. असं व्हायला नको होतं.

आई : सोळाशे करोडचा भ्रष्ट्राचार केला होता त्याने. बातम्या पाहताना तुम्ही..? पेपर वाचताना ? पापाचा घडा भरला कि धडा मिळतोच.

बाप : मेलेल्या व्यक्तीबद्दल असं बोलू नये. आणि जर भ्रष्ट्राचार केला होता तर शिक्षा द्यायला कोर्ट आहे ना ? कायदा हातात घेणे किती बरोबर आहे ? अश्याने चुकीचा संदेश पोहोचतो तरुणाईत. बापूंनी अहिंसेच्या जोरावर स्वातंत्र्य मिळविलं. अहिंसेतही ताकद असते. जोर असतो ते बापूंनी अख्खा जगाला दाखवून दिलं.

राम : ( शर्टची बटन लावीत येतो.) फक्त अहिंसेवर स्वातंत्र मिळालं नव्हतं आपल्याला. सावरकर, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, अश्फ़कुल्ला खान , बिस्मिल, धिंग्रा... अनेकांनी बलिदान दिलं या देशासाठी. तेव्हा स्वतंत्र झालो आपण. ७० वर्षापूर्वी स्वातंत्र्याची लढाई संपली असं प्रत्येकाला वाटलं होतं. मृगजळ... (

हलकेच हसतो.) गेलेली वेळ पुन्हा येत नाही असं म्हणतात पण पृथ्वी गोल आहे.. काही वेळा काळ पुन्हा येतो... इंग्रजांनी देशाला लुटलं.. आता भारतीयच लुटत आहेत. पण तो परत आलाय. आता तोच पुन्हा क्रांती घडवेल. ( राम निघुन जातो. आई बाप एकमेकांकडे पाहू लागतात. टीव्हीचा आवाज वाढवितो.)

टीव्ही : **"नथुराम परत आलाय."** हो.. हि पहा हि काही पत्रके सापडली आहेत. पोलीस तपास सुरु झालाय. इतकं मात्र निश्चित कि या हत्येला आता एक वेगळं वळण दिसू लागलाय. (काळोख.)

## प्रेस कॉन्फ्रेंस

( प्रेस कॉन्फ्रेंस सुरु आहे.)

मुख्यमंत्री : जी घटना घडली आहे ती अत्यंत चुकीची आहे. आम्ही सारे त्याचा निषेध करतो. पोलिस तपास सुरु आहे. बाकी माहिती योग्य वेळी आपणाला दिली जाईल.

पत्रकार१: ' नथुराम परत आलाय ' या पत्रकावर आपण काय म्हणाल सर ?

मुख्यमंत्री : यावर आता काही भाष्य करणं योग्य ठरणार नाही. पोलिस तपासात सारं काही जनतेसमोर येईल.

पत्रकार२: पण सोळाशे करोडचा भ्रष्ट्राचार होता सर त्यांच्या नावावर ? खून केल्यानंतर ' नथुराम परत आलाय ' हि पत्रके उडविली गेली. देशाला पुन्हा एकदा स्वातंत्र्य हवंय..? देश भ्रष्ट्राचार मुक्त करायचाय ..? अश्या आशयाची वाक्य काय सुचवितात सर? आपल्या देशात पुन्हा एकदा क्रांतीची नांदी वाजू लागलेय का...? ( मुख्यमंत्री अस्वस्थ आहेत. )

मुख्यमंत्री : मी इतकंच सांगू इच्छितो कि , हा मार्ग नव्हे . देश निश्चित बदलेल. कुणी चुकी केली असेल. करीत असेल तर कायदा आहे. न्यायदेवता आहे. तिच्यावर विश्वास ठेवा.

पत्रकार३: त्याच कायद्यावर गेली सत्तर वर्ष विश्वास ठेवून आहेत सारे जण. असाच सौम्य विचार सगळे करून बसले असते तर हजार वर्षात स्वातंत्र मिळाले नसते. नथुराम क्रांती करण्यासाठी आलाय का? आपलं काय मत आहे यावर.

मुख्यमंत्री : पहिलं सांगायचं तर नथुराम आणि क्रांतीचा संबंध लावलात तर अजून देशात गोंधळ निर्माण होईल. आपल्या देशात नथुरामला योग्य समजणारे जितके तितकेच त्याला चुकीचे समजणारे. त्यांचे गांधी हत्येचे

कृत्य बहुतेकांना न पटलेले. त्यामुळे गांधी हत्या आणि नथुराम क्रांती अशी विधाने करू नका. आपण सारे सुज्ञ आहात. मिडियाने कोणतेही वक्तव्य करताना पूर्ण विचार पूर्वक केले पाहिजे. चुकीच्या वक्तव्याने तुमचा टी आर पी वाढेल पण देशात जी आग पेटेल त्यात सर्व सामन्याचा बळी जाईल. गंमत म्हणून, सुट्टी मिळेल म्हणून, आपल्या पक्षश्रेष्ठींचे लक्ष आपल्यावर यावे म्हणून आंदोलने करणारे भरपूर आहेत. पण त्यांच्या कितीतरी पटीने जास्त पोटाची, कुटुंबांची चिंता असलेले आहेत. जे घडले त्याचा छडा आपण नक्की लावण्याचा प्रयत्न करू. पण पुढे जो वणवा पेटण्याची चिन्हे दिसत आहेत ती आधी थांबायला पाहू. म्हणून माझी आपणा सर्वांना हात जोडून नम्र विनंती आहे कि मिडियाने, तज्ञ मंडळीनी, राजकीय नेत्यांनी विचारपूर्वक आपली मते मांडावीत. आधीच देश होरपळत आला आहे. त्याला अजून होरपळत ठेवणे चांगले नाही. आपण सारे एकत्र येवून भ्रष्टाचार, अत्याचार, महागाई सगळ्याचा सामना करू. नमस्कार ( मुख्यमंत्री  उठून निघतात.)

पत्रकार१: सगळ्याचा सामना करू?  (कुत्सितपणे हसतो .) तो परत आलाय. आता तोच पुन्हा क्रांती घडवेल. ( त्याचा चेहरा बदलतो.) “नथुराम परत आलाय.”  ( काळोख)

**बस स्टॉप**

(कॉलेज विध्यार्थी बसची वाट पाहत आहेत.)

मुलगी १: आई आज कॉलेजला पाठवतच नव्हती. किती वाईट पद्दतीने मारलं गं.

मुलगी२: हो ना. काय मिळतं गं या लोकांना असं एखाद्याला मारून?

राम : ( तिथे येतो) समाधान. देशासाठी काहीतरी केल्याचं समाधान. सोळाशे करोडचा भ्रष्ट्राचार लहान गोष्ट नाहीये. असेचं हजारो लाखो करोडो रुपयांचे भ्रष्ट्राचार होतात. आपण कमावलेल्या.. आपल्या मेहनतीच्या पैशातून. टॅक्स आपण भरतो आणि तिजोऱ्या यांच्या भरतात.

मुलगी १ : राम, अरे पण असं....?

राम : इतिहास सांगतो... जेव्हा अन्याय वाढला तेव्हा न्याय करणारा कुणीतरी आलाच.

मुलगी २ : पण कुणाचा खून करून..

राम : वध. खून हा शब्दप्रयोग योग्य नाही यासाठी. मातला रावण त्याने उपद्रव केला.. रामाने रावणाचा वध केला... कृष्णाने कंसाचा... आपले सैनिक देशाच्या सीमेवर

शत्रूचा वध करतात. आणि काही शत्रू जे देशात निर्माण होऊ पाहतात त्यांचा वेळीच वध नाही केला तर एकसुराने हि असुरनगरी होईल. कोण मित्र कधी शत्रू म्हणून समोर येईल ते कळणारच नाही. वेळ काळाचं भान आपण ठेवलं नाही तर... तर तुमची बस आली बघा.. जा पकडा बस.. ( बस थांबल्याचा आवाज. मुली विंगेत धावत जातात.) बसही बस स्टॉप वर थांबत नाही कधी आपल्या देशात. शिस्त लागेल का कधी आपल्या देशाला ? ( बस निघून गेल्याचा आवाज.) शिस्त लावली कि आपोआप लागते. ( मोटार सायकलचा थांबल्याचा आवाज.. हॉर्न ) पुन्हा क्रांतीची गरज आहे. आणि ती होणारच... ( त्याचा चेहरा बदलतो.) “नथुराम परत आलाय.”

आवाज : राम चल ये लवकर. ( तो जातो. मोटर सायकल निघून गेल्याचा आवाज येतो.)

**घर**

टीव्ही : नेत्याच्या हत्येनंतर त्यांच्या पक्ष कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी तोडफोड , जाळपोळ सुरु केली आहे. ( हळू हळू प्रकाश येतो. आई, बाप, लेखक मित्र टिव्ही पाहत चहा पीत आहेत. ती टिव्हीचा आवाज कमी करते.)

आई : काहीतरी लिहा भाऊजी तुम्ही. हे लोक पैसे खाणार देशाचं वाटोळं करणार आणि पुन्हा यांची माणसं सरकारी वस्तूंची नासाडी करणार. असं काही लिहा ना कि खरंच क्रांती निर्माण झाली पाहिजे.

बाप : मायलेक नेहमीच आपली टोकाची भूमिका घेतात. जरा काही झालं कि लगेच असं केलं पाहिजे तसं केलं पाहिजे. इतकं सोप्प असतं का ते? जा स्वयंपाकाचं बघा. आपल्या तिघांचाच करा. नाहीतर विसरून जाल. राम त्याच्या मित्राकडेच थांबणार आहे. फोन आला होता. लक्षात आहे ना ? ( ती जाते.) बातमी.. बातमी म्हणून पाहायची.. इतकं लगेच टोकाला जाण्यात काय अर्थ.

लेखक: याच विचाराने देशाची अधोगती झाली मनोहर. काय मिळवलं रे आपण स्वातंत्र मिळवून ? इंग्रज हुकूमत होती पण रस्ते पक्के होते.. वर्षानुवर्ष चालायचे. स्वच्छ पाणी होतं. शिक्षणाच्या सुविधा खूप चांगल्या होत्या. गुन्हेगारांना कठोर शासन होतं. आपण या गोष्टीवर कधी बोलतच नाही बघ.

गेली अनेक वर्ष रस्त्याच्या कामात भ्रष्ट्राचार होतोय... रस्ता बनविला नाही कि महिन्याभरात खड्डे आहेतच.. पण आपण गप्प..प्यायला, शेतीला पाणी नाही...

तरीही.. आपला नेता येणार तेव्हा मर्दुमकी दाखवायला रस्ते धुवायला कित्तेक लिटर पाणी बरबाद केलं जातं. पण आपण गप्प.. सरकारी शाळांची अवस्था बघ. कोणत्याही सरकारी ऑफिसमध्ये लाच दिल्याशिवाय तुझं कामच होत नाही. आपल्याच पैशातून ज्यांना पगार मिळतो ते हक्काने तोंड वर करून आपल्याकडेच पैशाची मागणी करतात. पण आपण गप्प.. नाही म्हणता ७० वर्ष झाली भारत स्वतंत्र होवून. अजून आपल्याला आपल्या मुलभूत सुविधा मिळू नयेत. तुटपुंज्या पगारात घर चालवताना कंबरड मोडतं सर्वसामान्यांच पण तरीही त्यांच्या चितेवर पोळी भाजून मिटक्या मारणारे आपलेच. मराठीचा टेंभा मिरवीत.. मराठी माणसाकडून हक्काने कमिशन खाणारे सरकारी कर्मचारी असोत कि राजकीय नेते. माजलेल्या हत्तीसारखेच खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे. पण आपण गप्प..

कधी कधीना मला खूप गम्मत वाटते बघ मनोहर. म्हणजे बघ ना गेली कित्तेक वर्ष आपण रोड टॅक्स भरतो पण चांगल्या रोडची सुविधा नाही. नवीन ब्रिज बनतात आणि अगदी ब्रिजवर सुद्धा खड्डे पडतात. आपण वॉटर टॅक्स भरतो पण लागणारं पाणी नाही. हेल्थ टॅक्स भरतो पण आजारी पडलो कि आपल्या पैशाने उभारलेल्या सरकारी दवाखान्याकडे सवडीने पाठ फिरवून प्रायव्हेट

दवाखाने पकडतो. सरकारी शाळेमध्ये आपली मुले कधीच शिकत नाहीत आणि आपण शिक्षण कर भरतो. जर प्रत्येक गोष्टीचे टॅक्स आपण भरतो तर त्या सेवा आपण का उपभोगत नाही..? कारण त्या सेवांचा दर्जा आपल्याला योग्य वाटत नाही. आणि तो दर्जा कोणामुळे खालावतो? लक्ष न देणारं सरकार आणि बसून पगार मिळतोय त्याची मजा लुटावी हा विचार करणारा कर्मचारी. सरकारी हॉस्पिटलमध्ये कुत्री मांजरी ऑपरेशन थिएटर पर्यंत मोकाट फिरताना दिसतील. खाजगीमध्ये का नाही दिसत रे. सरकारी दवाखाने, सरकारी शाळा या गरिबांच्या बनवून टाकल्या आपण. मग आपण कोण…? नवश्रीमंत ? अरे सरकारी म्हणजे आपल्याच मालकीच्या ना या सगळया गोष्टी ? मग आपण का वापर करू नये त्यांचा ? पैसे न चुकता भरतो ना आपण. सरकार हक्काने पैसे घेतं मग सुविधा का नाही देत तितक्याच तत्परतेने. आज देश ऑनलाइन झालाय .. पासपोर्ट ऑनलाइन  काढा .. पोलिस वेरीफिकेशनला तुमच्याकडे पैसे मागतात कि नाही बघा..? लाज पण नाही वाटत त्यांना हात पसरायला.. एक नियम करा दुसर्या  बाजूने पैसे कसे काढायचे ते शिकवायची गरज नसते या लाचखोरांना आणि आपण यांचा विचार करतो.

यांच्या कुटुंबाचा विचार करतो कि यांना नागडे केले तर यांच्या कुटुंबावर आत्महत्तेची पाळी येईल. यांना वाचविण्यात आपल्यालाच आत्महत्त्या करावी लागते. शेतकर्याच्या कुटुंबाला विचारा काय काय कारणे आहेत आत्महत्तेची...? मिडिया फक्त एकच दाखवणार पाऊस पडला नाही म्हणून शेतकरी आत्महत्त्या वाढल्या. आणि मेलेल्या प्रेतावर टपलेल्या गिधाडाप्रमाणे लगेच कडक इस्त्रीचे पांढरेशुभ्र कपडे घालून पत्रकारांचा, फोटोग्राफर आणि हुजर्यांचा लवाजमा सोबत घेवून तिथे न चुकता पोहोचणारे आपले राजकीय नेते लगेच सत्ताधारी पक्षाचा राजीनामा मागायला त्याच आत्महत्या केलेल्या बळीराजाच्याच घरी तयार. त्याचं कुटुंब घडलेल्या आक्रिताने उपाशी असेल पण त्यांच्या ओघळणाऱ्या आसवातून आपली मसालेदार आमटी बनवायला विसरले तर मग हे राज्यकर्ते कसले? या मातीतच कीड पोसलेय. कुठपर्यंत जाळायची हि माती ? स्वातंत्र्य फक्त भारताला नाही मिळालं .. खूप लहान मोठे देश हि स्वतंत्र झाले पण त्यांची राजकीय आणि सामाजिक इच्छाशक्ती दांडगी होती म्हणून ते देश खर्या अर्थाने स्वतंत्र झाले आणि आम्ही एकमेकांशी लढत आणि एकमेकांना लढवत बसलोय. आपण फक्त राजकीय नेत्यांना दोष देतो पण त्यांच्या मागे कुत्र्यासारखे लाळ घोटत धावणारे पण आपणच असतो ना. कोण आपल्याला मूर्ख बनवितो आहे.

आपला उपयोग करून घेतो आहे हे जर आपल्याला समजत नसेल तर दुसर्यांना शिव्या देण्याची आपली लायकीच नाही ना. मग घ्या आलिया भोगाशी.. असावे सादर. मूर्ख बनविणाऱ्या नेत्यापासून दूर व्हा. बघा पीछे धोती संभालनेवाला कोई नही ये देख लिया तो एक के पीछे एक सब सुधार जायेंगे. चुकीचे ते नाहीत चुकीचे आपण आहोत. आपण आपला वापर करायला देतो म्हणून ते आपल्याला वापरून घेतात. एक लेखक म्हणून खूप लिहावंसं वाटतं या सगळ्या विषयावर पण शब्द खूप तोकडे पडतात यांच्या नाकर्तेपणासमोर आणि जर का लिहिलं तर ते समाजापर्यंत पोहोचवणार कोण? मिडिया जागृती म्हणजे काय ते केव्हाच विसरून गेलेय. कुणी निर्माते अशा गोष्टीवर पैसे नाही लावत. अरे स्पर्धेत सुद्धा Controversial टॉपिक म्हणून स्क्रिप्ट स्पर्धेतून बाहेर.

मनोहर : खरंच देशाची दुरावस्था झालेय. पुरुष मागे पडत असतील तर स्त्रियांनी पुढाकार घेतला पाहिजे.

लेखक : बायको बोलत होती तुझी आता. तिला बोलू दिलंस? जेवण बनवायला पाठवलंस तिला.

मनोहर : अरे ती घर सांभाळणारी.

लेखक : सावित्रीबाईने पण घर सांभाळून शिक्षणाची ज्योत पेटवली ना ? पण तो काळ वेगळा होता. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, रमाबाई आंबेडकर , झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई आता उरल्याच नाहीत रे. आपली स्त्री शक्ती.. देवळात प्रवेश नाही.. गाभार्यात प्रवेश नाही.. आरक्षण नाही.. हा हक्क नाही.. तो हक्क नाही यातच गुंतलेली. अन्न, वस्त्र, निवारा.. या मुलभूत गरजा. रोड, शिक्षण, हेल्थ या मुलभूत गोष्टी जर नसतील तर जिणे कठीण. यावर बायकांचे त्यांच्या नारी संगठनेचे.. सो कॉल्ड महिला ब्रिगेडचे आंदोलन का होत नाही. राजकीय नेत्यांनी केलेले भ्रष्टाचार दिसत नाहीत त्यांना कि जनतेच्या नजरेतून ते विषय सोयीस्करपणे दूर करण्यासाठी हि रचलेली चाल. केव्हा केव्हा पक्षांची ताकद दाखवायला आंदोलने होतात एक दोन दिवसांसाठी मर्यादित. मग होर्डिंग लावायला मोकळे.. आम्ही आंदोलन केले. स्वातंत्र्याचा लढा दीडशे वर्ष का चालला ? राणी लक्ष्मी बाईने ज्या देवळाचा पाया रचला त्याचा कळस तिला का नाही पाहता आला. लहान लहान मुलांनी आपले शिक्षण, आपला जीव कोणासाठी ओवाळून टाकला ? ( त्याचा चेहरा बदलतो.) पुन्हा

क्रांतीची गरज आहे. आणि ती होणारच... “नथुराम परत आलाय.” ( रिमोट घेवून टीव्हीचा आवाज वाढवितो.)

टीव्ही : ब्रेकिंग न्यूज.. आजची सगळ्यात मोठी न्यूज... एक नवीन पत्रक हातात पडले आहे. त्यात पुढील काही आजी माजी मंत्र्यांच्या नावांची, सरकारी अधिकार्यांच्या नावांची लिस्ट आहे. त्यांच्या नावासमोर त्यांनी केलेल्या घोटाळयांच्या , भ्रष्ट्राचारांची यादी आहे. आणि मोठ्या अक्षरात लिहिले आहे.. ‘ओळखा पाहू आता कोणाचा नंबर...?’ आणि शेवटाला लिहिले आहे.."नथुराम परत आलाय." नक्की हा कोण नथुराम? हे एका व्यक्तीचं काम आहे कि या मागे कोणती एक संस्था आहे...? आज सायंकाळी आपले चर्चासत्र याच विषयावर आधारित असेल. कोण हा नथुराम....? (हळू हळू काळोख )

## कॉलेज आवार

( पथनाट्य सुरु आहे. राम आणि त्याचे मित्र पथनाट्य करीत आहेत.)

झिंदाबाद ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद ...( सारे फेर धरून नाचू लागतात.)

1. आम्ही झिंदाबाद
2. आमचा गाव झिंदाबाद

3. आमचं शहर झिंदाबाद

4. आमचं राज्य झिंदाबाद

5. आमचा देश झिंदाबाद

6. आमचं जग

सारे :- ए…………..(सर्वजण ओरडतात )

1. आपल्या मातीत फक्त आपणच झिंदाबाद

2. हीच आपल्या मातीची शिकवण

3. हीच आपल्या मातीतल्या माणसांची शिकवण

4. हीच या मातीतल्या नेत्यांची शिकवण

5. म्हणूनच तर आमचे नेते झिंदाबाद

सारे :- झिंदाबाद झिंदाबाद ........आमचे नेते झिंदाबाद

1. पाच रुपयाचे तांदूळ पन्नाशीला गेले

2. सत्तावीसचं पेट्रोल सत्तरीला गेले

3. दहाचे वीजबिल हजाराला गेले

4. हजाराची खोली लाखांवर गेली

5. लाखांची लोकसंख्या करोडोंवर गेली

6. करोडोंची जमीन नेत्यांकडे गेली

7. म्हणूनच तर आमचे नेते झिंदाबाद

सारे :- झिंदाबाद झिंदाबाद ........आमचे नेते झिंदाबाद

राम : प्रश्न गांधी हवा कि गोडसे हवा हा नाहीच मुळी. पण प्रश्न चिघळवला नाही तर मग ब्रेकिंग न्यूज कशी होणार? चॅनेलच्या पोटापाण्याचा प्रश्न कसा सुटणार?

सिद्धांत :   राजकीय पक्ष ताकद कशी दाखवणार? पुढच्या इलेक्शनची तय्यारी कशी करणार?

राम :   नाही मिळाले प्रश्न तर प्रश्न निर्माण करणारे तयार होतील.

सिद्धांत :   देशद्रोही, देशप्रेमाच्या नावाखाली चर्चेत तर येतील.

राम :   पण देशाच्या जनतेच्या पैशात फुकट शिक्षण घेणारे देशाविरुद्ध का बोलतात?

सिद्धांत :   कारण त्यांच्या बाजूने नाचायला अनेक बापू डोलतात.

राम :   मग एक दिवस अहंकाराने माजतात हे झंडू बाम

सिद्धांत :   आणि जगण्याचा सिद्धांत दाखवायला येतो मग नथुराम.

( आरडाओरडा ऐकू येवू लागतो. पोलिस येतात लाठीमार करतात. अंधार प्रकाशाचा खेळ.)

## पोलिस स्टेशन

( इन्स्पेक्टर समोर राम व सिद्धांत बसलेले आहेत. )

इन्स्पे :   राम गोडसे, सिद्धांत आपटे. कॉलेज स्टुडंट्स. काय खेळ चालला होता कॉलेज कॅम्पसमध्ये ?

राम : देशातच इतका खेळ मांडला गेलाय कि त्यापुढे आम्ही काय खेळ खेळणार सर. जनजागृती करणारं पथनाट्य सादर करीत होतो सर आम्ही.

सिद्धांत : तेही कॉलेजच्या आवारात.

इन्स्पे : कॉलेजने परवानगी दिली होती?

राम : ( हसतो.) देशविरोधी घोषणा देणारेसुद्धा परवानगी मागत नाहीत हो सर. आम्ही तर जनजागृती करीत होतो.

इन्स्पे : कॉलेज शिकण्यासाठी असतं गोडसे

सिद्धांत : स्वातंत्रपूर्व काळात हेच वाक्य कुणी बोललं असतं तर..? तर..आज आपण स्वतंत्र भारतात जन्म घेतला नसता सर.

इन्स्पे : आपटे, आपल्या देशात काही गोष्टीत मर्यादा या पाळावयाच लागतात.

राम : मर्यादा पाळण्यासाठीच तर आई बापानं आवडीनं राम हे नाव ठेवलंय सर.

इन्स्पे : राम गोडसे, बाळा.. नथुराम गोडसे प्रकरण अजून चिघळतय. मोठमोठ्या नेत्यांचे खून होत आहेत. कुणाला धमक्या येत आहेत आणि पत्रके उडविली जात आहेत.

राम : "नथुराम परत आलाय." ना ?

इन्स्पे : तुमचा त्या गोष्टींशी संबंध आहे?

सिद्धांत : वैचारिक दृष्ट्या पहिलं तर असूही शकतो.

राम : सर आपण मोठे ऑफिसर आहात. गुन्हेगारासमोर कधी कधी कठोर व्हावं लागतं तुम्हाला. राग बाहेर येतो तुमचा. अगदी तसाच या देशात होणार्या बरया वाईट गोष्टींमुळे प्रत्येकाची भावना व्यक्त होते आपापल्या परीने.

इन्स्पे : पुढचा खून कोणाचा करणार आहात ? तुमच्या मागे कोणती संस्था आहे ? तुम्ही वयात येताय. गरम रक्त आहे. पण हा मार्ग चुकीचा आहे. गोडसे, आपटे हा गांधीहत्तेचा काळ नाही.

राम : वध होता तो.. वध. हत्त्या नाही. वैचारिक लढाई होती जिचा अंत वाईट झाला असेल कदाचित.

इन्स्पे: सध्या जे चाललाय ते वैचारिक नाहीये. तुम्ही खून केलात मंत्र्यांचा.

सिद्धांत : हे तुम्हाला कुणी सांगितलं सर ?

इन्स्पे : हि तुमची पथनाट्य. त्यातले तुमचे विचार..

लेखक : ( लेखक येतो.) त्यांचे नाहीत. माझे विचार आहेत ते. सत्यवान सावरकर. या मुलांच्या पथनाट्याचा लेखक. इन्स्पेसाहेब इतक्या वर्षांनी अजूनसुद्धा अगदी सगळे प्रुफ मिळूनही एकच संभ्रम आहे कि गांधीना नक्की गोडसेने मारलं होतं का ? आणि आपण कोणासाठी भांडतो, कोणासाठी लढतो त्याचे दूरगामी परिणाम काय होतात

आपल्याला काहीच माहित नसते. तरीही भांडतो, तरीही लढतो. असं चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आणू नका. आज सगळीकडे जाळपोळ , तोडफोड सुरु आहे. कुणासाठी तर ज्याने सोळाशे करोडचा भ्रष्टाचार केला अश्या माणसासाठी. का तर या जाळपोळ, तोडफोड करणाऱ्या प्याद्यांमागे यांचे वजीर सुरक्षित. इन्स्पेक्टरसाहेब अजून लोक चवीने चर्चा करतात कि गांधीना गोडसेने मारले ते अयोग्य कारण तो अहिंसावादी नेता होता आणि या भारत भूमीचा राष्ट्रपिता होता. पण गोडसेचे विचार वेगळे होते. गोडसेना हाच राष्ट्रपिता देशाचे विभाजन करणारा वाटला असेल. तो गांधी  निर्णय चुकीचा होता आणि त्याची फळं या देशाला दूरवर भोगावी लागतील हे त्याच्या दूरदृष्टीला दिसले असेल. त्याने त्यावेळी जे पाहिलं होतं ते आज आपण प्रत्यक्ष पाहतोय. infact भोगतोय आपण. आज याच भारतात राहून ‘भारत माता कि जय’ बोलायला लाज वाटतेय लोकांना. देशाला लुटणारयांना सोडून.. पत्रके कुणी वाटली असतील..? त्या भ्रष्टाचारी नेत्याचा खून कोणी केला असेल ? त्याला शोधतोय आपण. खरंच इतकं महत्वाचं आहे का हो हे ? सोळाशे करोडचा भ्रष्टाचार म्हणजे किती शेतकरी, कामकरी भूमिपुत्रांच्या हत्तेला जबाबदार होता हो तो?

इन्स्पे:	हे पहा कायदा...

लेखक :	लॉ ग्राज्युएट आहे मी. कायदा सांगत नाही हत्या करायला. मग सीमेवर शत्रूला का मारतो आपण? त्याच्या प्रमुखाने  त्यांना हमला करायला सांगितलेला असतो. आपले सैनिक सीमेवर कोणासाठी स्वताचे प्राण अर्पण करतात? देशाच्या आत यांना आरामात भ्रष्ट्राचार करायला मिळावेत म्हणून. देशाची ताकद त्या देशाच्या तरुणाईत असते. जपा त्यांना. त्यांच्या डोक्यात क्रांतीची आग पेटेल असेल कृत्य करावेच का? अभ्यास करण्याच्या वयात कशाला हवी जनजागृती ?

इन्स्पे:	मीही तेच म्हणतोय. यांनी अभ्यास करावा. अभ्यास करण्याच्या वयात कशाला हवी जनजागृती ?

लेखक :	पण हाच विचार त्यावेळी त्या विध्यार्थ्यांनी केला असता तर...? इथे आता मान वर करून भाषण देण्याची हिम्मत माझ्यातही नसती आणि तुमच्यातही. मुलांची जमानत द्यायला आलोय. सोडा मुलांना. आणि शोधा लवकर.. कारण " नथुराम परत आलाय."

( टेलिफोन वाजतो. )

इन्स्पे :	काय ? विरोधी पक्ष नेत्याचा खून ? कधी ? आता ? कुठे ? नाशकात ?

लेखात : ( हसतो ) बघा. चुकला ना तुमचा अंदाज. हे जनजागृती करणारे दोघे तुमच्यासमोर आणि आपल्या लेखणीने मनातले विचार मांडणारा मीही तुमच्यासमोर. आपण सगळे मुंबईमध्ये आणि नुकताच झालेला पुढचा खून नाशकात. म्हणजे हा नथुराम आता तुम्हाला आमच्यात सापडणार नाहीच. गोडसे, आपटे, सावरकर.. आडनावात अडकलात ना? नावात काय आहे हो. तुम्हीही भोसले आहात पण वर्दीमुळे तुम्हाला अटकेपार झेंडा नाही लावता येत ना. असंच असतं. आता तातडीने सूत्र हलवा साहेब. वर सगळे हललेच असतील. विरोधी पक्ष नेत्याच्या नावावर सुद्धा साडे तेराशे करोडचा भ्रष्टाचार होता म्हणे. पेपरमध्ये वाचलं होतं हो मी. आता या नथुराम प्रकरणात राजकीय लाभ द्वेष असण्याची चर्चा सुरु होईल बघा मिडीयामध्ये. काही झालं तरी टी आर पी कसा वाढेल हे एकच लक्ष. सगळं ज्ञान यांच्याकडेच असतं पण नेटाने तळात जाऊन भ्रष्टाचार बाहेर काढायला पुढे नाही येणार हे लोक. नेता आरोपी म्हणून सिद्ध झाला तरी त्याच्या नावापुढे साहेब लावणारच हे. होळी, दिवाळी तिकडेच साजरी होते ना काहीजणांची. प्रामाणिकपणाची पोचपावती द्यायला नको का ? बरं तुमची परवानगी असेल तर घेऊन जाऊ का मुलांना ? कसं जमतं बाबा यांना. आमच्याने तर

आकडे बोलतानाच गडबडायला होतं. यांची आकडेमोड किती सोप्पी. पेपर बनवा साहेब. (इन्स्पे अस्वस्थ. काळोख.)

## चर्चा सत्र

चॅनेलच्या स्टुडिओमधे चर्चासत्र सुरु आहे.

माजी मंत्री:आम्ही अहिंसावादी आहोत. आमचं सरकार होतं तेव्हा शेतकरी सुखात होता. त्याच्यासाठी आम्ही लढत होतो. किती योजना सुरु केल्या होत्या आम्ही. आता काय शेतकरी रोज आत्महत्त्या करतोय. त्याचे अश्रू पुसायला कोणाकडे वेळ नाही पण आम्ही लढू त्यांच्यासाठी.

संपादक : अहो पण त्याच शेतकऱ्याच्या चारा, छावण्या घोटाळ्यात तुमचं नाव पुढे आलंय.

माजी मंत्री:रामाने सीतेला पण अग्नी परीक्षा द्यायला लावलीच ना. नाव आलंय. सिद्ध होऊ दे कि. राजकारण सोडेन जर सिद्ध झालं तर. आणि अचानक असा कोण नथुराम जयंती साजरी करण्यासाठी धडपड करीत असेल तर आम्ही त्याला ठणकावून सांगू कि आम्ही बांगड्या नाही भरल्या आहेत हातामध्ये.

संपादक : अहो पण तुम्ही अहिंसावादी आहात ना?

माजी मंत्री:काही वेळा जशास तसे उत्तर हे द्यावेच लागते.

संपादक : म्हणजे तुम्ही सवडीने अहिंसा, हिंसावादी होता तर ? असो आपल्यासोबत विरोधी पक्षनेते सुद्धा आहेत. तुम्हाला माझा पुढचा प्रश्न आहे. कि आपल्या राज्यातले , आपल्या देशातले सगळे प्रश्न मिटले का हो कि आपल्याला नथुराम जयंती करणे किंवा त्याला विरोध करणे हा खूप मोठा इश्यू वाटू लागलाय ?

वि पक्षनेता:एक विरोधी पक्षनेता म्हणून माझा याला विरोध आहेच.

संपादक : कशाला?

वि पक्षनेता:हेच जो आपला आजचा विषय आहे. आम्ही कोणत्याही हिंसेचे समर्थन करीत नाही.

संपादक : पण मी आपणास आठवण करून देवू इच्छितो कि तुमच्या पक्षाने अनेक वेळा असे हिंसाचार घडविले आहेत. तुमच्या नावावर अजूनही मारामारी, भ्रष्टाचार असे खटले सुरु आहेत. मग यात तुमचा गांधीवाद दिसतोय कुठे ?

वि पक्षनेता:हे पहा. सिद्ध होतं ते सत्य असतं. आधी सिद्ध तर होवू दे. उगा कुणी काही बोललं कि आरोप ठेवला कि आम्ही गुन्हेगार ठरत नाही ना. जनता पाहतेय. आमच्या केसाला जरी धक्का लागला तरी जनता पेटून उठेल.

संपादक : नाही म्हणजे खरंच जनता पेटून उठलेलीच आहे. कारण नथुराम जयंती हा विषय एका वेगळया वळणावर आलाय कारण नथुरामला मानणार्यांच्या संखेत लक्षणीय वाढ झालेली आहे. आमचा ऑनलाइन पोल सांगतो कि अनेकजण सध्या हिंसेचा मार्ग जास्त योग्य समजतात. अगदी तुम्हीही मघाशी म्हणालात कि जनता पेटून उठेल वगैरे. एक पत्रक दाखवायचं होतं आजच्या या चर्चासत्रात कारण आजचं हे पत्रक आपल्या कार्यालयात आलंय. यात स्पष्ट लिहिलंय कि “नथुराम परत आलाय.” याचा नक्की अर्थ काय? अनाकलनीय आहे.. पण विचार करायला लावणारे आहे. कुणी मस्ती देखील केली असेल.

माजी मंत्री:आपली यंत्रणाच कुचकामी झाली आहे हो. तुमच्या इतक्या मोठ्या चॅनेलमध्ये कुणी पत्रक पाठवितो. “नथुराम परत आलाय.” आलाय तर येऊ दे ना. आम्ही गांधीवादी आहोत सत्य, अहिंसेसाठी आम्ही आमच्या प्राणाचाही त्याग करू... ( संपादक उठून पुढे येतो.)

संपादक : हि दृश्ये होती आमच्या मागील कार्यक्रमाची. छातीठोकपणे भ्रष्टाचार केला नाही म्हणणारे हे दोन्ही नेते आता आपल्यासोबत नाहीत. यांचे सोबत अजून दोन नेते होते त्या कार्यक्रमात.. पण आज ते इथे यायला तयार नाहीत. सगळेच आपल्या भोवती सिक्युरीटीचा गराडा

घेवून बसले आहेत. आता प्रश्न हाच आहे कि नक्की हे नथुराम प्रकरण काय आहे. एक खून मुंबईमध्ये, दुसरा नाशकामध्ये.. दोघांच्या नावे भ्रष्टाचाराची यादी. एक व्यक्ती इतक्या सहजतेने इतकं सारं करतेय कि, कोणती भूमिगत संघटना निर्माण झालेय.. नथुराम हा यांचा आदर्श आहे कि विचार ?

स्वातंत्र पूर्व काळात संपूर्ण देशात अशीच भूमिगत आंदोलने पेटून उठली होती. भारतीय स्वातंत्र लढा हा रोमहर्षक प्रसंगांनी भरला होता. स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे , या विचाराने 'समांतर सरकार' आणि 'प्रती सरकार' निर्माण करावयाची संकल्पना पुढे आली. ऑगस्ट १९४२ मध्ये उत्तर प्रदेशात 'बालिया', दक्षिण बंगालमध्ये 'मिदनापूर' येथे प्रतिसरकार स्थापन झाले. आणि महाराष्ट्रात ३ ऑगस्ट १९४३ ला शिराळा तालुक्यात पणुंब्रे या ठिकाणी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे प्रतिसरकार स्थापन झाले. सशस्त्र क्रांतीची तयारी झाली. या क्रांतिकारकांनी अनेक सामाजिक नितीमुल्ये निर्माण केली. या सर्वामागे राष्ट्रप्रेम आणि समाज हिताची तळमळ होती. तुम्हाला काय वाटतं? नथुराम आलाय म्हणजे नक्की कोण आलाय? तोच क्रांतीचा विचार आलाय का? हि पहा आपणासमोर अजून एक ब्रेकिंग

न्यूज आलेय. आपले एक आय पी एस ऑफिसर वि. पी सनगरे. यांची हत्या झाली आहे. आय पी एस सनगरे यांचे नावावर गेल्याच महिन्यात साडे आठशे करोडचा घोटाळा उघड झाला होता.  आणि हत्त्येच्या ठिकाणी हीच 'नथुराम परत आलाय' हि पत्रके सापडलेली आहेत. एक व्यक्ती एकाचं वेळी वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया हत्या करूच शकत नाही. पण हि अशी हिंसक क्रांती योग्य आहे का? तुमचे विचार संपूर्ण देशापर्यंत पोहोचलेच पाहिजेत. सांगा तुम्हाला काय वाटतं ? कोण आहे हा नथुराम..?

(काळोख.. एक एक स्पॉट ओपन होऊ लागतो.)

राम : मी आहे नथुराम. पहिल्यांदा फक्त राम होतो पण समाजातील वाईट व्यवस्थेने मला नथुराम बनविलं. लहानपणापासून आईवडील, शिक्षक सारेच तर पुस्तक पुस्तकातून शिकवीत आलात मला कि अन्यायाविरुद्ध लढा हा दिलाच पाहिजे. अन्याय करणारा जितका गुन्हेगार तितकाच अन्याय सहन करणारा. देशासाठी जर ज्वलंत विचार घेऊन नथुराम राष्ट्रपित्याची हत्या करू शकतो तर मी एका भ्रष्ट्राच्यार्याची केली तर बिघडलं कुठे ? चढवा मला फासावर मी आहे नथुराम.

सिद्धांत : हो, मी आहे नथुराम. पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारी हे माझे आवडते सण. हो सणच. माझे आवडते राष्ट्रीय सण. जेव्हा छातीवर मी तिरंगा लावतो ना तेव्हा जग जिंकल्याचं समाधान मिळतं. मच्छर आपले रक्त पितो तेव्हा त्याला सोडतो का आपण? शोधून शोधून मारतो ना ? मग या रक्तपिपासूंना का सोडायचं ? चढवा मला फासावर मी आहे नथुराम.

लेखक : हो, मी सुद्धा नथुराम. वाचनाची आवड शिक्षकांनी लावली. खूप काही वाचलं. प्रेरणा मिळाली आणि मग लिहावसं वाटू लागलं. हळूहळू लिहिण्याचा छंदच जडला. खूप काही लिहिलं. लोकांना आवडू लागलं पण नंतर माझं ते मलाच मिळमिळीत वाटू लागलं. काहीतरी वेगळं लिहावसं वाटू लागलं. ज्याने क्रांती निर्माण होईल. टिळक आठवले, आगरकर आठवले. मनात धुमसत असलेला संताप व्यक्त होऊ लागला आणि माझ्या मनात पण नथुराम निर्माण झाला. चढवा मला फासावर मी आहे नथुराम.

आई : मीही नथूरामच. जिजाऊने शिवाजी घडविला. तेव्हा महाराष्ट्र महान असे राष्ट्र झाले. आम्ही का नाही शिवाजी घडवू शकलो. प्रत्येकाला शिवाजी हा हवाच असतो पण तो जन्माला मात्र बाजूच्या घरातच यावा हि एकच

इच्छा कारण त्याला शिवाजी बनवायची, अन्यायाविरुद्ध उभं करायची हिम्मत आमच्यात असतेच कुठे.आम्ही बायका पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहायची भाषा करतो पण दुखः याच गोष्टीचं कि बायकांच्या हितासाठी धडपड दाखवणाऱ्या बायका भ्रष्टाचारात पुरुषांपेक्षाही पुढे. मग त्यांना धडा शिकविण्यासाठी माझ्यातलाही नथुराम बाहेर डोकावू पाहतो. म्हणूनच म्हणते, 'चढवा मला फासावर मी आहे नथुराम.'

पत्रकार१: क्रांती घडवायला पत्रकार झालो आणि नेत्या अभिनेत्याच्या घरी होळी दिवाळी साजरी करीत बसलो. सुरुवातीला छाती फुगवून सांगायचो एका दमात पत्रकार आहे म्हणून आणि आता 'पत्रकार' या शब्दाचीच लाज वाटते मला. नको हि घृणास्पद नोकरी. स्वतःच्या स्वभिमानासमोर अश्या शंभर नोकर्यांना लाथ मारेन मी. नुसत्या शब्दांचा नाही तर हाडाचा मराठी आहे मी. आणि गर्व आहे मला मराठी असल्याचा. असे एक नाही शेकडो भ्रष्टाचारी मारेन मी. मग चढवा मला फासावर मी आहे नथुराम.

इन्स्पे : मी देखील नथुराम. झुगारून दिली बंधनं. वर्दीशी निष्ठा राखू शकत नाही तर काय अधिकार ती अंगावर चढविण्याचा. बारा हत्तीचं बळ येतं जेव्हा हि खाकी या

देहावर सजते. खूप काही करावसं वाटतं. नेताजींचा तो करारी चेहरा आठवतो. पोलिस भरतीच्या वेळी दाखविलेली तडप, देशाशी इमान ठेवण्याची घेतलेली शपथ. सारं काही आठवतं. आणि जेव्हा आरश्यामध्ये स्वतःचं खरं रूप दिसू लागतं तेव्हा घृणा येऊ लागते स्वतःची. जो वर्दीशी इमान राखू शकत नाही त्यांचे जिणे लाजीरवाणेच. मग पोलिसाच्या खाकीत, आणि पालिकेच्या शिपायाच्या खाकीत फरक तो कुठला. पण आता नाही. आता खाकीतला हा देह भ्रष्टाच्यारयापुढे झुकणार नाही. माझ्यातला नथुराम जिवंत झालाय. चुकीला चूक बोलण्याची हिम्मत त्याने दाखविली तर मी का नाही दाखवू शकत. चढवा मला फासावर मी आहे नथुराम.

संपादक : न्याय, नीतिमत्ता, राष्ट्रप्रेम, देशभक्त, विचारी, तज्ञ, विचारवंत, धाडसी, सत्य बोलणारे किती विशेषणे स्वतःला लावून घेणारे आम्ही. लोकशाहीचा चौथा स्तंभ. केव्हाच ढासळलाय हा स्तंभ. जाहिरातींचे टेकू लागले आणि आमचा स्तंभ मोडकळीला आला. बातम्यांचा दर्जा राखायचा कसा ? कोणाही सेलिब्रेटिच्या तोंडून एक चुकीचा शब्द शोधत फिरायचं आणि त्यावर आठवडे अन आठवडे चर्चासत्र चालवायची. मुद्दाम वादग्रस्त विधाने

करणार्यांना बोलवायचं.  आपली पोळी भाजत एका मागोमाग एकाला ब्लॅकमेल करायचं. ज्याला काही अर्थ नसेल अश्या बातम्या निर्माण करायच्या आणि न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या गोरगरिबांच्या हक्काच्या बातम्यांना केराची टोपली दाखवायची. हि आमची जीव तोडत असलेली लोकशाही आणि आम्ही तिचे भ्रष्टाचाराने बरबटलेले शिलेदार. पण एक पत्रक हातात येतं आणि एक आग सर्वत्र पेटते. क्रांतीची ठिणगी पण अशीच उडाली असेल ना जिने मग उग्र वणव्याचं रूप धारण केलं असेल. आता मीही याचाच एक भाग. यापुढे जळेन तर देशासाठी जळेन आणि माझ्या क्रांतीच्या आगीत एकाएका भ्रष्टाचारयाला जाळेन. मग भले मलाही चढवा फासावर कारण मीही आहे नथुराम.

कारण नथुराम हा क्रांतिकारी नव्हताच पण कदाचित त्याचे विचार क्रांतिकारी होते. आपल्या आसपास जेव्हा काही चुकीच्या गोष्टी होत आहेत असं आपल्याला वाटतं ज्या आपल्याला पटत नाहीत तेव्हा आपल्या मनात जे जहाल विचार येतात तेच विचार क्रांतिकारी असतात आणि त्यातूनच क्रांती निर्माण होते म्हणून तुम्ही देखील फक्त एकदा प्रत्येकाने स्वार्थ बाजूला ठेवून आरश्यात स्वताला निरखून पहा. मग इतर कुणी नाही तुम्ही स्वतः म्हणाल " नथुराम परत आलाय." हो नथुराम माझ्या रुपात परत आलाय. माझ्या श्वासात परत आलाय.

माझ्या शब्दात परत आलाय . माझ्या कृतीत परत आलाय. सोडणार नाही त्याला जो या देशाशी बेईमानी करेल.. सोडणार नाही त्याला जो या देशाचा अपमान करेल. मग भले चढवा मला फासावर. मी आहे नथुराम .

सारे : चढवा मला फासावर. मी आहे नथुराम . ( हळूहळू अंधार ..)

# ऑपरेशन सक्सेस...



## प्रवेश पहिला

(कार्तिक बेडवर टेकून बसलाय व कविता लिहीतोय. सिगरेटच्या धुराच्या वलयात नविन **ओळी** आठवत पानांवर उतरवतोय. तेव्हा कविता नुकतीच **आंघोळ** केलेल्या अवस्थेत डोक्याला टॉवेल **गुंडाळत** साडीमध्ये बाथरूममधून बाहेर येत कार्तिकजवळ येते.)

कविता : नविन कविता....... ? (कार्तिक किंचित हसत मानेने हो म्हणतो. कवितेचं टायटल वाचत) प्रियकर..... wow किती सुंदर नाव आहे कवितेचं.

(कार्तिकच्या दंडाला मिठी मारत त्याच्या खांदयावर डोकं ठेवते.)
(लाडात कार्तिककडे पाहत) माझ्यासाठीच लिहीली आहेस ना ?

कार्तिक : (हसत) तुला काय वाटतं ? तुझ्यासाठी कि इतर... ?

कविता : (लटक्या रागात) असं काय करतोसं, सांग ना. माझ्यासाठीच ना ?
(कार्तिक हसतो) वाच ना लवकर कविता. please वाच ना. किती रे मस्के लावायचे तुला.

कार्तिक : कवितेचं नाव...

कविता : प्रियकर. (हसते) म्हणजे तू .

कार्तिक : (हलकेच हसत)

असा अजाण मी प्रियकर
अबोध हृदयाचा स्वामी
प्रेमात पडलो तुझ्या
जिथे सुरु गुलामी (ती लाजते)

प्रितीत तुझ्या रचली
मोहक काव्ये विपुल
पाहताक्षणीच जातील
नेत्र त्वरीत दिपून

अशी अगं तू माझी
प्राणप्रिये..... लेखणी
(तिला पेन दाखवतो. ती खोटं रागावते)
नाही तिन्ही जगी
तुझ्याविना देखणी

प्रित तुझ्यावर जडली
या दुःखी जीवनाची
अंत नाही ज्याला
न आशा संपण्याची........

(ती वळून कार्तिककडे पाहते. लटका राग.. कार्तिक हातातलं पॅड पेन बाजूला ठेऊन तिला जवळ घेत असतो. ती रूसते. तो हसतो आणि गाणं गुणगुणायला लागतो...... **मै कही कवि न बन** जाऊ तेरे प्यार में कविता..... )

**<u>प्रवेश दुसरा</u>**

( दरवाजाची बेल जोरजोराने वाजू लागते. *सुंदर टापटीप व्यवस्थित घर. घराच्या उजव्या कोपऱ्यात एक टेबल व खुर्ची. उजव्या बाजूला पाठीमागे एका बाईची नग्न मुर्ती. मध्यभागी सोफा-टी पॉय, सोफ्याच्या उजव्या बाजूला अजून एका बाईची नग्न मुर्ती.* विशाल *उजव्या बाजूला असलेल्या नग्न मुर्तीकडे विस्फारलेल्या डोळयांनी पाहत असतो. धाडकन दरवाजा उघडतो.)*

विशाल : *(*कार्तिक *आत येतो. डोक्यावरचा घाम पुसतो. थरथरत असतो.)*
कार्तिक *बस . ते बघ जारमध्ये पाणी आहे. बाजूला ग्लास आहे. घे आणि पाणी पी.* कार्तिक *पाणी पितो. ग्लास ठेवतो. पुन्हा एकदा घाम पुसतो.) व्हॉट हॅपन्ड* कार्तिक.. *काय झालं ? एवढा घाबरलायस का ?*

कार्तिक : *एलफिन्स्टन पुलाजवळ..( पुन्हा एकदा पाणी पितो.)*

विशाल : *काय झालं एलफिन्स्टन पुलाजवळ ?*

कार्तिक : *एलफिन्स्टन पुलाजवळ ॲक्सिडेंट झालाय. अजब ॲक्सिडेंट. ट्रक आणि टॅक्सीची टक्कर झालेय. टॅक्सीतला माणूस बाहेर रस्त्यावर उडाला आणि त्याच्यावरून.. टॅंकर गेलाय. खूप चेंदामेंदा झालाय त्याचा, ओळखता पण येत नाही. पाहिलं त्याला आणि केल्या बकाबक उलटया मंडईच्या बसस्टॉपजवळ. लगेच माझ्याभोवती पण लोक गोळा झाले.*

विशाल : *लोकांना फक्त तमाशाच पाहायचा असतो, ते तर वाटच पाहत असतात. कधी तमाशा पाहायला मिळतोय*. But thrill is one of the most important thing in our life. *आणि मित्रा तू डॉक्टर आहेस*. you are a doctor. *आणि तरीही ते दृश्य पाहून तू घाबरलास, उलटया केल्यास*. What a joke.

कार्तिक : विशाल, *तो प्रकारच एवढा विचित्र होता की पाहणाऱ्यांच्या अंगावर शहारे आलेच पाहीजेत*. A Terrific moment in my life.

विशाल : *अजून बरेच प्रसंग तसेच तुझ्या आयुष्यात येणार आहेत. केव्हाही येतील. कदाचित आतासुध्दा.* (कार्तिक *दचकतो.)* Life is not complete without thrill.

कार्तिक : yes, *पण अशाच जर अजून एक दोन गोष्टी हया चार-पाच दिवसात घडल्या तर मला नाही वाटत मी सहावा दिवस पाहीन. त्यात मला ज्योतिषाने अगोदरच सांगितलय की माझा मृत्यू हार्ट अॅटॅकने होणार आहे आणि वर त्याने मला* पंचविसावं *वर्ष धोक्याचं सांगितलयं, आणि हे माझं* पंचविसावं *वर्ष आहे.*

विशाल : *तुझा* astrology *वर विश्वास आहे ?* (कार्तिक *गडबडतो.) माझा नाही. मी हे* astrology *वगैरे मानत नाही.* Don't worry. *तुला काही होणार नाही.* पाणी पितोस ?(कार्तिक नाही म्हणतो. कार्तिक *थोडा रिलॅक्स होतो.) पण केव्हातरी ज्योतिष्याच्या म्हणण्यानुसार होतं हा.* (कार्तिक *दचकतो. घाबरतो.) नाही.* म्हणजे *माझे शेजारी. मि .चिटणीस. अरे, शेजारच्या बंगल्यात रहायचे ते. त्यांना एका ज्योतिषाने सांगितलं होतं. तुमचा मृत्यू २३,२४,२५ डिसेंबर या तीन दिवसांपैकी केव्हातरी होईल. तुम्ही रात्री बरोबर बारा वाजता मरणार.*

कार्तिक : *मग..*

विशाल : *मग काय, तेवीसची रात्र जागून काढली. चोवीसची रात्र जागून काढली. पंचवीस शेवटचा दिवस.* (कार्तिक *टेन्समध्ये) रात्रीचे बाराचे ठोके वाजायला लागले आणि चिटणीसांच्या हृदयाचे ठोकेसुध्दा वाढायला लागले. बारा ठोके पडले तरी चिटणीस जिवंत.*

कार्तिक : *मग..*( कार्तिक *रिलॅक्स)*

विशाल : *मग काय, चिटणीसांना खूप आनंद झाला. मोठमोठयाने वेडयासारखे ओरडायला लागले. बारा वाजून गेले तरीही मी जिवंत आहे. ज्योतिषाचं भविष्य खोटं ठरलं. त्यांच्या बायकोलाही फार आनंद झाला. दोघेही आनंदात होते. चिटणीस जोरजोरात ओरडत होते. ज्योतिष्याला शिव्या देत होते, आणि अचानक चिटणीसांचं ओरडत बंद.* (कार्तिक *टेन्समध्ये)* Heart Attack. Yes, *दुसरा झटका. चिटणीसांची बायको रडवेली झाली. क्षणात सुख आणि क्षणात दु:ख. आमच्या घडयाळाला अवदसा आठवली आणि बाराचा पहिला ठोका पडला. ठोका कानात आणि चिटणीसांचा प्राण बाहेर. बिच्चारे चिटणीस. बारा ठोकेसुध्दा ऐकू शकले नाहीत. चिटणीसांच्या बायकोने घडयाळाकडे पाहीलं. घडयाळात बारा दहा. चिटणीसांचं घडयाळ दहा मिनिटं पुढं होतं. मिसेस चिटणीसांना अश्रू आवरत नव्हते. त्यांच्या रडण्यामुळे तिथं गेलेले आम्ही लोक त्यांना सावरायचा प्रयत्न करत होतो. चिटणीसांना मी पुन्हा- पुन्हा तपासत होतो. पण व्यर्थ.* After all I am a doctor. Not a god. *मिसेस चिटणीस मोठया आशावादी नजरेनं अधून-मधून माझ्याकडे पाहत होत्या. मी* sorry *म्हटलं. पुन्हा एकदा रडण्याचा समारंभ सुरू. मला वाटलं, रडणं थांबवून त्या माझ्या* sorry *चीच वाट पाहत होत्या.* (कार्तिक *किंचित हसतो.) पण* कार्तिक *, एखादयाचा मृत्यु आला असेल ना. तर मात्र तो टळत नाही.* (कार्तिक *टेन्समध्ये )*

वाईट वाटलं, ते एकाच गोष्टीचं. तिसऱ्या झटक्याचा अनुभव चिटणीसांना दुसऱ्या झटक्याने यायला दिलाच नाही. Selfish.

(कार्तिक प्रश्नार्थक नजरेने विशाल कडे पाहतो.)

विशाल : दुसरा झटका रे. क्षणात आला आणि चिटणीसांचं आयुष्य झटकून गेला. काळजी वाटतेय ती त्यांच्या मुलीची हिमानीची. हिमानी वय वर्षे अठरा. (कार्तिक रिलॅक्स .) नावातच सगळं आहे. हिमाप्रमाणे गोरी, भरीव अंगकाठी, रेखीव शरीर, स्तनाच्या आकारावरूनच समजतं जपणूक जबरदस्त आहे. डोळे निळसर. समुद्रच पसरलेला वाटतो डोळयात. लालबुंद ओठ पाहीले की नकळत आपलाच ओठ आपल्याच दाताखाली येतो आणि काही क्षणातच लाल पाणी बाहेर.

पाय म्हणजे केळीचे खांब. तुळतुळीत. जवळ जाऊन शोधलास तरी केस सापडणार नाही. मागे तिची केस माझ्याकडेच होती ना. म्हणजे पायाला लचक भरली होती, तेव्हा बोलावलं होतं मला. तिच्या पायावरून हात फिरवताना वाटत होतं जणू काही रेशमाच्या गादीवरूनच हात फिरवतोय. इतके नाजूक पाय. कार्तिक यार फिगर म्हणजे काय हे पाहायचं असेल ना, तर तू तिला बघ. अगदी तंतोतंत ३६-२४-३६. उखळीचाच आकार वाटतो. तुला सांगतो कार्तिक तिला जो पाहील ना तो मधुबालाला सुध्दा विसरेल. सध्या ती बाहेरगावी गेलेय. काही दिवसांनी ती येईल. पण तोपर्यंत तू जिवंत असशील तर नक्कीच पाहशील.

कार्तिक : विशाल, काय झालंय तुला. तू मघापासून मला काहीतरी सेक्सी, गोड असं सांगतोयस आणि पुन्हा मृत्युची आठवण करून देतोयस.बघं, मला परत घाम आलाय. हे बघ, आधीच मी खूप नर्व्हस झालोय. त्यात तू मला अजून नर्व्हस करू नकोस. (घाम पुसतो.)

विशाल : अरे पण मृत्युच्या विषयाने..

कार्तिक : (मध्येच तोडत) stop it please. मला तो विषय नकोय. मला सांग, तू मला फोन करून ताबडतोब कशाला बोलावलसं.

विशाल : होय. जरा महत्त्वाचं काम होतं. सिगरेट पिणार ?

कार्तिक : सिगरेट मरू दे रे. काम सांग.

विशाल : फ्रिजमध्ये chilled beer आहे.

कार्तिक : क्या बात हैं ।
(फ्रिजमधून बाटली काढतो. दोन ग्लास घेतो.)

विशाल : मला नकोय, तूच घे.

कार्तिक : का रे ?

विशाल :नाही मी नुकताच भरपूर जेवलोय.

कार्तिक : आणि मला म्हणालास जेवत बसू नकोस, लगेच ये. एनी वे, जेवलो नाही हे मात्र बरं झालं. म्हणजे म्हणूनच

बियर प्यायला बसलो.( बाटली उघडून स्वत:चा ग्लास भरतो.) मला हा बियरवर येणारा फेस खूप आवडतो.

विशाल : हा फेस आपल्या लाइफसारखा आहे. हा फेस कधी उडतो कळतच नाही आणि आपलं जीवनसुध्दा.

कार्तिक : विशाल प्लीज.

विशाल :हा कार्तिक , तू बियरबदद्ल काय सांगत होतास ?

कार्तिक: मी बियरबदद्ल.. हा. बियरचं काय आहे माहीतेय, ती ओतण्यापासून ते ती पोटात जाईपर्यंत भरपूर प्रिकॉशन्स घ्याव्या लागतात. ग्लासात बियर ओतताना ग्लास थोडं वाकडं करून मग बियर ओतायची. त्याने बियरवर फेस येत नाही. पण मी मात्र अशी बियर ओतत नाही, कारण मला फेस आवडतो. बियर पिताना नेहमी बियर थोडावेळ तोंडात घोळवायची. म्हणजे बियर पिताना एक वेगळीच मजा जाणवते. जेव्हा बियर आणि आपल्या तोंडातली लाळ मिक्स होते ना, तेव्हा बियरची रंगत अजून वाढते. (हसतो.) अरे मी बियरबदद्ल तुला काय सांगतोय. you are my godfather . (दोघेही हसतात.)

कर्तिक : बरं आता सांग तू मला कशाला बोलावलसं ?

विशाल :बियर पिणं सुरू कर ना.

कार्तिक : *अं..हं..* subject first.

विशाल : *मी एक पुस्तक लिहायला घेतोय.* problem *असा आहे. माझ्या पुस्तकाचं टायटल* incomplete *आहे. म्हणजे बघ ना पुस्तकाचा विषय* clear *झाल्याशिवाय पुस्तक लिहीणार कसं.*

कार्तिक : *म्हणजे, तू तुझ्या पुस्तकाचं नाव ठरवलं नाहीस. अजून तू विषय फिक्स केला नाहीस.*

विशाल : *ते बघ. त्या टेबलावर पुस्तक ठेवलय.*
(कार्तिक *जाऊन टेबलावरून पुस्तक उचलतो.*)

कार्तिक : *मी आणि माझा.. ? अरे माझ्याच्या पुढे काय.. ?*

विशाल : *त्यासाठीच तर तुला बोलावलयं. तुझा अंदाज काय आहे. मी आणि माझा.. पुढे काय लिहलं पाहीजे, की ज्या सुंदर, पूर्ण टायटलवरून मग अतिशय जबरदस्त पुस्तक लिहीलं जाईल.*

कार्तिक :*पण मला कळत नाहीए, तू डॉक्टरीपेशाकडून लेखनाकडे का वळलास ?*

विशाल : *ती गंमत मी तुला नंतर सांगेन. अरे माझा जन्म कदाचित.. यस, जन्म. माझ्या जन्माची गंमत तुला माहीतेय ? अरे, अगोदरच म्हणजे सातव्या महीन्यातच जन्माला आलो. त्यामुळे फार अशक्त होतो. जन्माला आल्यापासून पहीली तीन वर्ष सिरीयस. पुढे जगेनच*

*अशी आशा नाही. पण कदाचित डॉक्टरांमध्ये एकाची वाढ व्हावी अशी* देवाची *इच्छा असावी म्हणून वाचलो. माझे जन्मानंतरचे तीन वर्षातले फोटो पाहीलेस तर म्हणशील, एखादा आईबाप म्हणाला असता, असलं डोक्याला ताप देणारं पोरगं मेलेलंच बरं. आणि गंमतीचं सांगायचं तर माझा जन्म झाला आणि हॉस्पिटलच्या बाहेर एकाचा खून झाला. अंगाचा थरकाप उडवणारा. वडील सांगत होते म्हणून मला माहीतेय. माझी आई बिचारी साधी बाई. देवाधीकावर जबरदस्त विश्वास. देवावर विश्वास म्हणजे भुताखेतांवर आलाच. तिच्या डोक्यात काय भरलं माझ्यावर त्या माणसाच्या आत्म्याची सावली पडली असणार. मला घेऊन किती एक मांत्रिकांकडे गेली असेल, कुणास ठाऊक. मांत्रिकांना काय, पैसाच कमवायचाय. मग झपाटलं काय, आत्म्याची सावली काय, धमाल नुसती. तीन वर्षानंतर बरोबर सुधारत चाललो.नंतर जरा कळायला लागल्यानंतर विचार केला आणि ठरवलं, डॉक्टर व्हायचं. लहानपणापासूनच हुशार होतो, मेहनती होतो. त्यात ध्येय समोर दिसलं की त्यावरच तुटून पडावं हे पहील्यापासूनच माहीत. आणि झालो डॉक्टर. पण हे सर्व माझ्या जन्मामुळेच शक्य.*

कार्तिक: *मग तू तुझ्या पुस्तकाचं टायटल ''मी आणि माझा जन्म'' दे.*

विशाल : असले झ्याटझूट टायटल सांगू नकोस. काहीतरी दमदार बघ.
(कार्तिक आश्चर्याने त्याच्याकडे पाहतो.) काय रे असा काय पाहतोयसं ?

कार्तिक : तुझ्या तोंडून झ्या..

विशाल : झ्याटझूट. .(हसतो.) अरे तो माझ्या बापाचा शब्द होता.(कार्तिक पुन्हा आश्चर्याने) बाप.. हा शब्द एकेरी वापरला म्हणून टेन्शन घेऊ नकोस. माझं माझ्या वडीलांबरोबर एकदम फ्रिली चालायचं. ते एखादी गोष्ट सांगत असले आणि माझं लक्ष नसलं तर ते म्हणायचे, बाप सांगतो आणि हा ऐकतो. (कार्तिक्कडे पाहून) हा च्या जागी काय शब्द असेल तुला माहीत असेलच.

कार्तिक : ( हसून) भावना पोहचल्या. (कार्तिक बार काउंटर वरून सिगारेट घेवून सिगारेट लाईट करतो.)

विशाल :असा माझा बाप. जबरदस्त माणूस. तो नसता तर माझं जगणच अशक्य होतं. ही गोष्ट वेगळी, तो नसता तर मी या जगात आलोच नसतो. ते वरून एकदम तो वर आलो ना. माझा बाप स्वत:च्या बापाला पण बापच म्हणायचा आणि मलाही सांगायचा की मला बाप म्हण. बाप हा शब्द कसा भरगच्च आणि दिमाखाचा वाटतो. स्वत: अशिक्षित, पण पोराला शिकवण्याची जबरदस्त इच्छा. शरीराने मजबूत. भोसले कुळातले वंशज म्हणून

शोभायचे माझे वडील. आमच्या रांझ्याला सर्वजण म्हणायचे. बजरंगराव भोसले म्हणजे जणू काही संभाजी महाराज. काय दरारा होता त्यांचा गावात. एकदा आमच्या गावात चोरी झाली. चोरी कसली, एका माणसाचा बटवा हरवला. बटव्यात हजारएक रूपये होते. तेव्हाच्या काळात हजारएक रूपये म्हणजे भरपूर. तो माणूस धावतपळत आमच्या वाड्यावर आला. वडीलांनी संध्याकाळी पंचायत बोलावली.

माझ्या वडीलांसमोर बोलायची कोणाची टाप नव्हती. सर्व गावकरी आले. आणि वडीलांनी सिंहगर्जना केली, ज्याने ही चोरी केली असेल, त्याने ताबडतोब बटवा परत करावा. आम्ही उदार मनाने त्याला माफी देऊ. पण जर का नंतर आम्ही त्याला पकडला. तर मात्र त्याला माफी मिळणार नाही. आपला शब्द म्हणजे क्षत्रियाचा शब्द आहे. प्राण जाईल, पण फिरायचा नाही. कोणी केली ही चोरी ? वडील गरजले, आणि लगेच ड़ोळयाचं पातं लवतं न लवतं तेवढयात गावचा पुजारी माझ्या वडीलांच्या पायावर पडला आणि धाय मोकलून रडायला लागला. म्हणाला एकवार माफी दयावी. माझ्या वडीलांना सर्वजण रावसाहेब म्हणायचे. पुजारी पुढे म्हणाला, गणोजीराव सकाळी दर्शनाला आले होते, तेव्हा त्यांचा बटवा पडला. बटवा दयायला जात होतो, पण बटव्याचं वजन जास्तं म्हणून बटवा उघडला, आणि आत एवढे पैसे पाहून मोहपाशात अडकलो.

कार्तिक : मग चांगलीच अद्दल घडवली असेल त्या पुजाऱ्याला तुझ्या वडीलांनी.

विशाल : अंहं.., स्वत:चा दिलेला शब्द ते कधी मोडत नव्हते. त्यांनी त्याला अभय दिलं, मोठया मनानं

कार्तिक : अरे विशाल, विषय सापडला. तू असं का करत नाहीसं. तू तुझ्या वडीलांवरच पुस्तक लिहं. मी आणि माझा बाप. नाहीतर बाप हा एकेरी शब्द तुम्हां दोघांचाही आवडता. What a suitable Title.

विशाल : चल रे. मला ना काहीतरी वेगळं लिहायचय. अगदी वेगळेपणा आला पाहीजे त्यात. Some Abstract things. Yes & Some Sexy.

कार्तिक : Sexy?

विशाल : Yes Sexy. माझ्या Sex बद्दल मी तुला काहीच सांगितलं नाही ना.

कार्तिक : Sex बद्दल. What do you mean ?

विशाल : I mean, Those old days in my Life. तेव्हा मी सात-आठ वर्षांचा असेन. घरच्यांबरोबर खूप फिरायचो. आमच्या घरीसुध्दा बरेचसे पाहुणे यायचे. असेच एकदा आमच्याकडे पाहुणे आले होते. एक जोडपं आणि त्यांची मुलगी. तरी तुला सांगतो, त्यावेळेस ती सतरा-अठरा वर्षांची असेल. रात्री जेवण वगैरे आटोपल्यावर सारेजण गप्पा मारत होते. मला झोप आली म्हणून मी झोपायच्या

*खोलीत जाऊन झोपलो. आम्ही सर्वजण एकत्रच झोपायचो. मध्यरात्री मला अचानक जाग आली. मला काय होतंय माझं मलाच कळंत नव्हतं. माझ्या बाजूला ती मुलगी झोपली होती, आणि ती माझ्या अंगाशी खेळंत होती. मला कुरवाळत होती. क्षणभर काय चाललंय हे मलाच कळत नव्हतं. पण काहीश्या सुखद वेदना मला जाणवत होत्या. तिने माझे छोटेसे हात स्वत:च्या स्तनांवर ठेवले आणि तो नाजुकसा स्पर्श मनात घर करून गेला. बस्स, तिथून म्हणजे वयाच्या आठव्या वर्षापासून जो सेक्स उफाळून आला तो कायमचाच. जवळ-जवळ पंधराएक दिवस होती ती आमच्याकडे. मग काय, रोजच्या रात्री जागायला लागल्या. नंतर लवकरच तिचं लग्न झालं.*

*पण त्या पंधरा दिवसात* Sex *चं बरचसं ज्ञान ती मला देऊन गेली. रात्री काय दिवसासुध्दा माळयावर आमचे खेळ चालायचे, डॉक्टर-डॉक्टर. सेक्स वाढत होता, पण त्याचा फरक अभ्यासावर पडला नाही हे नशीब. सेक्स आपल्याला ज्यावेळेस जाणवतो नां, ती मजाच वेगळी असते. सेक्स या शब्दानेच माणूस उत्तेजित होतो.*

कार्तिक: *मला पण त्रास व्हायला लागलाय. मी घरी जाऊ का ? मला पण..*

विशाल : कार्तिक , *तू माझ्या पुस्तकासाठी विषय सुचवायला आलायस ना.*

कार्तिक : *अरे, विषय काय सुचवायचा. मी आणि माझा सेक्स. लिहून टाक पुस्तक. तुझ्या सांगण्याने माझ्यासारख्या डॉक्टरवर एवढा फरक पडला, तर तू ते पुस्तक लिहीलंस तर काय होईल. एवढं मात्र नक्की, की तुझं पुस्तक साऱ्या जगात खळबळ* उडवेल. *कामसुत्राच्या पुस्तकासारखं.*

(दोघेही हसतात टेलीफोनची बेळ वाजते.)

विशाल : उचल. तुझ्याच फोन आहे.

कार्तिक : माझा फोन ? विशाल हे तुझं घर आहे.

विशाल : अकरा वाजून गेलेयत. तुझ्या बायकोचाच असेल उचल.

कार्तिक : (रिसिव्हर उचलतो.) हॅलो,

कविता : हॅलो, कविता बोलतेय.

कार्तिक : हा, बोल मी कार्तिक बोलतोय. (विशालकडे पाहत त्याला सॅल्युट मारतो.)
काय झालं ?

कविता : काय झालं काय ? मोबाइल घरीच विसरून गेलास. आणि किती वाजले ? तू म्हणाला होतास लगेच येतो. किती वेळ झाला ?

कार्तिक : हा हा येतो, थोडया वेळात येतो.

कविता : कार्तिक, मी जेवायची थांबलेय तुझ्यासाठी.

कार्तिक : हो हो येतो मी लवकरच.

कविता : काही प्रॉब्लेम तर नाही आहे ना ?

कार्तिक : नाही काही नाही. काही प्रॉब्लेम वगैरे नाही आहे.

कविता : प्रॉब्लेम नाही. एं म्हणजे तू ड्रींक्स करायला नाही गेलायस ना तिथे ? हे बघ....

कार्तिक : कविता, मी बियर पित नाहीए.

कविता : मी कधी बियरचं नाव घेतलं ? म्हणजे तू पक्का बियर प्यायला बसलायास.
(तो कपाळावर हात मारतो. विशाल हसतो.)

कार्तिक : तुला काय झालयं हसायला ?

कविता : अरे मी कुठे हसतेयं ?

कार्तिक : तू नाही गं. हा विशाल हसतोय. बेटया, दात दाखवणं बंद कर. तुझं लग्न झालं की कळेल तुला. फिर सब आटे दाल कर भाव पता चल जाएगा! एक दिवस तू पण उठशील आयुष्यातून.

कविता : एं काय म्हणालास ?

कार्तिक : मी, कुठे काय ? मी काय म्हणालो ?

कविता : मी ऐकलयं सगळं, म्हणजे तुला असं म्हणायचयं की माझ्याशी लग्न केल्यानंतर तू आयुष्यातून उठलास.

कार्तिक : अगं मी असं नाही म्हणालो.

कविता : मी ऐकलयं सगळं .

कार्तिक : I Mean to say…….. यार, शिट बियर प्यायच्या आधीच काहीही बरळायला लागलो.

कविता : म्हणजे तू बियर प्यायला बसलायंस ?

कार्तिक : नाही, म्हणजे हो. म्हणजे नाही. म्हणजे अजून मी काही बियर प्यायलेलो नाही. (विशाल हसतो)

कविता : म्हणजे आता पिणार आहेस तर ?

कार्तिक : हो, म्हणजे नाही. बियर नाही, ते आपलं हा पुस्तक पिणार आहे.

कविता : काय ?

कार्तिक : अगं म्हणजे, ते विशाल पुस्तक लिहितोय ना, ते डीस्कशन सुरू आहे. बियर वगैरे काहीच नाही आहे. वेडी, घरी थोडीच कोण बियरच्या बाटल्या आणून ठेवतो.

कविता : तू बियर प्यायला बसलायस ?हो ना ?

कार्तिक : हो, म्हणजे नाही. (रिसिव्हर ठेवतो आणि विशाल हसतो.)
यारं तुझ्या या लेखक व्हायच्या नाटकात मी फसलोय, आता कसं समजावू तिला.

विशाल : सांग ना. बसलो बियर प्यायला म्हणून.

कार्तिक : आजच Divorce Paper वर सही करू म्हणतोस. अरे आजच तिने मला...... (टेलीफोन वाजतो.)

विशाल : उचल...... (मोठ्याने हसतो.)

कार्तिक : माझा श्राप आहे तुला. तुझं पण लग्नानंतर असंच बियर पिणं बंद होऊ दे.

विशाल : मला श्राप नंतर दे आधी फोन उचल. नाहीतर मग..... (हसतो.)

कार्तिक : (रिसिव्हर उचलतो) हॅलो कविता.....

कविता : इतका वेळ लागतो फोन उचलायला. बियर गळ्यातच अडकली होती काय ?

कार्तिक : अजून बियर नाही प्यायलोय

कविता : अजून नाही प्यायलास. मग आतापर्यंत काय वासचं घेत होतास. जे काय उपदव्याप करायचेच ते कर. आणि आता सकाळीच ये. मी जेवून झोपतेय. आणि सकाळपर्यंत दरवाजा उघडणार नाहीए. मनसोक्त बियर पी. तुपाच्या वासानं मळमळतं म्हणे. बियरच्या वासाने तब्येत हरीभरी होत असेल ना ? आता रहा रा़त्रभर तिथेच गुड नाइट. (फोन ठेवते.)

कार्तिक : हॅलो, हॅलो अगं कविता ? (रिसिव्हर ठेवतो.) खाया ना पिया ग्लास फोडा बारा आना. (विशाल हसतो.)

कार्तिक : हसा, आता रात्रभर हसत बसा. I don’t mind आता रात्रभर इथेच आहे मी. आमचा दरवाजा आता सकाळपर्यंत उघडणार नाहीए. मी आता फ्रिज मधल्या सगळ्याचं बियर रिकामी करून टाकणार. तुझ्या लेखक बनण्याची पार्टी. (दोघेही हसतात.)

*पण कमाल आहे हा, आजकाल बरेचसे डॉक्टर लेखनाकडे वळलेयत. काय* विशाल *बरोबर बोलतोय ना मी? लेखकांना जास्त पैसा मिळतोय वाटतं डॉक्टरांपेक्षा. म्हणूनच बहुतेक डॉक्टर, डॉक्टरीपेशा विसरत चालले आहेत.*

विशाल : *अरे, डॉक्टरीपेशा म्हणजे आपली रोजीरोटी आहे आणि लेखन म्हणजे छंद. ही गोष्ट वेगळी आजकाल लेखकांना खूप मान मिळतोय. पण मी हे मान-सन्मानासाठी करत नाही हां. आयुष्यात काहीतरी छंद जोपासायलाच हवेत नाही का? तुला काय वाटतं? डॉक्टरीपेशा सोडला तर मी उपाशी मरेन? हया डॉक्टरीपेशामुळेच मला बऱ्याच काही गोष्टी मिळाल्या. जे जे अपेक्षित होतं ते ते मिळालं, सर्व काही. अजून काही गोष्टी मिळवायच्या बाकी आहेत. पण त्याही लवकरच मिळतील.*

कार्तिक: विशाल, *तुझं हे कोडयात बोलणं माझ्यासाठी न उलगडणारं रहस्य आहे. गेली चार वर्षे तुझ्याबरोबर आहे,पण अजून तुला काही ओळखू शकलो नाही मी. किती आतल्या गाठीचा आहेस रे तू.*

विशाल : होय. मी खूप आतल्या गाठीचा आहे. म्हणूनच समोरच्याच्या गाठी मी त्याच्या नकळतच सोडवतो.

कार्तिक: विशाल, काय म्हणू तुला यार,सांग ना. तू जे काय बडबडतोयस ना, ते माझ्या शेकडो फूट वरून जातं आणि मग मला तो वीरगती मधला डायलॉग आठवतो. तू गलत युग का आदमी, गलत युग में पैदा हो गया है। (दोघेही हसतात.)

विशाल : मी अगदी बरोबर जन्माला आलोय. माझा जन्म अगदी Perfect युगात झालाय आणि मी मरणारदेखील Perfect युगात. पण तू केव्हा मरणार रे. नाही म्हणजे ज्योतिषाने तुला काहीतरी सांगितलंय म्हणून विचारतो. (कार्तिक अस्वस्थ ) कार्तिक यार, नर्व्हस होऊ नकोस हं. काय तू मरणाला एवढा घाबरतोस. मी बघ ना, मला यमदूत समोर उभा राहून म्हणाला ना की तुला वर न्यायला आलोय. तर मी म्हणेन. AIR INDIA ? म्हणजे नक्कीच चार-पाच तास उशिराने असणार. एक काम कर, एक एक बियर मारूया. मग जाऊया. पण तू काय म्हणशील त्याला ? म्हणजे, आता समज मी यमदूत आहे. आणि मी तूला विचारतो आहे. तुझी मरणवेळ जवळ आलेय. तुझा काळ आलाय. चल लवकर. मग तू काय उत्तर देशील.

कार्तिक: विशाल , तू परत त्या विषियाकडे वळलास. Please forget that subject, that fullish subject.

विशाल : Why? *का ? तू डॉक्टर ना रे. साल्या, दुनियेला तू दिलासा देतोस. मृत्यु काय त्याच्या (देवाच्या) हातात आहे. डॉक्टरीपेशाचा टेंभा मिरवतोस की* Apron *घातलास की तुला कर्णाची कवचकुंडलं घातल्यासारखी वाटतात आणि तू बिनधास्त होतोस. आपल्याकडे बघ. डॉक्टरीपेशातलं एक साचेबंद व्यक्तिमत्त्व. खूप फायदा झाला हा मला या पेशाचा. डॉक्टरीपेशा, सर्वांना हवाहवासा वाटणारा. तुला माहीतेय, बऱ्याच जणांना डॉक्टरीपेशा का आवडतो. त्याचं कारण एक गूढ आहे. एक ,एक रहस्य. पण मला उलघडलेलं. वयाच्या आठव्या वर्षीच स्त्रीचं शरीर चाचपायची सवय जडली, ती आजपर्यंत. पहील्यांदा लपून-छपून पण आता राजरोसपणे.* Afterall *डॉक्टर आहे ना मी. कोणाच्याही शरीराला कुठेही हात लावू शकतो. ऑपरेशनच्या वेळेस त्या उघड्या बायका पाहील्या की कसं भरून येतं. पाय थरथरायला लागतात. त्यांच्या त्या नग्न देहावरून हात फिरवताना स्वर्ग सुखाची प्राप्ती होते मला. नाजूक लुसलुशीत कोवळी कातडी. काही जणींची बर्फासारखी गोरी तर काहींची लाल. स्वत:ची वासना तृप्त करायचा हा एक अतिशय साधा आणि सोपा मार्ग. खूप स्त्रिया भोगल्या पण अजून माझी इच्छा काही तृप्त झालेली नाही. रोज नवनवीन शरीर. रोज नवीन कपडे घालायला लोकांना जशी मजा वाटते ना. त्यापेक्षा कितीतरी अधिक गंमत वाटते मला त्यांच्या शरीराशी खेळायला. त्या साल्यांना माहीत पण नसतं की आपल्याला बेशुध्द करून कोणीतरी आपल्या*

*शरीराशी खेळतयं. मेलेल्या प्रेताप्रमाणे पडलेल्या असतात त्या. आणि मी माझ्या अतृप्त इच्छा तृप्त करून घेत असतो. त्रास सुरू झाल्यावर हलकेच कहण्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही रिॲक्शन्स त्यांच्या चेहऱ्यावर नसतात. पण काही म्हणं यार.. जी मजा बाईमध्ये आहे ना ती मुलींमध्ये नाही.*

कार्तिक : *म्हणजे तू..*

विशाल : Yes, *ऑपरेशन थियटरची प्रत्येक स्त्री मी भोगतो. हे हॉस्पिटल माझं आहे. इथला मी सार्वभौम राजा आहे. मी माझ्या मनाप्रमाणे वागेन. मला कोणीही अडवू शकत नाही. आज काय नाही माझ्याकडे. सर्व आहे सर्व. पैसा,गाडी,बंगला,रोज-रोज नवीन शरीर. तू का एकाच शरीरात गुरफटून राहीलायसं माहीत नाही.बघ माझ्याकडे, स्वच्छंदी फुलपाखरू. प्रत्येक फुलातलं थोडं थोडं मध चाखायचं म्हणजे आयुष्याला एक रंगत येते.*

(टेलीफोनची बेळ वाजते. कार्तिक रिसिव्हर उचलतो.)

कार्तिक : हॅलो.

कविता : कार्तिक

कार्तिक : हा कविता, बोल.

कविता : कार्तिक तुझा आवाज. एं काय झालं ?

कार्तिक : नाही काही नाही. तू जेवलीस ?

कविता : नाही अजून.

कार्तिक : तू जेवून घे. मी सकाळीच येईन. थोडं काम आहे.

कविता : कार्तिक, काही प्रॉब्लेम झालाय का ? मी येऊ का तिथे.

कार्तिक : नाही नको. मी आहे. आणि तसा काही मोठा प्रॉब्लेम वगैरे काही नाही आहे. तू जेव आणि झोप. माझी वाट पाहू नकोस. मी सकाळीच येईन. चल बाय.

कविता : अरे पण.... ?

कार्तिक : चल ठेवतो मी फोन. थोडा कामात आहे मी. सकाळी बोलतो तुझ्याशी.
(रिसिव्हर ठेवतो)

कार्तिक: विशाल, *तू जो विचार करतोयस तो विचार तू करणं स्वाभाविकच आहे. पण* विशाल, *माझं एक ऐक. तू लग्न कर. मग तुला आयुष्य म्हणजे काय ते कळेल. हॉस्पिटलमधून थकून आल्यावर बायको जो चहा प्रेमाच्या दोन गोड शब्दांनी पुढे करते ना. त्याची रंगत काही औरच असते. टेन्शनमध्ये आल्यावर ती जेव्हा प्रेमाने आपली विचारपूस करते ना तेव्हा जग जिंकल्याचं समाधान* मिळतं. *भूक नाही म्हटल्यावर लाडात स्वत:च्या हाताने घास भरवते ना, तेव्हा तिच्या हाताचा*

*गोडवा जणूकाही त्या अन्नात उतरलेला असतो. आणि त्यामुळे तो घास पंचपक्वांनापेक्षा सरस वाटतो. रात्री डोक्यात आबोलीचा गजरा माळून रात्र स्वर्गसुखात घालवते ती अवस्था. कधीतरी प्रेतांशी खेळणं सोडून एखादया जिवंत स्त्रीचा उपभोग घे. आपल्या लग्नाच्या बायकोबरोबर जागणाऱ्या रात्री काही औरच असतात. तुझ्या नशीबाने जर तुला चांगली बायको मिळाली तर तुझ्या डोक्यात जे कुरूक्षेत्र माजलं आहे ना ते नष्ट होईल. आणि एक कर, तुझं पुस्तक पूर्ण होईल. तुझ्या पेशाबद्दलच लिही. मनात जे काही आहे ना ते उतरव पुस्तकात. मित्रा, मनातली गोष्ट सांगितली तरच मन हलक होतं. आणि तुझ्या डोक्यात हे जे काही विचित्र आहे ना ते काढून टाक. एखादी सुशिक्षित,सुसंस्कृत मुलगी बघून लग्न कर. मात्र तुझं हे पुस्तक पूर्ण कर आणि खमंग टायटल देऊन टाक. मी आणि माझा डॉक्टरीपेशा.*

(विशाल *हसतो.*) विशाल *असा वेडयासारखा का हसतोस. काय झालं तुला.*

विशाल : *मला काय झालंय.* Yes, *मला काहीतरी झालंय. आणि तू ते ऐकलस ना. तर तुझ्या पायाखालची जमीन सरकेल. मी माझ्या पुस्तकाचं टायटल ठरवलंय.* ***मी आणि माझा मृत्यु.***

कार्तिक : *हे काय टायटल आहे. मला सांग यामध्ये तू मृत्युविषयी लिहीणार ना. मग तू भविष्यकाळामध्ये पुस्तक लिहीणार की काय ?*

विशाल : *वेडा आहेस. मी पुस्तक भूतकाळावर लिहीणार.*

कार्तिक : *अरे, भूतकाळात पुस्तक लिहायला अजून तू अजून मेलेला नाहीस.*

विशाल : *हे तूला कोणी सांगितलं.*

कार्तिक : *म्हणजे ?*

विशाल : *मी एकशेएक टक्के मेलेला आहे.*

कार्तिक : *म्हणजे ?*

विशाल : *मुर्खासारखं म्हणजे म्हणजे करू नकोस. ऐक, तू आलास, तेव्हा घाबरला होतास आठवतं. हां, कारण तू एल्फिन्स्टन पुलाजवळचा अपघात बघून आला होतास. काय म्हणाला होतास तू.* A Terrific moment in my life. Yes, This is another Terrific moment in your life. *तर तो तू पाहीलेला अजब ॲक्सिडेंट तो मीच होतो. म्हणजे ज्याच्या अंगावरून टँकर गेला तो. तुला आठवत असेल तू मला बियर ओतणार होतास. तेव्हा मी म्हणालो, मी नुकताच भरपूर जेवलो आहे. मी एक शब्दही खोटं बोललो नाही हा. एल्फिन्स्टनवरून घरी यते होतो ना, तेव्हा वाटेत हाफकीनच्या गेटसमोर त्या तीन रस्त्यांच्या मध्यभागी आमच्यासाठी कुणीतरी मस्त जेवण आणून ठेवलं होतं. भरपेट जेवलो.*

कार्तिक : *तू हे असं विचित्र..*

विशाल : *(ओरडून) विचित्र नाही. मी जे काही बोलतोय, ते भानावर राहूनच बोलतोय. माझा मृत्यु झालाय. आता तुझ्यासमोर जो आहे ना, तो मी नसून माझा आत्मा आहे.*

*म्हणूनच पाहीलस ना, मी मघापासून कुठल्याही वस्तूला स्पर्श केलेला नाही. तू आलास, घाबरला होतास. मी तुला पाणी प्यायला सांगितलं, मी नाही दिलं. बियरसुध्दा तुलाच घ्यायला लावली. एवढंच काय, आठवत असेल तर आठवं. माझं पुस्तकसुध्दा तूच उचललंस.* टेलिफोनचा रिसिव्हर ही तुच उचललास *म्हणजे एकूण काय, तर मी कुठल्याही वस्तूला स्पर्श केलेला नाही. अरे मी कुठल्याही वस्तूला स्पर्शच करू शकत नाही.* कार्तिक *तुला फार घाम आलाय. तो टॉवेल घे आणि घाम पूस. मी टॉवेल उचलू शकत नाही ना.* (कार्तिक *टॉवेलने घाम पुसून टॉवेल* त्या नग्न स्त्रीच्या मुर्तीला पाहत त्या मुर्तीवर *टाकतो.*)

कार्तिक : *तू हे खरं..*

विशाल : *विश्वास नाही बसत.*

कार्तिक : *तू मला का बोलावलंस.*

विशाल : *मूर्खा. बहीरा आहेस तू. मी काय म्हणालो, मी कोणत्याही वस्तूला स्पर्शच करू शकत नाही. ते पेन*

*आणि ती डायरी घे. आणि लिहायला बस, वेळ घालवू नकोस. मला उशीर होतोय. आमची वेळ संपत आलेय, पहाट होतेय. चल लवकर* (कार्तिक सोफावर बसतो.)

डायरी आणि पेन कोण माझा बाप घेणार? (कार्तिक *पेन आणि डायरी घेतो.*)

*लिही. मी आणि माझा मृत्यु.* (कार्तिक *लिहीतो.*)

कार्तिक, *मला एक नविन कल्पना सुचलेय. हे पुस्तक तू लिहीतोयस ना, मग आपण तूझ्या मृत्युबददल लिहूया ?*

कार्तिक : *म्हणजे काय म्हणायचय तुला ?*

विशाल : *मला तेच म्हणायचय जे तू समजतोयस* कार्तिक *तू पण मर. बघ ना. मृत्युनंतरची गंमतच काही और असते. कसं हलकं हलकं वाटतं. तूलापण हलकं वाटेल.*

कार्तिक : *म्हणजे तू मला मारणार ? प्लीज.* विशाल, *मी तुझा जवळचा मित्र आहे. तू मला मारू शकत नाहीस. मला एक बायको आहे रे.(रडतो.) आजच तिने मला एक आनंदाची बातमी सांगितलेय. मी बाप होणार आहे. आज संध्याकाळी जेव्हा तिने मला हे सांगितलं तेव्हा मी किती आनंदी होतो. प्लीज. मला माझ्या बायकोसाठी, तिच्या पोटात वाढणाऱ्या माझ्या मुलासाठी जिवंत ठेव. त्यांना माझ्याशिवाय दुसरा कुणाचाही आधार नाही.*

विशाल : मलाही तुझ्याशिवाय दुसरा कुणाचाही आधार नाही. चल मरायला तयार हो. मी माझ्या हया हातांनी तुझा गळा दाबणार आणि तुला ठार करणार.

कार्तिक : तू मला मारू शकत नाहीस. कारण तूच तर म्हणालास, की तू कुठल्याही वस्तूला स्पर्श करू शकत नाही. मग तू माझा गळा कसा दाबणार.

विशाल : मूर्खा, मी भूत आहे. आणि कोणाला मारायचं असेल तर आम्ही दुरूनच त्याच्यावर आमचं प्रभुत्व गाजवतो. चल वेळ घालवू नकोस. मरायला तयार हो. आणि पळायचा वगैरे प्रयत्न करू नकोस. तुझे पाय जागचे हलणारदेखील नाहीत. खोटं वाटतय, तर बघ पाय उचलतात काय ते.(कार्तिक प्रयत्न करतो. पण तो फार घाबरलाय.त्याचे पाय उचलत नाही.) आता मी इथे बसून तुला मारणार. बघ तुझं डोकं सुन्नं झालंय. झालंय ना. (कार्तिक मान हलवतो.) तुझे हातपाय लटपटतायत. लटपटतायत ना ? (कार्तिक हा म्हणून ओरडतो.)

आता माझा हात तुझ्या गळयापाशी येतोय. माझा हात तुझ्या गळयाजवळ आलाय. तुला असं वाटतयं, जणूकाही काळसर्पाने तुझ्या गळयाला वेटोळं घातलंय.

कार्तिक : विशाल , प्लीज मला सोड. मला त्रास होतोय. विशाल.. (कार्तिक ओरडतो. आणि लगेच त्याला हार्ट अॅटॅक येतो. तो खाली कोसळतो. विशाल त्याच्या जवळ येतो. नाकासमोर हात नेऊन श्वास चालू आहे का पाहतो.

*नंतर रिलॅक्स आणि प्रसन्न चेहऱ्याने त्याचा हात पकडून हाताची नाडी तपासतो आणि ओरडतो.)*

विशाल : Yes, I got it. *मी जिंकलो.* कार्तिक *तू हरलास .*
*( वेड्यासारखा करायला लागतो.)*
*कसा काय डाव साधला. मला शहाणपण शिकवतोय. म्हणे लग्न कर, सुखी होशील. अरे मूर्खा, फुलपाखरं स्वच्छंदी असतात. साधी गोष्टं विसरलास. साला, माझ्याकडे जीवदान मागत होता. म्हणे मला एक बायको आहे. अरे असू दे ना तुला बायको. तू माझा जवळचा मित्र होतास. तू नसलास म्हणून काय झालं, मी आहे ना. तुझी जबाबदारी मी माझ्या शिरावर घेईन. चहा, हाताचा गोडवा, आबोलीचा गजरा सारं लक्षात आहे माझ्या. तुझ्या स्वर्गसुखाच्या रात्री मी जागवेन. तू काळजी करू नकोस. देव तुझ्या आत्म्याला शांती देवो.*
(विशाल *जाऊन ती ग्लासातली बियर पितो. शिल्पाजवळ जाऊन शिल्पावरील टॉवेल खेचतो.* त्या नग्न मुर्तीकडे पुन्हा विस्फारलेल्या डोळ्यांनी पाहू लागतो. *टेलिफोनचा रीसीव्हर उचलून फोन नंबर डायल करतो.* फोनवर कविता हसताना दिसू लागते. रिसिव्हर ठेऊन तो दरवाजा उघडून बाहेर जातो आणि बाहेरुन त्याच्या ओरडण्याचा आवाज येतो. एक गाडी त्याला उडवून निघून जाते.)

# परप्रांतीय



( एका बाजूला रेल्वे प्लॅटफॉर्म,दुस-या बाजूला दगड,लाकडे वगैरे पडलेली . मधोमध एक टेबल व खुर्ची टेबलावर एक शाईचा दऊत . लेखक बसून काहीतरी लिहीतोय . लेखकावर स्पॉट . पेन बाजूला ठेवून लेखक पुढे येतो . )

लेखक ः नमस्कार . मी मुंबईकर . अं......हं......चुकलात चुकीचा निष्कर्ष काढताय तुम्ही . मी इथ तुम्हांला परप्रांतीयांवर प्रवचन ऐकवणारा मुंबईकर नाहीए . तुम्ही या चेह-यावर या शरीरावर,या कपडयांवर जाऊ नका . मला तुम्ही पाहताय, ऐकताय,पण या रंगमंचावर मला सध्यातरी कुणीही पाहू किंवा ऐकू शकत नाही . मी लेखक वाटतो ना की शिक्षक . अं......हं......मी आहे एक सामान्य मुंबईकराचा जिवंत आत्मा . तुमच्यापैकीच एक जिवंत आत्मा . ऐकायला जरा वेगळच वाटतं ना . असो,मूळ मुद्दा हा की सदया आपण सगळे एका मोठया व्दिधेत अडकलोय . आपल्या लाडक्या शहराच्या मुंबईच्या प्रेमात . इथल्या भूमीपूत्राच्या न्याय्य हक्कासाठी सारेजण लढताहेत आणि लढायलाच पाहिजे . शेवटी प्रत्येक ठिकाणी भूमीपूत्राला न्याय हा मिळालाच पाहीजे . दुस-या प्रांतातून येऊन इथ कित्येकांना सरकारी नोकरी सहज मिळते आणि आमचा भूमीपूत्र मात्र नोकरीपासुन वंचित राहतो . या आमच्या लाडक्या मुंबई महानगरात हा गोंधळ का माजलय . आज या मुंबई शहराने सगळया जाती-

धर्माच्या लोकांना आपल म्हटलयं . जे काल परवा पर्यंत परप्रांतीय होते,तेही आता मुंबईकर झाल्येत . मला सांगा तुम्हांला काय वाटत? तुमच्या मते मुंबइकर कोणाला म्हटल पाहिजे फक्त मराठी माणसाला . की जे गेली कित्येक वर्षे इथं पिढयानपिढया राहतात पण अमराठी आहेत . मराठी भाषा मात्र अगदी शुध्द बोलतात त्यांना काय म्हणायचं? आमची मुंबई आहे महाराष्ट्रात . पण महाराष्ट्राच्या सरकारात कितीजण अमराठी . असा एक तरी पक्ष आहे का हो या महाराष्ट्रात की ज्यात एकही अमराठी नाही . पण तरीही आपल्याला कशान्कशासाठी तरी आंदोलन हे केलेच पाहिजे . कधी हिंदूत्वासाठी,कधी मराठीसाठी,कधी आणखी कशासाठी . माणूसकीसाठी आंदोलन मात्र कुणीच करत नाही . गंमत आहे की नाही . बरं परप्रांतीय हा सध्या गाजत असलेला एक महत्वाचा शब्द . एकदम गमतीदार शब्द आहे बघा . परप्रांतीय म्हणजे दुस-या प्रांतातला . भारत,पाकिस्तान झालं . आता आपण महाराष्ट्र,बिहार,युपी,गुजरात असे तुकडे पाडू . मला वाटतं देशाची आपण तंतोतंत फाळणी केली ना की एकदम कसं परफेक्ट होईल . हे परप्रांतीय वगैरे झगडेच राहणार नाहीत . मी काय म्हणतो,आपण एखादया मुंबईत येणा-या परप्रांतीय कुटुंबांच स्टडी केलं तर . म्हणजे बघा एखादा परप्रांतातून आपल कुटुंब घेऊन मुंबईला येतो . त्यानंतर तो परप्रांतीय मुंबईकर कसा होतो . किंवा मुंबईत येऊनसुध्दा तो मुंबईला परकाच राहतो का?त्यांच्या इथं येण्यामूळे आपल्या मुंबईत काय फरक पडतो आणि त्यांच्या कुटुंबावर पण आपल्या मुंबईचा काय प्रभाव पडतो . असे प्रश्न बरेच आहेत . उत्तरच लवकर सापडत नाहीत . ते बघा गोरखपूर-दादर मधनं उतरलेलं परप्रांतीय कुटुंब . कदाचित आपल्या सा-या प्रश्नांची उत्तरं या कुटुंबाचं स्टडी करून आपल्याला मिळतील .

(दादर रेल्वे प्लॅटफॉर्मवर सामानासह एक युपीचे भय्या कुटुंब . बाप वय **50**,आई वय **40**,मुलगा वय **20**,मुलगी वय **16**,उतरतात . बाप व टीसीचेसंभाषण .)

टी . सी . ः जुर्म किया है तो पैसा तो भरनाही पडेगा ना .

शंकर ः अव का वताए भैय्या,अगर पैसा होता तो गॉव छोडकर यहॉ बम्बई में क्यू आते .

टी.सी.ः देख,तु मुझे अपनी रामकहानी मत सुना ! तुम चार लोग गोरखपूर से दादर बिना टीकट आए हो तो उसका जुर्माना तो भरनाही पडेगा ना !

शंकर ः अब का बताए मायबाप.जो था वो गाडी में दूसरे साहब को दे दिया.अब टो हमरे पास कुछ नही. (तो टीसीच्या पाया पडत असतो.)

लेखक ः या पुढील सर्व संभाषण आणि कथेचा पुढचा टप्पा मराठी भाषेतूनच सादर होईल. शेवटी मराठीच इथली मायबोली आहे ना.

टी.सी.ः ए ,पाय नको पकडू.साला जो तो येतो पायाच पडत असतो.असे तुझ्यासारखे छप्पनजण मला डेली भेटतात.गाडीमधल्याला दयायला तुझ्याकडे पैसे होते.मी भेटल्या भेटल्या संपले.

शंकर ः खरंच साहेब.

टी.सी.ः गप रे.आणि काय रे पैसे नायत मग प्रवास करता कशाला ऑ.रेल्वे काय तुमच्या बापाची हाय काय,फुकट फिरायला.चल फाइन काढ लवकर.हे बघ तू पण युपीचा म्हणून तुला मी माणूसकी दाखवतो काय ?आता फालतू बडबड करू नकोस.तुमच चौघांचं फाइनच जवळजवळ पाच सहा हजारावर जातं.तू युपीचा म्हणून तुला फाइन लावत नाय.काय ?

शंकर ः तुमचं हे उपकार मी कधीच इसरनार नाय बघा.

टी.सी.ः उपकार सोड.हजार रूपये काढ.

शंकर ः हजार रूपये ?

टी.सी.ः हे बघ,तुझ फाइनच सहा हजारावर जातं. तुला चौकीत घेऊन गेलो की तुला तेवढे मग भरावेच लागतील.मग बोलू नकोस युपीचाच असून मदत नाय केली म्हणून.चौकीत मग मी तुझी काहीच मदत करू शकणार नाय बघ.मग ट्रेन पकडून परत गोरखपूरला जा.काय ? देतोयस हजार की जाऊया चौकीत.

शंकर ः साहेब आपण दोघंपण युपीचेच.तुम्हीच काय तरी समजून.

टी.सी.ः सायबाला आनी युपीला घाल चुलीत.साल्या टाइमपास करू नकोस.युपीचा म्हणून एवढा सांभाळला तुला.नायतर चलच तू.तू समजणारा नाहीस.तुला फाइनच मारतो आता.

शंकर ः शंभर रूपये देऊ साहेब.

टी.सी.ः आता काय बोलू तुला.एक काम कर.चल चौघांचे मिळून चारशे दे.आता तोंड उघडू नकोस.नायतर मग भर सहा हजार. (शंकर त्याला चारशे काढून देतो.)

तुम्ही साले खूप हरामी लोकं हा. कुठंकुठं पैसे लपवाल आणि नाटकं अशी दाखवाल की खरंच पैसे नायंत तुमच्याकडे. साले गाववाल्यालाच चुना लावायला बघता. जा आता. कशाला मरायला इथ येतात माहीत नाही. (टी. सी. जातो.)

लेखक : परप्रांतीयांना मुंबईकर परप्रांतीयाचा पहिला दणका.

पारो : मुंबयला आल्या आल्या चारशे रूपये गेले. आपल्या गावाला चारशेमध्ये किती दिस गेले असते आपले.

मुन्नी : बाबा, खूप थकाया झालंय. आता कुठं जायच आपन.

पारो : हाटलात राहायला जायचय, बक्कळ पैसा हाय ना आपल्याकडं.

मुन्नी : अम्मा, थोडा येळ इथंच बसूया. इथं लोकांची गर्दीपन नाय. माला लय ताहान लागलेयं.

लल्ला : अम्मा, तुम्ही लोक इथंच बसा, मी पान्याची बाटली तिथनं भरून आनतो.

मुन्नी : बाबा, भूकपन लागलेय. लल्ल्याला वडापाव सांग ना आनायला. तिथं तो मस्त गरम गरम देत व्हता. मुंबयचा वडापाव लय मस्त असतो.

पारो : आपला सोन्यासारखा गाव सोडून इथं आलो न आपन. आता हेच खायचं.

शंकर : लल्ल्या, हे घे पैसे, जा काय तरी खायाला घिऊन ये. (लल्ल्या पैसे आणि पाण्याची रिकामी बाटली घेऊन जातो.)

मुन्नी : बाबा, उद्या सकाळच्याला आपन मुंबय बघाया जावया काय ?

पारो : हं......आता फिरायचीच काम करा. मुंबय फिराया आलाव ना.

शंकर : सारखं सारखं कशाला बोलतीस पोरीला. अग लाहान हाय ती आपन मुंबयला पोचलो ना एकदाचं.

पारो : व्हय, पन आता खायाचं काय नी, राहायचं कुठं ?

शंकर : कामाचं पन बघया पायजे. आपला यादव पन मुंबयलाच कसला तरी धंदा खरतो ना.

पारो : व्हय, पन आपलं काय. त्या यादवाला कुठं शोधायचा आनी कसला धंदा करायचा.

शंकर : नोकरी मिळाली तरी चालल.

पारो : व्हय, जरा इस्टेशनची गर्दी बघा. मुंबईला एवढी लोक —हातात. आपल्यासाठी असल नोकरी शिल्लक.

शंकर : आता आलोय ना, इथं. बघू आता पुढचं काय व्हायचं ते व्हईल.

पारो : तर, व्हायच ते व्हईल, पोरं बोलली आनि बाप धावला मागनं. मुंबयला

जावया. आल्या आल्या चारशे रूपय घेऊन गेला मुडदा.त्या ट्रेनमधल्या सायबानं पन पाचशे घेतलान व्हते.

शंकर : अग तो येगळा हा येगळा.

पारो : सगळेच येगळे,आपल्याकडं पैशाची खांन हाय ना.

मुन्नी : अम्मा,गप आता माझं डोस्कं दुखतय.दोन दिस झालं तुझं गावचं पुरान काय संपतच नाय बघ.(हवालदार येतो.दांडा आपटत.)

लेखक : साहेब आले बघा,आता मला वाटतं स्टोरीत कायतरी फरक पडलाच पाहिजे.

हवालदार: काय,काय चाललय ?

शंकर : काय झालं साहेब ?

हवालदार: नाव काय ?

शंकर : शंकर रामशरन ठाकूर

हवालदार: कुठल्या ट्रेननं आलात.

शंकर : गोरखपूर-दादर

हवालदार: कुठं जाणार.

शंकर : मुंबईला

हवालदार: मुंबईला......,मग हे काय अमेरीका हाय काय.मी विचारतो जाणार कुठे.पत्ता काय.

शंकर : म्हंजे.

हवालदार: अरे म्हंजे,तुम्ही जाणार कुठे विरारला,ठाण्याला की वाशीला.

शंकर : माहित नाय.

हवालदार: माहित नाय.सामान कसल हाय.

पारो : आमच्या घरचं सामान हाय सगळं.

हवालदार: मग घर कुठाय ?

पारो : गोरखपूरात.

हवालदार: गोरखपूरात.म्हंजे महाराष्ट्रात नाय.

शंकर : नाय.गोरखपूर आणि नेपाळच्या मधोमध आमचं गाव हाय.

हवालदार: नेपाळ एकदम जवळ हाय काय ?

शंकर : व्हय.

हवालदार: मग तिकडं जायचं.इकडं कशाला आलात मरायला.च्या मायला जे तो उठतो इथंच कडमडतो.चला सामान दाखवा.

शंकर : साहेब,सगळं आमचच सामान हाय.

हवालदारः	मी कुठे बोललो माझं सामान हाय . काय हाय आम्हांला सगळयांच सामान चेक कराव लागतं . आजकाल बाम्बस्फोट वाढलेयत . आम्हांला स्ट्रीक इनस्ट्रक्शन आहेत . चल लवकर अजून भरपूर काम आहेत .

शंकर ः	आवो पन,

हवालदारः	ये......सामान दाखव बोललो ना,माझं टकूर फिरवू नकोस . नायतर ह्या दांडयान फोडून काढीन . साले उठसुट इथं येतात . आमची कामं वाढवतात आनी आमचच डोस्क फिरवतात . चल सामान दाखव . (सामानाची झडती घेतो . एका छोटया कॅनमध्ये घासलेट असतं . ) हे काय......? ऑ ?

पारो ः	घासलेट

हवालदाः	ते दिसतय मला,काय मुंबई पेटवायचा विचार हाय का ? ऑ ?

शंकर ः	साहेब,ते घरात होत ते तिनं घेतल बरूबर .

हवालदारः	का,घरात झुरळं मारायच औषध नव्हतं . घासलेट ट्रेनमध्ये घेऊन फिरणं किती मोठा गुन्हा आहे माहितेय काय ? तीन हजार रूपये फाईन हाय आनी दोन वर्षे सक्तमजुरी . पाढवु काय खडी फोडायला .

शंकर ः	चुकी झाली साहेब,परत नाय व्हनार .

हवालदारः	काय परत नाय व्हनार,अशा चुका पकडायचचं काम हाय आमचं . चल दोनशे काढ .

शंकर ः	साहेब,पैसे असते तर इथं कशाला बसलो असतो .

हवालदारः	म्हंजे,इथं प्लॅटफॉर्मवर राहायला आलायसं की काय गावावरून . सरकारचा जावय हायस काय ? चल पटकन दोनशे काढ आनी निघ इथनं . प्लॅटफॉर्म खाली करायचा .

पारो ः	अवो पन एवढया रात्री आमी कुठं जायचं ?

हवालदारः	कुठं जायचं . तो विचार इथं येयच्या आधी करायचा . तुम्हांला काय सरकारी क्वार्टस्मध्ये राहायचयं की काय . चल दोनशे काढ पटकन .

शंकर ः	पन साहेब,

हवालदारः	ए फुकनीच्या आता गुमान देतोयस . तुझ्या आयला,थांब तुझ्यावर आता केसच टाकतो . खडी फोडायलाच पाढवतो सगळयांना . घासलेट घेऊन फिरतायत ट्रेनमध्ये . (ओरडतो . ) ऐ कांबळे . आता मर . आता कांबळे आला ना की तो पाचशेपेक्षा एक रूपया कमी घेनार नाय आनी नाय दिलेस तर तुला डायरेक्ट जमाच करून टाकील .

शंकर ः	थांबा साहेब,देतो पैसे .

हवालदारः आता कसं,आपन फुकट कोनालाबी त्रास देत नाय.तू चांगला मानूस वाटलास म्हणून फक्त दोनशेच घेतले.तुला माहितेय यातले शंभर कांबळेचे.आता कांबळेला समजावायला पाहिजे.ते घासलेट लपव आधी.हा आनी थोडया टाइमान बाहेर पळा.नायतर परत साहेबाला कळलं तर मग तुझी जाम पंचाईत व्हायची.(लल्ला वडापाव आणि पाण्याची बाटली भरून आणतो.) वडा-पाव आणला काय ?

शंकर : लल्ला,साहेबांना दे वडा-पाव

हवालदारः नको-नको कशाला उगाच.गरम हाय काय ?

शंकर : घ्या ना.

हवालदारः कशाला आपल उगाच.(लल्ला पारोकडे वडा-पाव देत असतो.हवालदार त्यातला एक घेतो.)आता एवढा बोलतोयस तर घेतो.बरं,लवकर पळायच हा इथून.काय.साहेब जाम कडक हाय.आपन तुला आपला मानूस म्हणून सांभाळला.चल येतो मी.परत कांबळेला समजावयाला पायजे.(हवालदार वडा-पाव खात जातो.)

लेखक : मुंबईची सिक्युरीटी.किती जबाबदारीनं कामं करतातना सगळे.एवढया सामानातून घासलेट शोधल की नायं पठठयानं.मग,स्कॉटलंड यार्ड नंतर आपलाच नंबर ना.एकदम ॲलर्ट राहावं लागत.तर,या परप्रांतीयांनी या घासलेटनी अख्खी मुंबई जाळण्याचा प्रयत्न केला तर,शेवटी मुंबईची सिक्युरिटी किती इंपॉर्टेन्ट आहे ना.अरे पण घासलेट सहेब इथेच ठेवून गेले.

पारो : पाहयली काय मुंबय.जो तो पैसाच मागतोय.गावावरन झाडं आनलय ना पैशाचं.सगलं पैस वाटा आनी मग परत गावाकडं चला.

लल्ला : अम्मा,आता काय पन झालं तरी गावाला नाय जायाच.तू कशाला चिंता करतेस. मी कमवीन ना.

पारो : तर,काय पन तोंड.वडा-पाव खा.मेला एक वडा-पाव पन घिऊन गेला.(सगळे वडा-पाव खातात व पाणी पितात.)

मुन्नी : अम्मा,इथंच घोंगडी टाक ना लय झोप आलेयं.

शंकर : नको आपन तिथं समोर जावया,प्लॅटफॉर्मवर नको नायतर परत कोनतरी यायचा.(चौघे सामान घेऊन समोरच्या बाजूला जातात.सामान बाजूला ठेवतात,घोंगडी अंथरून झोपतात.काळोख.)

लेखक : मुंबई महानगरातली परप्रांतीय कुटुंबाची पहिली सकाळ.

(सकाळ होते . शंकर उठून बसतो आनी तंबाखू मळत असतो .)

चहावालाः चाय,गरम चाय .

शंकर ः पारो,उठ चल . सकाळ झाली . कशी दिली बाबा चाय .

चहावालाः दोन रूपये कटींग .

शंकर ः ए लल्ला,मुन्ने ऊठ . (चहावाल्याला) चार कटींग दे बाबा . (लल्ला,मुन्नी उठतात . शंकर त्यांना पाण्याची बाटली देतो . सगळे चूळ भरून येतात .) घ्या लवकर,चाय थंड व्हईल . तू चहाचा धंदा करतोस काय ?

चहावालाः नाय,मी कामाला हाय कॅंटीनवाल्याकडं .

लल्ला ः किती पगार हाय .

चहावालाः खाऊन,पिऊन तीनशे .

लल्ला ः ......तीनशे ?

पारो ः पायलीत मुंबय,तुला काय इथं धा हजाराची नोकरी मिळणार .

शंकर ः तू मुंबयचा की......

चहावालाः बिहारचा . पन आता मुंबयचाच .

शंकर ः म्हंजे .

चहावालाः या शहरात एकदा का कोन आला की तो इथलाच होतो . मग काय बी झालं तरी तो इथंन जातच नाय .

लेखक ः लाखातलं एक वाक्य बोलला बघा एवढासा हा चहावाला .

पारो ः अरं पो-या पन तीनशेत काय होतं .

चहावालाः इथं खान,पिनं आनी राहनं मला एकदम फी हाय . पगार तीनशे आनी कोन शेठ लोक खुशीनं पन देतात . मग मी त्यातलेच पैसे गावाला पाठवतो .

शंकर ः किती महिने झाले तुला इथं .

चहावालाः एक वर्ष झालं . माझा चुलता मला इथं घेऊन आला व्हता .

पारो ः किती तास काम करतोस .

चहावालाः चोवीस तास .

पारो ः म्हंजे

चहावालाः म्हंजे रात्री-अपरात्री पन गाडी येते ना . आनी या शहरात रात्रीपन दिवसच असतो . उल्टा रात्रीचा धंदा जोरात व्हतो .

पारो ः मग झोपतोस कधी . (चहावाला हसतो .)

चहावालाः कधी पन,येळ भेटला की .

शंकर ः मला आनी माझ्या पोराला कुठ काम मिळल .

चहावालाः इथं काम मिळणं लय कठीण हाय,तरीपन बघतो मी पैसे कमी मिळालं तर चालतील ना .

शंकर : व्हय चालतील .

चहावालाः रा -हनार कुठं

पारो : आता देवालाच माहीत . आता तर इथंच जोपर्यंत कोन इथून हटवत नाय .

चहावालाः बरं नंतर सांगतो मी . आठ रूपये झाले . (शंकर पैसे देतो . चहावाला जातो .)

शंकर : तुम्ही लोक इथंच थांबा . मी जरा एक चक्कर मारून येतो . बघतो कुठं काम मिळतं काय . पारो एक काम करं . तिथं बाजूला दगडी हायत बघ . तिथं चूल करं . ती बघ लाकडं पडलेयत . घरातनं थोडं सामान आणलयस ना . त्याचीच खिमटी बनव . मुन्ने अम्माला मदत कर . आनी लल्ल्या कुठं भटकायला जाव नको,गर्दीत हरवशील कळनार पन नाय . मी आलोच . (शंकर जातो . काळोख .)

(प्रकाश चौघेही उदास बसलेले .)

लेखक : किती दिवस खिमटीवर भागवनांर . आता आजचं काय . कठीण आहे बाबा . सोन्यासारख गाव सोडून कशाला उगाच शहरात आलात . बरं शहरात आलात तेही एवढया लांब . आता पुढे काय ?

पारो : शंभर येळा सांगितलं होतं आपला गाव बरा हाय . थोडीशी शेती हाय,एका टायमाच मिळतय,पुरं हाय . पन न्हाय . मुंबयला जायचयं . आता मरा मुंबयमधी . कोन उलटून बघायचा पन नाय .

लल्ला : आमी काम शोधतोय ना आता काम मिळत नाय त्येला आमी काय करनार .

शंकर : आज इथला पाचवा दिवस . जवळचं सगळं पैसे संपाया आलेत डोकपनं काम खरत नाय . आनी त्यात रोज पोलीस लोक पन सारखं येऊन धा वीस रूपये घिऊन जाताात .

मुन्नी : बाबा,मी पन शोधू काम . (शंकर तिलाजवळ घेऊन रडायला लागतो .)

शंकर : देवाची इच्छा,धीर सोडून चालायचं नाय . काय तरी करायलाच पायजे . तुमी लोक थांबा इथंच मी बघतो . काय तरी व्हईल . (शंकर विंगेत जातो .)

लल्ला : अम्मा,तू कशाला चिंता करतेस . आपनच थोडी आलोय इथं . आपल्या आधी बी किती लोकं आलेत ना इथं . आता त्या लोकांची घरंपन हायत इथं . आनी चांगला पैसा पन कमावतायत . मी पन बघ याच शहरात भरपूर पैसा कमविन . (विंगेत आरडाओरडा होतो . शंकरचा ओरडण्याचा आवज . मेलो,मेलो .)

पारो ः लल्ला,तुझ्या बाबांचा आवाज धाव . बघ काय झालं ते ?(लल्ला धावत जातो आणि शंकरला घेऊन येतो . अम्मा आणि मुन्नी त्यांच्याजवळ धावत जातात .)

अवो काय झालं हे,कोणी मारलं तुमाला . चला आपनं नाय राहायचं इथं . आपनं जावया आपल्या गावाला . लल्ल्या काय झालं तुझ्या बाबाला .

शंकर ः पारो,पारो . काय नाय . तू शांत हो .

पारो ः मुन्ने,पानी आन . (मुन्नी पाणी आणून शंकरकडे देते .)

मुन्नी ः बाबा पानी घे .

पारो ः काय झालं .

शंकर ः काय नाय . लोकांना सामान उचलू का म्हणून इचारलं तरं इथले कुली लोक धावले . आनी मारलं माला .

पारो ः सामान उचलन्यावर पन त्यांची मक्तेदारी हाय काय ?

शंकर ः हया शहरात परतेक गोष्टीवर परतेकाची मक्तेदारी हाय.

पारो ः मग जगायचं कस या शहरात .

शंकर ः जसे सगळे जगतात .

लल्ला ः बाबा आता तुमी लोकं कुठंबी जाऊ नका . मीच करतो कायतरी .

पारो ः अजून पण माझं ऐका . आपन परत जावया गावाकडं . हे शहर आपल्याल कधीच आपलं म्हननार नाय .

लल्ला ः नाय अम्मा,आपनं गावाकडं परतायचं नाय . इथंच —हयचं . याच शहरात तुला एक दिवस मी घरपन घेऊन देन .

मुन्नी ः आम्मा,माझा लल्ल्या बघ खरचं घर घेईल इथं . मला इस्वास हाय .

शंकर ः पारो,हे शहर वाटतं तेवढ सोप नाय .

लल्ल्या ः बाबा,आता मी पन हार माननार नाय . इथं जगायच असंल तर आपल्याला झुकून चालनार नाय .

लेखक ः पाहिलात,काम करायला गेलेला बाप मार खाऊन आला . आता पोरगा काहीतरी वेगळच बोलतोय . नक्की त्याचा विचार तरी काय आहे . त्याचे डोळे तर मला भलतच कायतरी सांगतायत . (काळोख )

(प्रकाश . पारो आनी मुन्नी जेवण करत असतात . शंकर येतो .)

शंकर ः मुन्ने,ए मुन्ने,हे घे फरसान .

मुन्नी ः फरसान . (जाऊन फरसानाची पुडी घेते .) अम्मा,बाबानं फरसानं आनलं बघ

मला . (फरसान खात .) हं मस्त हाय एकदम, धर तू पन खा . (पारोला भरवते) बाबा...... (शंकरलापण भरवते .)

शंकर : अगं मुन्ने, तू खा नायतर सगलं आमालाच भरवशील . लल्ला कुठाय .

पारो : सकाळीच कुठं गेलाय . पन आज तुम्ही लय खूष दिसताय .

शंकर : व्हयं त्या बाजूच्या सिग्नलवर गाडया थांबतात ना त्या पुसतो . पटकन लोक एक- दोन रूपये देतात . जाऊ दे तेवढे तर तेवढे . (लल्ला येतो .)

लल्ला : अम्मा, हे घे चारशे रूपये .

पारो : चारशे .

लल्ला : व्हयं . चारशे . आनी ही सगल्यांसाठी जिलेबी .

मुन्नी : जिलेबी . लल्ल्या मला, मला दे ना लवकर . (लल्ला मुन्नीला जिलेबीची पुडी देतो)

शंकर : लल्ल्या चारशे रूपये . तुला कोनी दिले .

लल्ला : आपनं कमवले . पटकन .

शंकर : लल्ल्या एकदम चारशे कमवलेस . तू चोरी बीरी तर......

पारो : नाय नाय, माझा लल्ल्या थोडी चोरी करनार . माझ्या पोरानं मेहनतीनं कमावलेयंत ते . व्हय ना रे लल्ल्या ! आता आपलं लवकरच चांगले दिस येतील . चल पोरा कायतरी खाऊन घे . (पारो लल्ला आणि मुन्नी जाऊन जेवणाकडे बसतात . शंकर येऊन पुढे एका दगडावर बसतो .)

(शंकरवर स्पॉट)

शंकर : चारशे रूपये, एका येळी, लल्ल्यानं कस कमवलं असतील लल्ल्यान चोरी . छया, लल्ल्यासारखा भोळा पोरगा आख्ख्या गावात नाय . चोरी नाय . पन मग चारशे रूपये . देवा, मी सगल्यांना घेऊन मुंबयला आलो . काय चूक तर नाय ना केली . सकाळपासून एवढया गाडया पुसल्या पन वीस-बावीस रूपये मिळाले असतील . मग लल्ल्याला चारशे रूपये . (मुन्नी मागून हाक मारते .)

मुन्नी : बाबा जेवायला यायचं नाय का ? लवकर मला भूक लागलीयं .

शंकर : हा हा आलो .

लेखक : बराच विचार करतो हो हा परप्रांतीय . चेह-याने पण प्रामाणिक वाटतो नाही .

(काळोख)

(प्रकाश . पारो तांदुळ निवडत बसलेली असते . मुन्नी छोटे दगड घेऊन खेळत असते . बाजूला रेडिओवर गाणे वाजत असते . लल्ला पिऊन येतो . )

लल्ला : ए मुन्ने, हे बघ . आज काय आनलय मी तुला चिकन . दे हे अम्माला . अम्मा, एकदम झक्कास बनव . काय . (मुन्नी पिशवी घेऊन अम्माला देते . )

अम्मा : लल्ला, तू दारू प्यायलास .

लल्ला : अं......दारू . नाय . (रागाने दोन्ही हाताने लल्लाची कॉलर पकडते . )

अम्मा : इकड बघ . तू दारू प्यायलास ना ?

लल्ला : (नजर लपवत) नाय अम्मा .

अम्मा : अम्माशी खोटं बोलतोयस . मुंबयला येऊन खरोखरच तू जिवाची मुंबय कराया लागलास आर तुझ्या बापानं कधी दारू ओठाला लावली नाय आनी आज तू दारू पिऊन आलास . आता तुझा बाप आला ना की लय खूष व्हईल बघ . तुला छातीत भरून घेईल . समदया जगाला ओरडून सांगिल बघा यूपीच्या गावखेडयातून या मुंबई शहराकडं पोरांचं भविष घडवायला पोरांना घेऊन मुंबयला आलो . पोरं एकदम मुंबय शहराचीच होऊन गेली . आज तुझ्या बापाला तुझ्याबद्दल खरा अभिमान वाटंल . माझा लल्ल्या मोठा झाला . ओरडून सांगल तो जगाला .

लल्ला : ओरडू नकोस . सगळी लोक इकडेचं बघतायत . (अम्मा लल्लाच्या कानाखाली मारते . )

अम्मा : भडव्या, मग पूजा करू काय तुझी . माझंच चुकलं चारशे रूपये आणले व्हतेस तेव्हाच तुला इचारलं असत तर . मी पन त्या टाइमाला तुझीच बाजू घेतली . मग तू रोज रोज पैसे आनलेस, मी कधीच इचारल नाय . मलापन मुंबयच्या पैशाची चटक लागली . गांव, गांव करता करता मीपन गावाल इसरली . तुझ्या पैशानी माझपन डोस्क पार फिरवून टाकल बघ . तुझा बापच खरा मानूस हाय बघ . मार खाल्लानं लोकांचा पन तरीबी वाईट काम कोनतबी केलान नाय . खरं सांग, कुठून आनतोस एवढे पैसे . कसली काम करतोस .

मुन्नी : अम्मा, कशाला मारतेस त्याला . माझा लल्ल्या कायबी उलटसुलट काम करनार नाय बघ .

अम्मा : मुन्ने गुमान जाऊन तिथं बस . नायतर तुझी बी कातडी सोलून टाकीन . सांग मेल्या कुठून आनतोस पैसे . तू असा नाय सांगनार .

(चूलीजवळ लाकडी काठी आणयला जाते. लल्ला निघून जातो. अम्मा लाकडी काठी घेऊन येते.)

लल्ला, कुठं जातोयस. ऑ, परत येशीलच ना. तुला सोडनार नाय मी अशी, मुन्ने फेकून दे ते मेल्याचं चिकन. (शंकर येतो.)

शंकर ः मुन्नेचे आई, काय गं काय झालं. तुझ्या डोळयात पानी.

पारो ः आपलं नशीबच फुटकं म्हनायचं.

शंकर ः मुन्ने काय झालं ?

मुन्नी ः लल्ला दारू पिऊन आला व्हता.

शंकर ः काय ?(जागेवरच बसतो.) लल्ल्या दारू पिऊन आला व्हता. आपला लल्ल्या आणि दारू पिऊन.

पारो ः व्हयं, आपला लल्ल्या दारू पिऊन आला व्हता. गावाला दूध पिनारा लल्ल्य मुंबयला दारू पियाला लागला.

शंकर ः पारो, आपन मुंबयला येऊन चूक तर नाय ना केली. पोरांच भविष्य बदलायला इथं आलो आनी आपली पोरं.

पारो ः हे सगळ माझ्यामुळच घडलय. मीच परतेकवेळी त्याची बाजू घेतली. आज माझाच रूपया खोटा ठरला. (रडायला लागते.)

शंकर ः रडू नकोस. सगळ ठिक होईल. ते बघ. लोकं तमाशा बघाया जमा पन झाली. इथं हे एक बरंय. फुकाचा तमाशा म्हंटला की तो बघाया चिक्कार गर्दी जमा होते. मदत करतोय सांगून लुबाडायला परतेकजन तयार असतो. मुडदयाच्या टाळवावरचं लोनीपन हे लोक सोडनार नायत.

पारो ः व्हयं हे मुंबयकर लय नीच लोकं हायत.

शंकर ः मुंबयकर. अगं पारो आता आपन पन मुंबयकरच. आठवतय ना. मुंबयला उतरल्यावर आपल्याला लुटणारा पयला मुंबयकर आपल्याच युपीचा व्हता. अगं मुंबय काय आनी युपी काय मानूस मानूसकी इसरला की सगळ संपतं. चल शांत हो तू. ती बघ मुन्नी किती घाबरतेयं. (पारो जाऊन बसते. मुन्नी तिच्या मांडीवर झोपते. शंकर पुढे दगडावर येऊन बसतो.)

लेखक ः काय म्हणाला हा, ऐकलात तुम्ही. मुंबयला येऊन हा पण स्वतःला मुंबईकरच समजायला लागला. मुंबईकराला दिलेल्या शिव्या हयाला पण लागायला लागल्या. एका गोष्टीत त्यानं पण स्पष्ट कबुली दिली की त्याला लुटणारा पहिला मुंबईकर युपीचाच. सगळा गुंता होत चाललाय हे असच कन्फ्यूजन

चालू राहील तर मुंबईकर नक्की कोण ते शोधणं मात्र खूपच कठीण होऊन बसेल. (हवालदार येतो.)

हवालदारः ए फुकनीच्या, तुझ्या आयला तुझ्या......ऑ......कार्ट कुठयं तुझं.

शंकर : काय झाल साहेब.

हवालदारः तुझ्या आयचं, एक कानफाटात मारीन ना तुझ्या की पटकन कळल तुला काय झालं ते. (पारो, मुन्नी धावत येतात.)

पारो : काय झाल साहेब. मुन्नेच्या बाबांच काय चुकलं काय ?

हवालदारः पोरगा कुठाय तुझा ?

पारो : का ? काय झाल ?

हवालदारः काय झाल. तुम्ही हरामखोर साले कुठून इथ येता आनी मग पैसा कमवायसाठी चो-यामा-या सुरू करता काय. तुमाला काय वाटतं आमी काय डयुटीवर दारू पिऊन झोपतो काय ? पोरगा कुठायं. सांग लवकर नायतर तुलाच ठोकीन आनी जमा करून टाकीन.

शंकर : साहेब, तुमी तर मला ओलखता ना. रोज आपन भेटतो ना इथं. मी नाय टुमाला धा-वीस रूपये देतो केव्हातरी.

हवालदारः ए तुझ्या आयला तुझ्या, काय किंमत करतोय काय रं माझी. ऑ. मी काय भिकारी हाय काय ? साल्या तुझा पोरगा ट्रेनमध्ये लोकांची पाकिटं मारतो. चैनी ओढतो. आज मी त्याला बाईच मंगलसूत्र खेचताना पायलायं. ती बाई ट्रेनमधून प्लॅटफॉर्मवर पडली. मरता मरता वाचली. समजलास काय ? साल्या तुझ्या पोराला आज मी पोचवूनच टाकनार बघ. सरळ सांग पोरगा कुठाय तुझा. (शंकर बोलायला जातो. हवालदार काठीने त्याला मारतो.) तुमच्या आयला, तुमच्यामुळेच आमची मुंबई खराब झालेय. मुंबईला कामासाठी येता. आनी काम नाय मिळालं की लोकांना त्रास देऊन आमची काम वाढवता. मग लोकं, प्रेस सगळे पोलिसांनांच दोष देतात. तुमा साल्यांना मुंबईत पायच ठेवायला नाय दिला पायजे. पोरगा आला की त्याला सरळ पोलिस स्टेशनात आनं. नायतर मग सगळयांनाच नेऊन फोडून काढीन बघ.

(शंकर, पारो आणि मुन्नीला जवळ घेतो. तिघेही रडत असतात.)

लेखक : काम नाय मिळालं की उपाशी मरण्यापेक्षा माणूस असाच काहीतरी मार्ग पत्करतो आणि मग त्यातूनच चोरी, दरोडा, खून, अपहरण असा गुन्हांचा चढता कम लागतो. गुन्हेगारांची लिस्ट काढून त्याचा आढावा घेताला की त्यात

जवळजवळ नव्वद टक्के लोक अमराठीच असतात आणि तेव्हाच खरा परप्रांतीयाचा मुद्दा उसळून वर येतो. अशा वेळेस भल्याभल्याचं डोकंही काम करत नाही. बापही परप्रांतीय आणि पोरगाही परप्रांतीय पण दोघेही वेगवेगळया पध्दतीचे मुंबईकर. असो आता या घटनेच कौटुंबिक रिॲक्शन हे पाहायलाच पाहिजे.

मुन्नी ः अम्मा, माझ्या लल्ल्यानं खरंच चोरी केली काय गं ?

पारो ः मुन्ने. काय सांगू आता तुला. आजचा हा दिस बघयच्या आत मी मेली असती तर लय बरं झालं असत बघ. तुझ्या हया बापाची इज्जत बारा गावात एवढी हाय लोकं त्याला देवमानूस म्हनतात. आनी आज त्या सायबानं तुझ्या बापाला चोराचा बाप म्हनून मारलान.

शंकर ः मुन्नेचे आई, शांत हो तू. मी ठीक हाय. वाईट कामाची फळं ही वाईटच असनार. (लल्ल्या धावत येतो.)

लल्ला ः अम्मा, अम्मा हे दोन हजार रूपये घे. आनी हे बघ मी बाहेर चाललोय धा-बारा दिवसांनी येईन. कोन मला इचारायला आला तर सांग. केव्हाच गावाला गेलाय. (पारो उठून त्याच्या कानाखाली मारते. तो खाली पडतो.)

पारो ः कोनाचा गळा कापून दोन हजार आनलेस. माझ्याकडं पनं दोनशे रूपये जमलेयत तुला देते. एक काम कर आमचा तिघांचा पन गळा काप.

लल्ला ः अम्मा.

पारो ः मेली तुझी अम्मा. मुन्ने जा सायबाला बोलव. जा बोलली ना. (मुन्नी जाते.) तुला गावावरून चोरी करायला इथं आनला. (काठी घेऊन त्याला मारते.) आज तुझ्यामुळं तुझ्या बापाला मार खावा लागला. (मारते.) धा गावात देवमानूस ठरनारा तुझा बाप आज इथं चोर ठरला.

लल्ला ः (पारोचे पाय पकडतो.) अम्मा मला माफ कर. मी चुकलो अम्मा. मी पटकन पैसे कमवायला गेलो. (मुन्नी व हवालदार येतात.)

पारो ः हा घ्या साहेब. घेऊन जा याला. आनी साहेब आमी लोक या शहरात पोराला चोरी शिकवायला की पोराच्या चोरीच्या पैशावर मजा मरायला नाय आलोय. वाटलं इथं आल्यावर पोरांचं कायतरी भविष घडंल. पन आमच नशीबचं खोटं निघालं. जा याला घेऊन. (हवालदार लल्लाला घेऊन जातो. पारो जाऊन शांतपणे दगडावर बसते. मुन्नी तिच्या मांडीवर डोकं ठेवून रडत असते. शंकर जाऊन प्लॅटफॉमवर बसतो.)

लेखक ः सांगा आता काय चर्चा करायची या विषयावर. परप्रांतीयाने पोटच्या मुलाला

पोलिसात पकडून पण दिलं. सोन्यासारखं गाव सोडून काय मिळवायला येतात हे लोक इथं. आणि मिळवायच्या नादात सारं सुख गमावुन बसतात. गरीबाला वाटतं पैसा म्हणजेच सगळी सुखं. पण एखाद्या श्रीमंताला विचारा त्याच्याकडे गाडी असेल,बंगला असेल,नोकर-चाकर असतील. पैसा एवढा असेल की आयुष्य मोजतानाच संपेल. विचारा त्याला सुखं आहे का रे बाबा. त्याचं डोकंपण थोडा वेळ चकावून जाईल. सुखं म्हणजे काय असत ? सगळयानांच पडलेला प्रश्न आहे हा. हया शंकरच्या कुटुंबाला इथं येऊन काय सुखं मिळालं. तोंडातून साधा शब्द न काढणारा लल्ला चोरी करायला लागला. गावाला पहिल्या धारेचं दूध पिणारा पहिल्या धारेची दारू प्यायला लागला. कोणी शिकवलं त्याला हे सगळं. मुंबईने की मुंबईकराने कोणाला कोणीही आणि काहीही शिकवायची गरज लागत नाही. परिस्थितीच माणसाला बरच काही शिकवते. (शंकर उठून पारोजवळ येतो)

शंकर ः मुन्नेचे आई,आपन काय इचार करून इथं आलो आनी काय झालं.

पारो ः लल्ल्या सुटून आला की गाडी पकडून सरळ गावाला जायचं.

शंकर ः पन गावाला लोकं धा प्रश्न इचारतील. त्येंना काय उत्तरं देयाची.

पारो ः त्ये तिथं जाऊन ठरवू या. पन आता इथं नाय राहायचं.

(एक समाजसेविका व तिचे दोन चार लोक येतात.)

**1** माणूसः ए उठा लवकर,हया आपल्या काळेबाई समाजसेविका. नमस्कार करा.

(तिघे हात जोडून नमस्कार करतात.)

समाजसेविकाः नमस्कार,नमस्कार. मी शांताबाई काळे. मुंबईत नवीन आलात वाटतं. काही चिंता करू नका. काहीही प्रॉब्लेम असेल तरी मी आहेच. काय नाव तुझं.

शंकर ः शंकर रामशरन ठाकूर

समाजसेविकाः कुठून आलास ?

शंकर ः युपी वरून,गोरखपूर जवळ आमचं छोटसं खेडेगांव हाय. दुर्गापूर. ही माझी बायको पार्वती. आनी ही पोरगी मुन्नी. पोराला पोलिस घिऊन गेले.

समाजसेविकाः का ? पोलिस का घेऊन गेले.

पारो ः चोरी करायला लागला होता.

समाजसेविकाः पार्वती,मी आहे ना. हे बघ स्वतःला असं एकटं समजायच नाही. मी सोडवेन तुझ्या मुलाला.

**2** माणूसः मॅडमची खूप वट आहे पोलिसात. चुटकीसरशी पोलिस सोडतील तुमच्या पोराला.

मुन्नी : माझ्या लल्ल्याला सोडतील पोलिस.

(समाजसेविका पुढे जाऊन मुन्नीला जवळ घेते.)

समाजसेविकाः होय. सोडतील पोलिस त्याला. काय नाव तुझ्या भावाचं?

मुन्नी : लल्लन. आमी त्याला लल्ला बोलतो.

(मुन्नीच्या डोक्यावर हात फिरवत.)

समाजसेविकाः तुझ्या लल्लाला सोडवायची जबाबदारी माझी. तुझं नाव काय ?

मुन्नी : माझं नांव जमुना शंकर ठाकूर. पन मला सगळेजन मुन्नीचं बोलतात.

समाजसेविकाः पोरगी खूप गोड आहे तुझी,पण काय अवस्था केलेयसं तिची. तुम्ही लोकं इथं मुलांचं भविष्य घडवायला आलायत ना.

शंकर : व्हय बाई. या पोरांसाठीच आम्ही इथं आलो. नायतर आमाला हे शहर बघाया येयाची कायच गरज नव्हती बघा.

समाजसेविकाः तुझ्या मुलाला मी उदया पोलिसस्टेशनमधून सोडवीन. उदया मी माझा वकील बरोबर आणेन. तुझी मुलगी खूप चुणचुणीत आहे बघ. तुझी इच्छा असेल तर हिचं नशीब बदलू शकतं. कसं रस्त्यावरचं जीवन दिलायस हिला. तुला नाही वाटत. तुझी पोरगी चांगली दिसावी. तिनं चांगलं खाणं खाव. चांगले कपडे घालावेत. एखाद्या चांगल्या मुलाशी लग्न व्हावं तिचं.

पारो : लयं वाटतं बाई. समद तुमी बोलतास तसच वाटतं बघा. पन हे होनार कसं. आमच्यावर तर इथं येऊन सारं आभाळच कोसळलयं.

समाजसेविकाः अशा अनेक मुलींचं आयुष्य उभं केलयं मी. तुझी पोरगी आजपासून माझी आहे. मी हीला माझ्याबरोबर नेते. चारच दिवसांनी हिला पुन्हा घेऊन येईन मग ओळखून दाखव मला,की ही तुझीच पोरगी आहे म्हणून. हिला मी आमच्या आश्रमात नेईन. तिथे हीला बरच काही शिकायला मिळेल. मग आपण एखादा चांगला मुलगा बघून हिच लग्न करू.

पारो : पन आमची मुन्नी तुमच्याबरोबर.

समाजसेविकाः मुलगी वयात आलेयं,आणि तिला तुम्ही इथं रस्त्यावर घेऊन राहता. जरा लोकांच्या नजरा बघा. मी काय माझ्यासाठी नेतेय काय तिला. आम्ही समाजाचे सेवक आहोत. पण समाजाचाच आमच्यावर विश्वास नाही.

पारो : इश्वास हाय बाई. पन.

समाजसेविका: पण काय . कशाला चिंता करतेस . मी आहे ना,मुन्नीचं भलं व्हावं अस वाटतं ना?तुला माहितेयं,तुझ्या मुलाला चोरीत पकडलाय . उदया पोरीवर पन नको तो आळ यायचा . आता तुम्हीच ठरवा . मी निघते,चला रे .

शंकर : बाई,बरोबर बोलताय तुमी . पोरगी मोठी झालेयं . रस्त्यावरचं जिणं जगण्यापेक्षा ती तुमच्याकडं जास्त चांगली राहयल . आमचा इश्वास हाय तुमच्यावर .

पारो : बाई,आमची एवढीच पोरगी हाय बघा .

समाजसेविका: मी तिला माझ्या पोरगीसारखी ठेवेन बस . हे माझं कार्ड घ्या . सोमवारी या भेटायला मुन्नीला . हे थोडे पैसे ठेवा . हे आमच्या संस्थेकडून तुम्हांला मिळताहेत . मुन्नीचा सगळा खर्च पण संस्थाच देणार . मुन्नी चल बेटा .

(मुन्नी पारोला जाऊन मिठी मारते . शंकर तिच्या डोक्यावरून हात फिरवतो .)

शंकर : मुन्नेचे आई,पोरांसाठीच इथं आलो ना . आता त्येंच्या भल्यासाठी काळजावर दगड हा ठेवावाच लागनार . जा मुन्ने,सांभाळून राहा,कोणाला दुखवू नकोस .

(समाजसेविका मुन्नीला घेऊन जाते . तिची माणसं जाताात . पारो शंकरच्या खांदयावर डोकं ठेवून रडायला लागते . काळोख . हळूहळू प्रकाश . पारो वाट पाहतेय शंकर येतो .)

शंकर : पारो,पारो आपलं नशीबच फुटक बघ .

पारो : काय झालं ?

शंकर : त्या बाईन

पारो : काय केल त्या बाईन ?

शंकर : त्या बाईनं दिलेला पत्ता चुकीचा होता . तिनं आपल्याला फसवलं म्हणूनच ती लल्ल्याला सोडवायला नाय आली .

पारो : म्हंजे आपली मुन्नी .

शंकर : आपली मुन्नी आपल्याकडूनच घेऊन गेली ती .

पारो : तुमी आधी पोलिसात जा . कुठं आसल माझी पोरगी . तुमी जा आधी .

शंकर : आलो जाऊन पोलिसात पण . त्ये म्हणतात या नावाची कोन बाई समाजसेविका नाय हाय .

पारो : काय ? मग माझी पोरं . कसल हो हे शहर . काय मिळवल आपण इथं . माझी एवढीशी पोर . मुन्ने कुठं ग शोधू तुला आता .

शंकर : मुन्नेचे आई,धीर सोडू नकोस . (लल्ला येतो .)

पारो : लल्ल्या,पोरा आपली मुन्नी .

लल्ला ः मुन्नी,काय झालं आपल्या मुन्नीला .

(म्युझिक,पारो लल्ल्याला सारं सांगते .लल्ला दोन्ही हाताने स्वतःचं डोकं पकडतो . काळोख . )

(हळूहळू प्रकाश,शंकर प्लॅटफॉर्मवर बसलेला असतो . पारो त्याच्याजवळ जाते .)

लेखक ः काय म्हणाल याला . परप्रांतीयाची कथा की व्यथा . हे कुटुंब इथे आपल्या नशिबाला दोष देतय . आन महिना झालाय पोरगी अजुन सापडली नाही . या विशाल महानगरीत कुठे शोधणार हे पोरीला . ते बघा गेले काही दिवस 'मी मुंबईकर' आंदोलन आगीसारख पेटत चाललयं . आता हे कुटुंब अजून कशाकशाला तोंड देणार .

(शंकर प्लॅटफॉर्मवरून विंगेत जातो . पारो घराच्याजवळ बसते .)

बॉम्बस्फोट,खून,दरोडे,चो-या सगळे आरोप यांच्यावर पडतायत . एक करतो आणि हजारांना भोगावं लागतं .

(लल्ला घरी येतो,पारो त्याला जेवण वाढायला घेत असते . लल्ला भांडयातून प्यायला पाणी घेऊन जेवणाच्या ताटाजवळ बसतो .)

नको तो व्याप करून घेतला या लोकांनी मुंबईला येऊन .

(लोकांचा घोळका येऊन लल्ला व पारोला मारायला लागतो . सामान लाथेनं उडवतात .)

**1** माणूसः मारा हरामखोरांना आमच्या मुंबईतून आम्हंलाच बाहेर काढायला निघालात काय . या पुढं इथं येणा-या प्रत्येक परप्रांतीयाला आम्ही असाच धडा शिकवू .

**2** माणूसः तुमच्यामुंळ आम्हांला आमच्याच शहरात नोक-या नाय मिळत . आमची पोरं नोक-या शोधतच मरतात .

**3** माणूसः आमच्या तोंडाचा घास छिनना-यांना आम्ही आता सोडणार नाय .

**2** माणूसः सगळे धंदे याच लोकांनी बळकावलेयत .

**1** माणूसः मराठी माणसाला त्याच्या मराठी मातीतच गाडून टाकलाय या लोकांनी . ना त्याला नोकरी उरली ना धंदा . मारा साल्यांना .

(सारे पारो व लल्लाला मारत असतात . दोघे कासाविस होऊन पडतात . सारे निघून जातात . दुस-या विंगेतून प्लॅटफॉर्मवर काही लोक शंकरला उचलून आणतात . शंकर रक्तबंबाळ होऊन मेलेल्या अवस्थेत . हवालदार व काही लोक त्याच्या बाजूला असतात . लेखक शंकर जवळ जातो . चहावाला पोरगा

लोकांना काहीतरी सांगत असतो. चहावाला धावत शंकरच्या राहत्या ठिकाणी येतो. तिथे पारो व लल्ल्या बेशुध्द पडलेले असतात. सामानं विखुरलेल असत. चहावाला तसाच मागे फिरतो. शंकरजवळ येऊन बसतो व शंकरच्या तोंडाकडे बघत रडायला लागतो. हवालदार सफेद कपडा शंकरच्या अंगावर टाकतो. लेखक उठून पुढे येतो.)

लेखक ः डोकच सुन होऊन गेलय. भूमीपुत्राला न्याय हा मिळालाच पाहिजे. भूमीपुत्राला जगायचं असेल तर परप्रांतीय मेला तरी चालेल. पण भूमीपुत्राला न्याय हा मिळालाच पाहिजे. ते बघा तिकडे. परप्रांतीय कुटुंब कसं रक्ताच्या थारोळयात शेवटच्या घटका मोजतय. आई मरतेय. पोरगा मरतोय. पोरीचा तर पत्ताच नाही. ती जिवंत आहे की मेलीयं,की कुठल्या कुंटणखान्यात विकली गेलेयं. कोणी मारलं यांना भूमीपुत्राने. आणि हा बघा मूर्ख बाप इथं रक्ताच्या थारोळयात निपचिप मरून पडलाय. परप्रांतीय ह्यालाच जास्त माज होता. भूमीपुत्राला वाचवायला गेला आणि स्वतः रेल्वेखाली आला. ह्याने इथं भूमीपुत्रासाठी जीव दिला. आणि भूमीपुत्रांनी तिथं ह्याच्या कुटुंबाचाच जीव घेतला. संघर्ष चाललाय संघर्ष,जीवन आणि मृत्युचा. नाव काय तर आंदोलन. कायदयात तरतूद,कोणीही देशात कुठेही जाऊन नोकरी धंदा करू शकतो. अरे कशाला कुठेही जाता असे कुत्र्यासारखे मरायला. मेल्यावर कायदा जिवंत करायला नाय येत. भाषण देणं खूप सोपं असतं. मराठी,मराठी,मराठी. ह्या शब्दाशिवाय काय शिकलो आपण.

तुमच्या घरातला टेबल तुटला की जा आपल्या भूमीपुत्र मराठी सुताराच्या घरी. सांगा त्याला टेबल तुटलाय जरा दुरूस्त कर. पाय वर करून टीव्ही बघत बसेल. पण टेबल दुरूस्त करायला येणार नाय. बिझी हाय सांगेल. बिझी हाय. एखादया भैय्याकडे जा . जेवणावरून उठून येईल टेबल दुरूस्त करायला. नोकरी धंदा परप्रांतीयांच्या हातात गेलाय. का ? आरडाओरडा करण्यापेक्षा कारणं शोधा जरा.

भूमीपुत्राला नोकरी पाहिजे,शिक्षण दहावी नापास. पगार पाच हजार पाहिजे. भैय्या ग्रॅज्युएट असून हजारावर नोकरी करायला तयार असतो. भूमीपुत्राला नोकरी साहेबासारखी सकाळी दहा ते संध्याकाळी पाच पर्यंतच पाहिजे. सहा वाजता नाक्यावर उभं राहायचं असतं ना. भैय्याला कितीही वाजता कामाला बोलवा. अर्धा तास आधी कामाला येईल आणि एक तास उशीरा कामावरून जाईल. आपण फक्त आपल्या मराठीचाच उदो उदो

करायचा . आपल्या भूमीपुत्रासाठी एक नवीन कायदा पण काढायला पाहिजे . नोकरीला घरात येऊन घेऊन जाणार आणि संध्याकाळी परत घरात सोडणार . दुपारी मालक स्वतःच्या हाताने भरवणार . धंदा करायला आपण कितीजण वाघाच्या काळजानं धंदयात उतरतो . किती मेहनत घेतो . चुकून दिवसा धंदा चांगला झाला की रात्री बियर बार . पायात स्लिपर घालायची पण वेटरला पन्नासची नोट टीप म्हणून . वर खेकडा प्रवृत्ती तर आपल्याला दैवी देणगी लागलेली .

आज काय काय केलयं भूमीपुत्रानं या भूमीसाठी ?

तुम्हांला काय वाटतं . का मुंबई आपल्या हातातुन गेली . बाहेरचे मुंबईत आले म्हणून,की आपण कामचोर झालो म्हणून ? विचारा प्रत्येकाने स्वतःच्या मनाला . मुंबईतले सगळे नाके तपासा . बघा किती कामचोर भूमीपुत्र सिगरेटी फुकत बसलेयत . सांगा त्यांना नोकरी आहे . करतोस काय रे बाबा . पहिला पगार किती ते विचारतील . डोळयावरची ढापणं बाजूला करा . अविचाराने लढू नका या प्रश्नाशी विचाराने लढा . तुम्हांला वाटतो तेवढा सोपा आणि सरळ नाही आहे हा प्रश्न . तुमचा तुम्हांलाच सोडवायचाय हा प्रश्न . सगळ महाभारत डोळयांनी पाहिलंत . आज घरी गेलात की रात्री झोपताना प्रत्येकाने स्वतःच्याचमनाला हाच प्रश्न विचारा .

**मी कोण ? मुंबईकर की परप्रांतीय ?**

(काळोख .)

# मैत्रिण



( ४ मुला मुलींच्या जोड्यादेखील या एकांकिकेत वापरता येतील.... कविता सुरु असताना त्यांचे लयबद्ध नृत्य... मुजिक आणि प्रकाशाचा खेळ.)

( स्टेजच्या एका बाजूला कॉम्पुटर डेस्क, घरातील बेडरूममध्ये व दुसर्या बाजूला ऑफिस, टेबलावर  लॅपटॉप, मागे  एका घराचे बेडरूम, स्टेजच्या मध्ये मोकळी जागा. )

( ती ऑफिसमध्ये फोनवर बोलत येते.)

ती:  मम्मा, हो गं.. पोहोचले बघ मी ऑफिसमध्ये. हो गं खाईन मी डब्बा वेळेवर. किती चिंता करशील. आता लहान आहे का गं मी. तूच तर नेहमी म्हणतेस ना कि सव्वीस वर्षांची घोडी झालीस म्हणून... hmmm.... अगं गरम गरम कसा खाणार

डब्बा ? आताच खावू का ? तू पण ना. आता फोन ठेवशील का.. म्हणजे तू थोडा वेळ दिलास तर मी ऑफिसचं थोडा वेळ काम करते. हो संध्याकाळी वेळेवर निघेन. किती गं चिंता करशील. चल बाय... ठेवते मी. अरे देवा, काय हा पसारा. hmm... हि मीनल पण ना.. एक नंबरची आळशी आहे. काम तर करणार नाही पण सुट्ट्या रोज हव्यात. नीटनेटकेपणा अजिबात कसा नाही ह्यांच्या कामात. म्हणतात ना स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही ते. आमच्या ऑफिसमध्ये आणि घरी दोन्ही ठिकाणी एकदम परफेक्ट लागू होतं हे. इकडे हि मीनल आणि तिकडे आमची मम्मा. केअरलेस पणाचा कहर आहेत दोघी.

( ती टेबलावरील सर्व वस्तू व्यवस्थित ठेवते. गाणं गुणगुणत लॅपटॉप ऑन करते. बाजूच्या बेडरूममध्ये तो येतो. व डेस्कटॉप ऑन करतो. )

आवाज : चल येते रे मी. आज मम्मीकडेच राहीन. तुझं काम आटपलं कि कॉल कर . तू कसला कॉल करणार म्हणा. तुला तुझ्या लेखनातून फुरसत मिळेल तर ना.

तो : साला, लेखक म्हंटलं कि सगळे फाट्यावरच मारतात. इतके अवाड्र्स मिळाले आहेत, पण ना घरच्यांना value ना बाहेरच्यांना. थोडा वेळ रिलॅक्स होतो. आज नेट कसा चालत नाहीये. नेटचा ना हा नेहमीचाच प्रॉब्लेम

झालाय. कसले पैसे घेतात हे लबाड लोक. नशीब याहू तरी सुरु आहे. थोडा वेळ टाईमपास याहू वर... अरे वा.. सकाळ सकाळ याहू वर किती गर्दी. क्या बात... ओह्ह्ह अर्ली मोर्निंग समोरून हाय तो पण मुलीचा... woww मृदुला नाईस नेम यार...

हाय मृदुला...

ती: नाईस नेम राहुल..

तो : थान्क्स मृदुला... युवर नेम इज अल्सो वेरी स्वीट.

ती: राहुल.. व्हेअर आर यु फ्रॉम ?

तो : मुंबई . and what about you..?

ती: same here.

तो : Are your Maharastrian..?

ती: yes… but how you know this…?

तो : अगं, मृदुला हे टिपिकल मराठी नाव आहे.

ती: हो का ?

तो : हो

ती: मग आपण पण मराठीच आहात का?

तो : हो

ती: ग्रेट. काय करता आपण.

तो : सध्या तर तुमच्याशी गप्पा मारतोय. थोड्या वेळाने काम देखील करू.

ती: काम पण करता का तुम्ही..?

तो : हो आलं काम कि करावंच लागतं ना. आपण काय करता?

ती: दुसर्यांची घरं सजविते.

तो : फुलांचा व्यवसाय आहे का आपला..?

ती: हो एवढंच बाकी राहिलं आहे आता. अहो मी interior designer आहे.

तो : ग्रेट

ती: ग्रेट काय आहे त्यात ? तेच तेच नेहमीचे बोअरिंग काम.

तो : स्वतःचे ऑफिस आहे कि कुठे जॉब करता ?

ती: दुसरीकडे जॉब परवडतो हो. निदान काही टेन्शन तरी नसतं. स्वतःचं असेल कि मरा स्वताच.

तो : ग्रेट यार.

ती: ओ ग्रेट डेन. नुसतं ग्रेट ग्रेट काय करताय?

तो : ग्रेट डेन...? मी इतकाही उंच नाही हो. उपमा थोडी खालची द्या.. अगदी गावठी म्हणालात तरी चालेल.

ती: हे हे हे हे ...(ती गोड हसते.) सॉरी... म्हणजे मला तसं नव्हतं म्हणायचं.

तो : इट्स ओके यार. दोस्ती में चलता है.

ती: हो का. आता हि दोस्ती कधी झाली म्हणायची.

तो : नाही झाली का. मग आता करुया का?

ती: सो स्वीट.. यु आर टू क्युट. आय यम इम्प्रेस. मृदुला दिक्षित.

तो : ओहह... ब्राह्मण.

ती: का हो ब्राह्मणांची एलर्जी आहे का तुम्हाला ?

तो : नाही हो असंच विचारलं. मी राहुल राजेशिर्के.

( तिचा मोबाईल वाजतो.)

ती: वेट...

तो : काही प्रॉब्लेम ?

ती: मॉमचा कॉल

तो : ओके

ती: काय गं , काय झालं आता ? आता मला काय माहित तू तुझं पर्स कुठे ठेवलंस ते. शोध ना तिथेच असेल. अशी कशी गं तू वेंधळी. शोध तिथेच असेल. नाही मिळालं तर मी घरी आल्यावर शोधेन. स्वतः कुठेतरी ठेवायचं आणि मग गावभर शोधायचं. ( मोबाईल ठेवते.) सॉरी यार.

तो : इट्स ओके. काही प्रॉब्लेम झाला होता का?

ती: नाही रे. आमची मॉम ना इतकी वेंधळी आहे बघ. अरे तिने तिची पर्स कुठे ठेवली आहे ते मला विचारते आहे.

तो : असू दे गं. डोकं शांत ठेव. मॉमला नको काही बोलूस. तू म्हणजे ना कडकलक्ष्मीच आहेस बघ.

ती: हे हे हे हे ...(पुन्हा हसते) कडकलक्ष्मी. काय पण नाव ठेवलंस रे. तुला अरे तुरे केलं तर राग नाही येत ना. मी २६ ची आहे.

तो : इथे २८. अरे तुरे आवडेल मला. वाटतंच नाही ना कि आज आपण पहिल्यांदाच चॅट करतो आहोत. तू खूप स्वीट आहेस.

ती: हो का ?

तो : हो

ती: हे हे हे हे...(हसते.) चल बाय राहुल. थोड्या वेळाने बोलूया का ? थोडं काम आटपते.

तो : ओके डीअर. टेक केअर

ती: ( याहू बंद करते. ) कार्टूनच आहेस तू.... पण खूप छान आहेस आवडलास मला.

तो: मृदुला, क्युट नेम... गोड मुलगी आहे. सध्याच्या चालू मुलींमध्ये पहिल्यांदाच याहूवर कुणी इतकी सिम्पल आणि चांगली मैत्रीण मिळाली. इतक्या वर्ष्यांनी कुणी

मनमोकळं बोलणारं मिळालं. कशी असेल दिसायला..? नक्कीच खूप गोड.. पहिल्या भेटीत जिंकलं तिने मला. जे आमच्या इंडस्ट्रीमध्ये सुद्धा आजपर्यंत कुणालाही जमले नाही.

मृदुला.... मृदू... कोमल... स्वभाव थोडासा कडक आहेच पण मुलगी खूप गोड आहे. अगदी जशी एक आपल्यावर निर्मळ प्रेम करणारी मैत्रीण असावी तशीच....

( तो उठून कवितेमध्ये रमत स्टेजच्या मध्यभागी येऊ लागतो.)

तो: रंगात रंगलो प्रेमाच्या
तूच गोड अप्सरा...
नील नभाला गवसली
निर्मळ तू वसुंधरा....

( ती उठून कवितेमध्ये रमत स्टेजच्या मध्यभागी येऊ लागते .)

ती: काय जादू तू केली
नकळत मन तुजकडे
सोबती मज मिळाला
ये ना रे मजकडे....

(दोघे एकमेकांचे हात हातात घेतात.)

तो :	धुंद जाहल्या वाटा
क्षणभर थबकला श्वास…

ती :	सहजीवनी तो आला
हे सत्य असे कि भास…

तो :	एक मास गुजरला आज
चढवला शृंगाराचा साज

ती:	देहभान विसरले राजा
बघ सोडून  दिली लाज...

( दोघे एकमेकांच्या मिठीत. प्रकाश हळू हळू कमी होतो. )

( प्रकाश दोघे ऑन लाईन गप्पा मारत आहेत. )

ती:	हे बघ हा नाटक करू नकोस. ऑनलाईन का होईना बायको आहे मी तुझी. काल का आला नाहीस ते आधी सांग पाहू आणि खोटं बोलू नकोस हा. खरं सांग ड्रिंक्स करायला गेला होतास ना..?

तो :	अगं, एका प्रोजेक्टची मिटिंग होती. तेव्हा...

ती :	म्हणजे काल तू ड्रिंक्स केलंस. बरोबर ना..? काय विचारतेय मी ?

तो :	अगं , मला न तुला काहीतरी सांगायचं  आहे.

ती : विषय बदलू नकोस. माझी शपथ घेतली होतीस ना तू. बरोबर.. मी मेले तर काय फरक पडणार तुला. तू पी. खूप दारू पी.

तो : अगं पी काय. बेवडा आहे कि काय मी. तुला सांगितलं ना मिटिंग होती म्हणून..

ती : असल्या कसल्या रे तुझ्या मिटिंग ज्या दारू प्यायल्या शिवाय होतंच नाहीत. नक्की फोटोग्राफरच आहेस ना ?

तो : तुझे फोटो काढून प्रूव्ह करू का ?

ती : काही गरज नाही. तुझ्या त्या मेल्या मॉडेल आहेत ना... त्यांचेच काढ हो फोटो. भरपूर काढ. अगदी पोट भरेपर्यंत.

तो : हा हा हा हा.....( तो मोठ्याने हसतो.) पोट भरे पर्यंत...

ती : हो ना.... तुला रोज सुंदर सुंदर मॉडेल भेटतात ना. मग आम्हाला केलेलं प्रॉमिस कसं आठवेल तुला. आणि हो... कसले कसले फोटो काढतोस रे त्यांचे...?

तो : कसले म्हणजे ?

ती : अरे कसले म्हणजे... फोटो काढताना अंगावर काही घालतात कि आपल्या अश्याच नुसत्या....

तो : हा हा हा ...(तो पुन्हा हसतो.) अगं, त्याला न्यूड फोटोग्राफी म्हणतात. ती नाही करीत मी. पण तरीही

मॉडेल्स म्हटल्या कि कपडे कमीच असणार नाही का. तुझे काढूया का तसले फोटो..

ती : चावटपणा करू नकोस. काल त्या भेटल्या तर विसरून गेलास ना मला. जा बोलू नकोस

तो : अगं असं काय करतेस.

ती : मला नाही बोलायचं तुझ्याशी .

तो : शोना रागावला माझा

ती : hmmm

तो : hmmmmmm

ती : मी नाही बोलणार.. जाते मी. ( ती लॉग आउट होते. व बाहेर निघून जाते. )

तो : अरे.. गेलीस... ( तो उठतो.) रागावून नको ना जाऊस. आयुष्यात खूप वर्ष्यांनी कुणावर तरी भरभरून प्रेम करायला मिळालं आहे. तू देखील किती प्रेम करतेस गं माझ्यावर. सगळे म्हणतात कि मी जरासुद्धा रोमॅन्टिक नाही. तुला माहितेय आजपर्यंत सस्पेन्स, कॉमेडी, म्युझिकल सर्व प्रकारच्या स्क्रिप्ट लिहिल्या. खूप अवार्ड्स पण मिळवले. पण रोमॅन्टिक नाही जमलं गं कधी. म्हणजे बघ ना प्रयत्नच केला नाही कधी. कविता, कथा, नाटक सर्वांमधून लोकांना खूप हसवलं आणि खूप खूप रडवलं सुद्धा. पण जे आजपर्यंत जमलं नाही ते आता तू

भेटल्यानंतर जमेल असं वाटायला लागलं आहे. प्रेमाची दिवास्वप्नं पाहायला कधी वेळच मिळाला नाही. घर, संसार, कर्ज, अपेक्षा ह्या मधेच नेहमी गुंतून राहिलो.

( मोबाईल वाजतो .)

तो : हा नमस्कार. बोला. नाही बिझी  नाही बोला तुम्ही. इवेन्ट.... कधी आहे.... पुढल्या महिन्यात ४ दिवस कोल्हापूर. ठीक आहे पण जरा आधी कळवलंत तर बरं होईल. म्हणजे तसं तुमचं काम फायनल असेल तर मग दुसरं काम नाही घेणार त्यावेळी. स्क्रिप्ट कुठे लोकेशनवरच लिहायची का ? ठीक आहे. मग काही प्रॉब्लेम नाही फक्त डेट कनफर्म करा आधी. आमच्या लेखकांचे हेच वांदे होतात हो. हिरो - हिरोईनला तुम्ही लोक ४ महिने आधीच साईन करता. त्यांच्यासाठी खूप सेवा सुविधा पण असतात. ते व्हॅनिटी व्यानमध्ये मस्त आराम करत असणार आणि आम्ही लोकेशनवर कुठल्या तरी सुमोमध्ये धूळ खात  आणि मच्छरांचा सामना करीत ४ तासांनी होणारा कॉमेडी कार्यक्रम लिहित बसणार. असो चालायचं. आता सवय झालेय. बाकी सर्व मस्त चाललंय आमचं. ठीक आहे ठेवतो. ( मोबाइल कट करतो.)

हीच खरी गम्मत आहे हा आम्हा लेखकांची. कोणत्याही चित्रपटाचे हिरो - हिरोईन सगळयांना माहित असतात. पण ज्याचे संवाद बोलून ते स्टार होतात तो असतो कुठं तरी एका बाजूला पडलेला. तो जेवला कि नाही ते सुद्धा कुणाला माहित नसतं. चालायचं.

( मोबाईल वाजतो .)

तो : अरे वाह, आज फोन सारखा वाजतोय. हॅलो, हा बोला सरजी. बस मजेत तुम्ही सांगा. अच्छा किती एपिसोड लिहून पाठवू...? नक्की नक्की... उद्या सकाळी पाठवतो २ एपिसोड. स्क्रीन प्ले , डायलॉग दोन्ही पाठवू ना. Ok हो हो , उद्याच देतो. सेट वरच भेटू आपण.. ओके बाय बाय. पाहिलंत. परवाचे टेली कास्टचे एपिसोड आम्ही पाठवणार आणि लेखक म्हणून सरजी फुटेज खाणार. चालायचे. निर्माते तेच आहेत ना मग लेखक , दिग्दर्शक सबकूछ तेच.

काही क्षणापूर्वी प्रेम रसामध्ये डुबक्या मारीत होतो. जिला कधी पहिले देखील नाही तिच्याशी अधिकाराने बोलत होतो. आणि आता प्रत्यक्ष जीवनात मात्र. ( मंद हसतो.) तुम्हाला माहित आहे का.... म्हणूनच माणसाला दिवास्वप्नं खूप खूप आवडतात.

वास्तव सोडून आता खरंच स्वप्नात जगावंसं वाटायला लागलंय...

ह्या छोट्याश्या आयुष्यात पण बरंच काही भोगलंय.....

( काळोख.)

( हळू हळू तिच्या बेडरूम मध्ये प्रकाश पसरतो.)

ती : राहुल, बघ ना रे.... झोप पण उडवून टाकलीस ना माझी. तुझ्याशी भांडण करते रे पण ते तात्पुरतच. खरोखरची नाही भांडत तुझ्याशी. म्हणजे खरं सांगायचं तर तुझी खूप आठवण येतेय. स्वप्नात जगायला शिकवलस तू. किती गोड बोलतोस. तू कोण आहेस माहित नाही रे पण तुझा सहवास खूप आनंद देतो मनाला. डोळे बंद करून... दोन्ही हात पसरून फक्त तुलाच बोलावते आहे. ये ना रे माझ्या राज्या. ह्या चार भिंती मध्ये फक्त मीच माझी होते. पण तुझ्या आसपासच्या वावराने हि बंदिस्त खोली पण अथांग पसरलेल्या क्षितिजा सारखी वाटायला लागली आहे. हे माझ्या मनात उमटणारे शब्द तुला एखाद्या लेखिकेचेच वाटतील. कदाचित असतील हि कुणा एखाद्या लेखिकेचे. कुणाच्या तरी प्रेमात गुंतून लिहिलेले. मीही वाचले असतील कुठल्याश्या पुस्तकात.

पण मला नाही फिकीर त्याची. चोर म्हण नाहीतर साव पण तुझ्यासाठी मन वेडे झाले आहे माझे. ये ना रे... ( तो तिच्या जवळ येतो. )

ती : तू आलास कि स्वप्ने पण जगायला लागतात...
हव्या हव्याश्या गोष्टी मनाप्रमाणे वागतात....
असेच घट्ट कवेत  घेवून बस मला
तुझ्या आठवणी बरंच काही मागतात....

( दोघे एकमेकांच्या मिठीत. प्रकाश हळू हळू कमी होतो. )

( प्रकाश.. दोघे ऑनलाईन गप्पा मारत आहेत. )

तो : काय गं किती उशीर केलास आज यायला. कुठे होतीस इतका वेळ. आणि ऑफिसमध्ये आहेस कि घरी?

ती : मला नाही बोलायचं तुझ्याशी.

तो : खरंच नाही बोलायचं ?

ती : हो

तो : मग काल रात्री आठवण का काढत होतीस. किती उचक्या लागल्या मला.

ती : हो का..?

तो : मग काय खोटं बोलतोय का मी....?

ती : मला काय माहित. आमची शपथ घेऊन दारू प्या. मी मेले तरी काय फरक पडणार तुला.

तो : असं नको ना बोलू शोना...

ती : मेला तुझा शोना... मला नाही बोलायचं तुझ्याशी.

तो : मग एक पप्पी तरी दे.

ती : त्या मॉडेल आहेत ना तुझ्या त्यांचीच घे. जा तू...

तो : खरंच जाऊ ना.

ती : हो जा..

तो : बघ नक्की जाऊ ना

ती : जा

तो : ठीक आहे. ( तो लॉग आउट होतो.)

( ती अस्वस्थ... ती उठून बाहेर येते.)

ती : वेड्या मना घे भरारी
उजळू दे रात सारी...
दिवस फुलत फुलताना
श्वासाची ती उभारी... ॥ १ ॥

मन सल सले तो हा गंध
मनी जडला रे एक छंद....
सांग कसे पुसू कुणाला
वारा ही वाहे मंद...॥ २ ॥

का प्रेम दूर जाई

चंद्रहि अंत पाही...
स्मित रवी किरणांचे
पडले त्या प्रवाही ॥ ३ ॥

तो: गुज ते तुझ्या मनाचे
कळले मज मनाला
बेधुंद झाली आस
कळ लागली घनाला ॥ ४ ॥

( दोघे हातात हात घेवून फेर घालतात. )

( दोघे समुद्र किनारी बसलेले आहेत. )

तो : किती अजब आहे ना हा समुद्र. कधी शांत तर कधी उफाळलेला. अगदी आपल्या मनासारखा.

ती : वेड्या जर उफाळ उठलाच नाही तर मग मनाला मनच का म्हणावे ?

तो : मृदुला... खूप जगलो गं तुझ्याबरोबर. आता मरण जरी आले तरी काही राहिल्यासारखं वाटणार नाही.

ती : असं कसं मरायला देईन मी तुला... मलाही जगायला तूच तर शिकवलंस. आणि जर मरायचंच असेल ना तर मग चल दोघेही उडी मारू एकत्रच, अगदी याच समुद्रात. ह्या जन्मी भेटणं शक्य नसेल तर पुढच्या जन्मी भेटू... फक्त

तू आणि मी. ( ती त्याचा हात धरून त्याला खेचते . दोघे समुद्रात. काळोख . समुद्राच्या लाटांचा आवाज. )

( ऑफिस प्रकाश. तो कॉम्पुटर टेबलवरून घाबरून उठतो. चेहऱ्यावरचा घाम पुसतो. )

तो : जन्म... मृदुला , खरंच असं वाटायला लागलं आहे कि आपलं दोघांचं जन्मोजन्मीचं नातं आहे. अगं पण मी तुला फसवत तर नाही आहे ना. कधी कधी माझं मनच मला खात राहतं आणि... ( ती buzz देते.)

ती : काय हो, कसला विचार करताय..? कुणी दुसरी मिळाली का..? इतका वेळ झाला मी online आलेय पण तुम्ही आज हाय पण नाही केला.

तो: sorry यार , ते काम करीत होतो. लक्ष्य नाही गेलं. कशी आहेस तू..?

ती: राहुल, काय लपवतो आहेस..? हे बघ काय झालं ते खरं खरं सांग.

तो : काही नाही गं.

ती : हे बघ बायको आहे मी तुझी. कळलं ना. मला शेंड्या नको लावूस.

तो : काही नाही गं. असंच जरा.

ती : बरोबर... यापुढं नाही विचारणार. तसा माझा काय अधिकार आहे म्हणा तुझ्यावर. मी इथे याहूवर तुझ्यासाठी थोडासा टाइमपास आहे. उद्या दुसरी भेटली कि मलाही विसरून जाशील. मीच मुर्ख आहे जिने तुझ्यात जीव गुंतवून घेतलाय.

तो : अगं ...

ती : जा तू... मला नाही बोलायचं आहे तुझ्याशी.

तो : मृदू...

ती : मेली मृदू... विसरून जा मला.

तो : असं का बोलतेस गं...

ती : खरं तेच बोलतेय.

तो : बबल्या...

ती : काही मस्के लावायची गरज नाही आहे. मीच मुर्ख आहे जी तुझ्यावर इतक प्रेम करायला लागली आहे.

तो : सगळेच असं वागतात. आता तू सुद्धा... कधी कधी ना मला असं वाटतं कि माझं स्वतःचं असं काही अस्तित्व उरलंच नाही आहे. कधी काम करवून घेणार्यांकडून अवहेलना तर कधी घरच्याच माणसांकडून. पैसा असेल तर सर्व नाती नाहीतर सर्वच शून्य...

ती : तू ना माझ्यापासून काहीतरी लपवतो आहेस. हे बघ काय झालंय मला सांगशील का ? मला सांग, कोण कोण असतं तुझ्या घरी..?

तो : सगळेच असतात आणि कुणीही नसतं.

ती : सरळ सांगणार आहेस का रे. सांग मला कोण कोण असतं घरी. आणि काय काय घडलं आहे तुझ्या आयुष्यात.

तो : जे घडत गेलं ना आयुष्यात तेव्हाच खरी नाती कळायला लागली. आपण खूप पैसा कमावतो ना तेव्हा सगळी नाती गोड असतात. सगळी माणसं आपली असतात. आणि जेव्हा पैसा गमावतो ना तेव्हा आपण फक्त एकटेच असतो. मग कुणीच नसतं आपलं.

ती : घरी कोण कोण असतं तुझ्या..?

तो : आईवडील कधी इकडे असतात तर कधी गावी आणि ती.

ती : ती म्हणजे... म्हणजे तुझी बायको..? मी काय विचारतेय तुला. ती म्हणजे तुझी बायको ना.

तो : हो

ती : तुझं लग्न झालं आहे..? आणि तू हे कधीच सांगितलं नाहीस मला.? माझ्याशी खोटं बोललास तू.

तो : अरे... मी कधी खोटं बोललो. अगं आपला कधी विषयच नाही झाला माझ्या लग्नाचा. आणि माझं लग्न झालं आहे म्हणून तू आपली फ्रेन्डशिप तोडणार आहेस का..?

ती: मुलं किती आहेत तुला..?

तो : नाही.. मुलं नाहीत. म्हणजे....

ती : बस्स.... मला अजून काही ऐकायचं नाही आता. तुझ्यावर विश्वास ठेवला रे मी आणि तू...

तो : अगं पण...

ती : मला तुझ्याशी नाही बोलायचंय. प्लीज.

तो : शोना...

ती : अजून किती मुलींशी असाच खेळतोस रे याहूवर

तो : तुला मी फ्लर्ट वाटलो का गं..?

ती : अजून काय वाटायचं बाकी राहिलं आहे. चल मी लॉग आऊट होते. मला काम आहे थोडं.

( ती लॉग आउट होते. तो कपाळावर हात ठेवून बसतो. )

( background ला गाणे वाजत आहे( अल्बम = स्वर पावसात भिजत आहे- वैशाली सामंत.). दोघे हि रडवेले एकत्र येतात. गाण्यावर फेर धरतात व एकमेकांच्या मिठीत एक होतात.)

तो : मृदू...

ती : बोल ना जान...

तो : काही नाही thanks .

ती : थान्क्स का रे...? हे बघ online का होईना बायको आहे मी तुझी. समजलं ना. आणि आता पुन्हा thanks म्हणालास ना तर लक्षात ठेव. चावूनच काढेन तुला.

( तो हसतो.)

ती : असाच हसत राहा आयुष्यभर. मला तू असाच आवडतोस. मी असेन किंवा नसेन पण तू जेव्हा जेव्हा हसशील तेव्हा तेव्हा मला सोबत अनुभवशील. ह्या जन्मी नाही भेटलो तरी पुढल्या जन्मी नक्कीच भेटू..

तो : शोना...

ती : बोल ना राज्या....

तो : काही नाही.

ती : असं कसं काही नाही...? इकडे माझ्याजवळ ये पाहू आणि घट्ट मिठी मार मला. आज फक्त तू आणि मी. दुसरं कुणीच नाही. virtual husband आहेस तू माझा. हक्क आहे माझा तुझ्यावर. तुझ्या मिठीत मी मला हरवून जाऊ दे. ( दोघे जवळ येतात. एकमेकांच्या मिठीत... दोघे समुद्र किनारी जाऊन बसतात.)

ती : आज जे काही तुझ्यासाठी होते ते सर्व मी तुला दिले आहे. आणि हेच काही क्षण माझ्याकडे यापुढे उरणार आहेत. तू मला विसरून नाही जाणार ना..?

तो : ये वेडी असे काय बोलते आहेस आज.

ती : काही नाही सहज. आपण प्रत्यक्षात कधीच भेटलो नाही रे पण तू कधी इतका जवळ आलास ते कळलंच नाही. कदाचित मीच तुझ्या खूप जवळ आले.

तो : अगं मग काय झालं. बायको आहेस तू माझी.

ती : परवा लग्न आहे माझं.

तो : काय...( समुद्राच्या लाटांचा आवाज. काळोख...

(दोघे online बोलत आहेत.)

ती : sorry , तुला इतक्या उशिरा सांगितलं.

तो : इट्स ओके. साखरपुडा कधी झाला..?

ती : लग्नाच्या दिवशीच आहे. सगळं इतक्या अचानक झालं कि तुला सांगूच शकले नाही.

तो : काही सांगायची गरज नाही. तू खुश आहेस ना...? चल येतो मी.

ती : निघालास सोडून मला. तुझं लग्न झालंय, हे ऐकून सुद्धा मी तुझ्याशी तशीच वागले. आणि तू मात्र निघालास लगेच.

तो : तसं नाही गं. म्हणजे माझ्यामुळे तुझ्या नव्या संसारात उगाच काही त्रास नको.

ती : तुझा कसला त्रास. तू तर खूप खूप प्रेम दिलंस मला. आणि जरी माझं लग्न झालं तरीही तू पण माझाच राहणार हा. पुढच्या जन्मी भेटायचं आहे आपल्याला खरे नवरा बायको म्हणून. एक स्माईल दे शोना. रागावलास का रे.

तो : नाही गं. काही नाही. तू दूर जाणार हि कल्पनाच सहन होत नाहीये.

ती : वेडा, अरे मी दूर कुठे चालली आहे तुझ्यापासून. अगदी तुझ्याजवळच आहे. तुझ्या कुशीत. आणि हो इतर कुणाशी online चाट नाही हा करायचं. online बायको आहे मी तुझी. कळलं ना...?

तो : चल येतो मी... ( तो लॉग आउट होतो.)
नेट का गेला अचानक...

तो : इच्छाच निघून गेली आता online यायची. तुझ्या संसारात माझी कशाला ढवळा ढवळ. पण तुझ्या भेटीला शब्दबद्ध करावंसं वाटायला लागलंय.

( फोन वाजतो.)

आवाज : नमस्कार साहेब. टेलिफोन एक्सचेंजमधून बोलतोय. तुमचा नेट सुरु झाला का साहेब..?

तो : सुरु झाला का म्हणजे...?

आवाज : अहो २ महिने काम सुरु होतं ना. आपल्या एरियातले सर्व सर्वर डाऊन होते . रोडचं काम पण सुरु आहे ना. माफ करा साहेब खूप त्रास झाला असेल तुम्हाला. आता मात्र सर्व काम पूर्ण झालं आहे. आता नाही त्रास होणार.

तो : हो नेटचा त्रास होता. मेल पण जात नव्हते गेले दोन महिने. पण याहू मात्र बरं चाललं होतं गेले काही दिवस.

आवाज : काय मजाक करताय साहेब. नेट नव्हता मग याहू वगैरे कसं काय चालेल. सगळंच बंद होतं ना.

तो : काय...? मग ती मृदुला....

आवाज : मृदुला....?

तो : नाही काही नाही. ठेवतो मी फोन. ( फोन ठेवतो.) नेट नाही मग आतापर्यंत जे काही चाललं होतं ते.. ते दिवास्वप्न होतं एका लेखकाचं. (स्वतःशीच हसत )

लेखकाचं आयुष्य म्हणजे फक्त कल्पनेचीच भरारी असते का...? ( पुन्हा background ला " स्वर पावसात भिजत आहे "गाणे वाजत आहे. गाण्याचा आवाज हळूहळू कमी होतो.)

आवाज : ह्या वर्षीच्या राज्य नाट्य परिषदेचे लेखनाचे पारितोषिक मिळत आहे. **" मैत्रीण "** ह्या नाटकाला.

(गाण्याचा आवाज हळूहळू वाढतो.)

# झिंदाबाद..



झिंदाबाद  ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद ...

( सारे फेर धरून नाचू लागतात.)

1 :   आम्ही झिंदाबाद

2 :   आमचा गाव झिंदाबाद

3 :   आमचं शहर झिंदाबाद

4 :   आमचं राज्य झिंदाबाद

5 :   आमचा देश झिंदाबाद

6 :   आमचं जग

सारे: ए...(सर्वजण ओरडतात )

1 :   आपल्या मातीत फक्त आपणच झिंदाबाद

2 :   हीच आपल्या मातीची शिकवण

3 :   हीच आपल्या मातीतल्या माणसांची शिकवण

4 :   हीच या मातीतल्या नेत्यांची शिकवण

5 :   म्हणूनच तर आमचे नेते झिंदाबाद

सारे: झिंदाबाद झिंदाबाद ........आमचे नेते झिंदाबाद

1 :   पाच रुपयाचे तांदूळ पन्नाशीला गेले

2 :   सत्तावीसचं पेट्रोल सत्तरीला गेले

3 :   दहाचे वीजबिल हजाराला गेले

4 :   हजाराची खोली लाखांवर गेली

5 :   लाखांची लोकसंख्या करोडोंवर गेली

6 :   करोडोंची जमीन नेत्यांकडे गेली

7 :   म्हणूनच तर आमचे नेते झिंदाबाद

सारे: (ओरडतात ) ये ..... शू .........

झिंदाबाद ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद

( सारे फेर धरून नाचू लागतात.)

राम्या :   गणप्या, आरं आज तुजा दिस सकाळ सकाळ उगाविला. का रं.. पहिल्या धारेची मारायला निघाला होता का तू?

गणप्या :   कसली मारतोयास पहिल्या धारेची. तू आज आला का मम्बैहून ? अरे दारूबंदी लागलेय गावात.

राम्या :   तेच्या मायला... कंधी रे लागली दारूबंदी ?

काश्या :   गेल्याच हफ्त्याला .

राम्या :   आरं पण आपल्या गावात बायका कुठे आहेत दारूबंदी लावायला ?

गणप्या : आख्या तालुक्याने आदेशच काढलाय. दारूबंदी लावायची. गुटखा बंदी लावायची. शेती पिकवायची आणि पोरगी जगवायची.

काश्या: ह्याला तर काहीच म्हायती न्हाही. बरेच दिस दिसला पण न्हाईस गावात.

राम्या : मी मामाकडे गेलो होता ना धा दिस. लगीन होतं मामाच्या पोराचं. मामा तिकडे लांब शहरात राहतो. आणि मला बोलला कि तू पण ये इथच राहायला. मग तुजा पण करूया लगीन.

काश्या : तुह्या मामाच्या पोराला पोरगी मिळाली ?

राम्या : व्हय तर.. पठ्यानं गावातलीच केली पोर.

गणप्या: तुह्या मामाच्या गावात पोरी हैत ?

राम्या : हैत नां रे बाप्प्या. खूप पोरी हैत. एका पेक्षा एक सरस.

गणप्या : मग तुहा मामा गावातलीच पोरगी का नाही पाठवीत तुह्यासाठी.

राम्या: आपल्या गावाचं नाव जरी कोणी ऐकलं ना तर रक्त खवळत तेंच. आपल्या गावात आपण असेच मरनार. आपल्या आई बापाची क्रिपा आहे ना आपल्या कपाळी. तेनी जगवल्या असत्या पोरी तर आपल्या गावात असे रंडके का फिरले असते बाप्पे लोक.

काश्या : म्हणजे आपलं लगीन कधीच नाय होनार ? आपल्या गावात कोण पोर नाय देणार ?

गणप्या : मग आपला गाव कसा वाढणार ?
आपला नाव कोण पुढे काढणार ?

( बाहेरून नारे ऐकू येऊ लागतात. )

सारे : पोरींची ओढ लागलीच पाहिजे
भृणहत्या हि थांबलीच पाहिजे...

मुलगी वाचवा, देश वाचवा
स्त्रीला इथे सन्मानाने जगवा....

देश मे आवाज भारी है
नर से उंची नारी है......

बाबू नको आता बाय पाहिजे
देश जागवायला, आय पाहिजे.....

( बसलेला ग्रुप उठून उभा राहतो. एक मावशी येते. गाणे...
**वसईच्या गाडीनं... भिगी भिगी चालीनं ... गावात तुमच्या आली... आली मुंबईची मावशी आली....** 2)

मावशी : ये पोरोहो... आस बटाटयावानी डोळं वटारून काय बघता, माझ्यासारखी चवळीची शेंग पाहिली नाय काय

सारे : नाय

मावशी : इश्य......आस नका ना बघू

सारे : आम्ही बघणार

मावशी : नका ना बघू

सारे : आम्ही बघणार

मावशी : नका ना बघू

सारे : आम्ही बघणार

मावशी : नका ना बघू

सारे : आम्ही बघणार

मावशी : का बघणार ? तुमच्या गावात आया बाया नायत काय ?

सारे : आया गेल्या आणि बाया नाय आल्या

मावशी : काय ?

सारे : आया गेल्या पण बाया नाय आल्या

मावशी : मंजे तुमच्या गावात आया नायत

सारे : नाय

मावशी : तुमच्या गावात बाया पन नायत

सारे : नाय

मावशी : काकी पन नाय

सारे : नाय

मावशी : मामी पन नाय

सारे : नाय

मावशी : बायको पन नाय

सारे  :    नाय

मावशी :   सोताची पन नाय

सारे  :    मावशे....

मावशी :   मग तुमच्या गावात हाय तरी कोन ?

( सारे दुखी होऊन खाली बसतात )

सारे :    आमच्या गावात हाय तरी कोन ? ( 2 )

1 : बापा नं मारली आमच्या भनीला

2 : काकानं मारली आमच्या भनीला

3 : आज्यानं मारली आमच्या भनीला

4 : आजीनं मारली आमच्या भनीला

5 : बाईनंच दाबला बाईचा गळा

6 : फुलायचा थांबला पोरींचा मळा

सारे : फुलायचा थांबला पोरींचा मळा ...... ( 2 )

1 : देवानं दिला मग गावाला श्राप

2 : भोगतोय आम्ही बापाचं पाप

3 : गावात नाय उरली एकही पोर

4 : उरले फक्त नालायक, हरामखोर

5 : गावाचा वंश आता कसा वाढणार

6 : सांग ना मावशे पोरी कुठून आननार ?

सारे : सांग ना मावशे पोरी कुठून आननार ......... (2 )

मावशी : (पुढे येत प्रेक्षकांना )

“ मुलगी वाचवा देश जागवा
स्त्रीला इथ सन्माननं वागवा ”

नाहीतर येत्या काळात माझ्यासारख्या प्रत्येक पुरुषाला असंच साडी नेसून मावशीच्या सोंगात यावं लागेल. आपण आपल्याच पोरीचा जीव घेतो. पोटच्या पोरीला पोटातच मारतो. का ती फक्त मुलगी आहे म्हणून ? मग आपल्याला जन्माला कुणी घातलं...न्हाहू..खाऊ...घालून कुणी वाढवलं ? ती पण कुणाचीतरी मुलगी होती. तिला पण मारलं असतं तर आपण...आपण कसे जन्माला आलो असतो...

पुरुषांचा आवाज सगळीकडे पसरतोय
आणि बायकांचा आकडा मात्र दिवसेंदिवस घसरतोय

म्हणूनच मित्रांनो...

शहाणे व्हा..विचार करा.
देशाला जागवा...
आणि स्त्री भृणहत्या इथेच थांबवा.

1. “पुरुषप्रधान पूर्वज आपले, वेड्यासारखे वागले
2. वंश्याच्या दिव्यासाठी , पोरी मारू लागले

3. पण उशिरा का होईना, नेते आमचे जागले
4. स्त्रीभृणहत्या थांबवायच्या कामाला लागले ”

झिंदाबाद ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद

( सारे फेर धरून नाचू लागतात.)

( गाडी येत असते. काही बेवडे येवून गाडी थांबवतात )

बे- 1 : ए... थांब फुकनीच्या टोळ नाका आलाय.

ड्रायवर : इथे कसला टोळ नाका ?

बे -2 : ‘माहित नाय तुला, बाहेर ये सांगतो ’

बे- 1 : ‘समोर दिसतंय तरी आंधळया सारखा वागतो ’

बे -2 : हा आमच्या गावाचा टोळ नाका हाय

ड्रायवर : अरे पण तुम्हाला इथ टोळ नाक्यासाठी परमिशन कुणी दिली ?

बे- 1 : आमच्या भोसरीच्या मामानं

सारे : ए......

बे-1 : पुणे भोसरीला आमचा मामा राहतो, परिवहन मंत्र्याचा पी ए हाय आमचा मामा , भोसरीचा मामा... (नाचू लागतात. )

भोसरीच्या मामाच्या जीवावर
भाच्यांची मज्ज्या....
चल पन्नास रुपये काढ.

ड्रायवर : पन्नास रुपये?

बे -2 : हे बघ याला कायबी नाय कळते,,,
ये येड्या..., जांभळाची पन्नासलाच मिळते.

ड्रायवर : काय?

बे- 1 : काय नाय पन्नासची पत्ती काढ.

ड्रायवर : पण पावती कुठेय?

बे -2 : कसली पावती?

ड्रायवर : वसुलीची पावती.

बे- 1 : कसली वसुली? कसली पावती? तुमच्या शहरात आम्ही येतो तेव्हा आम्ही विचारतो का की, कशाची वसुली करता? शहरात ब्रिज तुमच्यासाठी बांधता आणि बाहेरच्यांकडून टोळ वसूल करता.

बे -2 : ‘ ब्रिजवरून तुम्ही रोज रोज फिरणार आणि टोळ देता देता आम्ही रोज रोज मरणार.’

ड्रायवर : म्हणजे शहराच्या टोळनाक्याचा बदला तुम्ही गावागावात टोळनाके बांधून आमच्याकडून घेणार (हसतो. पुढे येतो.)
हसावं की रडावं हा एकच प्रश्न. आता प्रवासच करणं थांबवलं पाहिजे.

“ पेट्रोल, डिझेलन  कंबरड मोडतंय
आणि टोळनाक्यावर  मात्र राजकारण घडतंय ”

२० करोडचा खर्च करायचा आणि २०० करोडचा टक्स उडवायचा.
एकदा का  टोळनाका सुरु केला की घरजावई
असल्याप्रमाणे वर्षानुवर्ष तो वसुली प्वाइन्ट बनवायचा.

“केव्हातरी राजकारण करत टोळनाका तोडायचा
आणि आठवडाभरान टोळनाक्याचा मुद्दाच सोडायचा

आशा पल्लवीत झालेला सामान्य मग रडायच्याच बेतात
आणि  टोळनाक्याची सूत्र पुन्हा नेत्यांच्याच हातात ”

झिंदाबाद  ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद
( सारे फेर धरून नाचू लागतात.)

( **“ फड सांभाळ तुरयाला ग आला .....तुझ्या उसाला लागल कोल्हा.....”** या लावणीच्या गाण्यावर लावणी सुरु असते. एक शेतकऱ्यांचा ग्रुप येऊन लावणी थांबवतो )

शेतकरी 1: बाई, आमच्या बारा गावात हि लावणी नाही पाहिजे

बाई   :    अहो पण....

शेतकरी 2: पण नाय नि बिन नाय ...हि लावणी नाय म्हटलं कि

नायच

बाई : अहो पण, आमी कलाकार मंडळी , लावणीवर ठेका नाय धरला तर मग आमी जगायचं कस ? एकीकडे सरकार नेहमी आम्हा कलावंतांसाठी आश्वासन देतं, पण करत तर काय बी नाय. आन आता तुमी आमाला लावणी करायला बी रोकताय, ते डानस बार बंद झालेल्याला जमाना झाला, पण बारबाला शहरातल्या रोज रात्री पोलिसांच्या आनी नेतांच्या आशीर्वादाने जागवतायत आज पण , आनी आमी लोककलेचे मानकरी तुमच्या डोळ्यात खुपायला लागलोय होय.

शेतकरी3: बाई , बाई उगा गैर समज करून घेवू नका...आम्हाला पण आमच्या लोककलेचा आभिमान हाय, आमच्या इरोध तुमच्या लावणीला नाय

बाई : मंग

शेतकरी 4: तुमच्या लावणीच्या या गाण्यावर हाय...ह्या गाण्यातून आमचा मजाक उडवू नका

बाई : आहो ...अस कोड्यात कशापाई बोलता पावन, आमच्या लावणीला इरोध नाय पण आमच्या गाण्याला इरोध हाय ?

शेतकरी 1: आम्ही इथले उसाचे पिक काढणारे शेतकरी आनी आज आमच्या उसाला खरोखरच कोल्हा लागून राहिलाय.. नेत्यांच्या रुपात

शेतकरी 2: एक टाइम  असा होता कि वर्षातन  तीन टायमाला पिक काढून सुखात जगत होतो आम्ही .

शेतकरी 3: पण आज या नेत्यांनी कब्जाच करून टाकलाय आमच्या रोजी-रोटीवर

शेतकरी 4: अरे ह्यांना साखर कारखानेच चालवायचे होते तर मग सरकारी कारखानेच वाढवू शकत नव्हते  काय ?

शेतकरी 1: सरकारी कारखाने चांगले चालले असते तर मग ह्यांना मलई कुठून मिळाली असती, सरकारी कारखान गाडून गाडून टाकलाय ह्यांनी आनी स्वताच्या प्रायवेट कारखान्याची बरकत आमच्या उरावर पाय देवून कराया लागले

शेतकरी 2: म्हणून बाई आता आमी ठरवलंय या कोल्ह्यांच्या पेकाटातच लाथ  हाणायची, आमच्या उसाला कसा कोल्हा लागतोय ते बघूच

शाहीर : आता कस मर्दावानी बोललात पावनं.आह्रो गाणी बंद करून आंदोलन होत नसत्यात त्याच्यासाठी आवाज उठवायला पाहिजे , दुसऱ्याच फेकाट लाथ घालून मोडताना आपल्या लाथत पण तेवढीच ताकद असली पाहिजे. अरे जेव्हा आपण सगळे सामान्य एक होऊ ना, तेव्हा मग या मुठभर लोकांची हिम्मत होईल का आपला आवाज दाबायची , पण त्याच्यासाठी आपण सगळे एक झाले पाहिजे , अरे शाळेत मास्तर लहानपणापासून

शिकवितात  एकीत खूप भारी ताकद आहे , पण आपण सगळे नेहमी वेगवेगळेच आंदोलन करतो. वेगवेगळेच ह्या मुठभरांशी लढायला जातो. अरे कलाकार असो कि कष्टकरी..... या एकीनं ,आन घाला पेकाटात लाथ यांच्या. मग बघा राहते का महागाई , राहतो का यांचा कमवाकमविचा धंदा. अरे तुमीच बोट पकडायला देता ह्यांना म्हणूनच मग हात पकडून बसलेत सारे.

मीठ भाकरी खायची औकात नसलेल्या नेत्यांकडे आज हजारो कोटी आले कुठून, टी व्ही चैनलवाले नुसत्या बातम्याच करतात आनी मर्दगडी शेतकरी  आत्महत्या करतात. मर्द मराठ्याच्या भूमीत जन्म घेतलात मग असे नामर्दासारखे का वागता.

आता जाब विचारायची वेळ आलेय आसा आवाज काढा कि सगळेच सरळ झाले पाहिजेत. अरे एकटा शिवाजी चार दोस्तान बरोबर उभा राहतो. अन  दिल्लीतल्या बादशाहला पण या मातीतल पाणी पाजतो. तुम्ही तर सव्वाशे कोटी आहात. सव्वाशे लोक कसे तुमाला चालवतात ?

(तो पोवाडा बोलू लागतो )

काय झाली देशाची गती ,
फिरली बघा मती
पैसा झाला मोठा
माणूस झाला खोटा
फिरल्या बघा वाटा
दिसल्या आता नोटा..........रं ........जी ..जी .....॥ १ ॥

जेव्हा नोटा दिसायला लागतात तेव्हा मग देश, देशवासी  काय कामाचे, पैसाच मोठा होतो आनी सर्वसामान्य माणूस मग खोटा होतो.

एक होता सर्वसामान्य, घरी नसे धान्य
फिरे नोकरीसाठी ..
जगाच्यापाठी, भविष्यासाठी
पण नोकरी नसे ललाटी ......रं ......जी .......जी... ॥२ ॥

सर्सामान्याच्या लल्लाटी किती शिकला तरी चांगली नोकरी पडतच नाही .....

पण …

एक होता नेता, त्याचा होता बेटा
गुंडाचा सखा
नजर  वखा वखा
मस्ती त्याची बघा
देइल देशाला दगा
मिळणार मंत्रिपद त्याला ..... रं.....जी .....जी .....॥ 3॥

काय करायचं आहे शिक्षण. नेत्याच्या घरात जन्मला म्हणजे राजकारणचं बाळकडू घरातच मिळालं. देश चालवायला कशाला पाहिजे शिक्षण. बापाचा हात डोक्यावर आणि सगळया भ्रष्ठाचार्यांच्या छत्रछायेत वाढला. हेच खरे शिक्षण आणि हीच खरी देश सेवा.

मग सुरु देश सेवा , खावा कसा मेवा
भूमी कवडी किमतीला
रोज हुजरे दिमतीला
सलाम त्याच्या हिमतीला
उडे पैसा गमतीला
करा देशाच वाटोळ    रं .......जी .......जी .....  ॥ ४ ॥

बापाच्या पावलावर पाऊल टाकून मेवा खायची देशसेवा सुरु होते. जमिनी कवडीमोल किमतीला

घ्यायच्या आणि मग बिल्डरांच्या घशात टाकत खूप पैसा उभारायचा . सोबतच्या हुजरयांवर थोडेसे उडवले कि हिमतीला दाद देणारी भाऊगर्दी आपोआपच जमते. मंत्रीपदाची शपथ घेतात आणि या शपथेतली  प्रत्येक गोष्ट न पाळण्याचच ठरवतात. अरे मग कशाला घेता खोट्या शपथा. तुमच्या खोटारडेपणानेच देशाचे हे हाल झालेयत रे ......

मग वाढते महागाई , सोबत रोगराई
लुटीचा बोलबाला
सरकारी तिजोरीला
ग्रहण देशाला
काळ पेशाला
गेला सर्वसामान्य .... रं......जी ......जी .......... ॥ ५ ॥

कशानं वाढली महागाई ....? ह्यांनी जी लुटालूट सुरु केलेय. काल परवापर्यंत बसच्या तिकिटाला पैसे नसणारयाकडे आज एवढ्या गाड्या आल्या कुठून. खादी घालून  देशाची भाषण देणारे नेहमी विदेशी गाड्यातूंनच फिरतात आणि त्यांच्या   भ्रष्ठाचार्यांच्या वादळात गरीब मात्र फुकटच  मरतात. मर्द मराठ्याच जीणं विसरून

मराठा आज लाचार होऊ लागलाय. पुन्हा एकदा मर्द मराठ्याचं राज्य आलं पाहिजे.

मराठ्या सोड लाचारी , नजर तुझी भारी
रोख गनिमाला
काळ लाव त्याला
मार मुस्कटात
लाथ पेकाटात
भ्रष्टाचार्यांच्या........ रं .......जी ......जी ........
हो जी जी जी जी जी ......हो जी जी जी जी जी
हो जी जी जी जी जी.....हो जी जी रं...जी जी ...॥ ६ ॥

बोला भारतमाता की जय....
वंदे मातरम........
झिंदाबाद ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद ...
( सारे फेर धरून नाचू लागतात.)

( नेत्याचा जय जयकार करीत कार्यकर्ते येतात. नेता मतदार राजाकडे येतो. सोबत टी व्ही Chennel वाले देखील आहेत.)

सारे : हमारा नेता कैसा हो , राजाराम माने जैसा हो ......
अरे येऊन येऊन येणार कोण राजाराम माने
साहेबांशिवाय दुसरा कोण..

नेता : नमस्कार ...नमस्कार ....मी आपला नगरसेवक , गेली कित्तेक वर्ष मी इथला नगरसेवक आहे. तुम्हा मतदार राजाच्या कृपेमुळेच मला तुमची सेवा करण्याची संधी मिळत राहिली आहे. या वेळेला पण तुम्ही मलाच निवडून द्याल याची मला खात्री आहे. तुमचं मत आपल्यालाच आलं पाहिजे.

भोसले : भिक मागताय कि धमकी देताय ?

सारे : ए....( सारे ओरडतात नेता त्यांना शांत करतो)

भोसले : (हसून ) गेली कित्तेक वर्ष तुम्ही इथले नगरसेवक. तरीसुद्धा तुम्हाला स्वताची ओळख करून द्यावी लागते. बरोबर पाच वर्षांनी एकदा उगवताना तुम्ही, तुम्ही आज येणार हे माहिती असतं तर घराला तोरण बांधून, गुढी उभारून स्वागत केले असतं तुमचं , निवडून आल्यावर आमच्या विभागात दिवेच लावणार न तुम्ही ......

सारे : ए.... (सारे ओरडतात नेता त्यांना शांत करतो )

नेता : (हसत ) तुम्ही जे म्हणाल ते करू साहेब

भोसले : (हसत ) साहेब (पुन्हा हसतो ) कामा पुरता मामा. तसा मतापुरता साहेब. घराबाहेर चक्क मराठीत बोर्ड लावला हो मी वाचला नाही का आपण " फेरीवाले भिकारी आणि नेते यांना आत येण्यास सक्त मनाई आहे " म्हणून...

सारे : ए ......( सारे ओरडतात . नेता त्यांना शांत करतो )

नेता : ( हळू आवाजात ) सगळे मिडिया वाले कॅमेरा

ऑन करून आहेत. सगळयांना शांत बसायला सांगा ( हसत भोसलेना ) तुमचा आम्हा नेत्यांवरचा राग समजू शकतो, साहेब पण काय आहे ना, एकदा का आम्ही निवडून आलो ना कि वेळ फार कमी असतो हो आमच्याकडे. खूप खूप काम करायची असतात ना जनतेची कुणालातरी खुश करण्यासाठी कुणाचा तरी राग सहन करायाच लागतो आम्हा नेत्यांना

भोसले : माने साहेब, माझा एक मित्र नेहमी म्हणायचा प्रत्येक अभिनेत्यामध्ये एक नेता असतो आणि नेत्यामध्ये अभिनेता. अभिनेता रंगमंच्यावर अभिनय करतो आणि नेता प्रत्यक्ष जीवनात अभिनयाची चीटूर मिटूर पारितोषिक अभिनेत्याला मिळतात.पण मस्त मलई खाऊन जातो तो फक्त नेताच. लग्नाच्या पंक्तीत जेवायला बसल्यावर प्रत्येकाच्या ताटात तेच जेवण असतं हो, पण आपलं लक्ष मात्र दुसरयाच्या ताटातच घुटमळत असत. हाच असतो प्रत्येक माणसाचा स्वभाव. दुसरयाची प्रत्येक गोष्ट आवडते आपल्याला आणि आपल्या नेत्यांनी तर पी एच डी केलेली असते हावरटपणात.

सारे : ए ....( सारे ओरडतात )

भोसले : ए .... तुमच्यापेक्ष्या खडा आवाज आहे माझा. सामन्याचा आवाज समजून दाबायला बघू नका. नाहीतर मग असामान्य क्रांती होईल. शिवाजी राज्यांना पण सामान्य समजायचीच चूक केली होती त्या अफजलखानाने आणि मग त्या खानाचा कोथळाच काढून टाकला होता आमच्या सह्याद्रीच्या वाघानं .

ए चाफेकर, इकडे पुढे ए पाहू जरा मघापासून बेंबीच्या देठापासनं ओरडतोयस. पोरीचं ॲडमिशन झालं का रे तुझ्या ?

( तो मानेने नाही म्हणतो ) का रे ? तुझ्या या असामान्य नेत्याने नाही मदत केली का तुझी ? त्या रसिकलालच्या पोराला चाळीस टक्के भेटले होते. तुझ्या साहेबांना विचार त्याच ॲडमिशन कसं केलं त्यांनी ?पाच लाखांसाठी चाळीस टक्के वाल्यालाच ॲडमिशन होऊ शकत. तुझ्या पोरीला पासष्ट टक्के होते ना रे ? तुलापण हे सगळं कुभांड माहितेय ना ? पण तू तर खंदा आणि कट्टर कार्यकर्ता साहेबांचा ? " त्याग करायला शिका " हि थोरामोठ्यांची शिकवण कार्यकर्त्यांनी पाळलीच पाहिजे. " जो कार्य करता करता मरतो , तोच खरा कार्यकर्ता. आणि जो ह्या मरयांच्या जीवावर जगतो तोच आमचा नेता "

चाफेकर, निदान आडनावाचा तरी अभिमान बाळग. इतिहासात अजरामर आहे हे नाव. कशाला बट्टा लावतोयस त्या पवित्र  नावाला.  जगण्यासाठी नाव लावू नका रे ...नावासाठी जागा जरा.

ए वाघमारे, इकडे  ये नावात वाघ आहे तुझ्या. मग अशी कुत्र्यासारखी ढुंगणात शेपूट घालून का जगतोस. परवाच्या  बंदमध्ये पराक्रम पहिला तुझा. काय दिमाखात बस फोडत होतास  सगळया. आमच्या शेजारी

सासरा राहतो ना तुझा. त्याची गाडी नाही फोडलीस.
तुझ्या तीर्थरूपांनी विकत घेतली होती का रे ती बस.
आता नुकसान खर्च पुन्हा गरिबांच्या खिशातून.
माझ्यापण आणि तुझ्यापण.
महागाई वाढवायला आपणचं  कारणीभूत आहोत, मग खापर कशाला फोडायचं नेत्यांच्या नावान. कधी मोठ्या नेत्याला पाहिलंय बस जाळताना, तोडफोड करताना, त्यांनी फक्त आदेश करायचे आणि मम... म्हणत आपण कार्य सिद्धीस न्यायचे.

(प्रेक्षकांना )

पंधरा वर्ष आर्मी मध्ये काढली.

आम्ही दोस्त आणि दुश्मन डोळयानीच तोलतो.
मराठ्याची अवलाद आहे , गद्दाराला हातानीच सोलतो.....

आर्मी मध्ये शिस्त आणि देशाभिमान शिकवला जातो आम्हाला आता हीच शिस्त या देशाला लावायला पाहिजे. हे आमचे नेते ह्यांच्यासाठी आम्ही आमच्या बेंबीच्या देठापासून ओरडतो. आमचे नेते झिंदाबाद.. , पण हे नेते आज खरच झिंदाबाद आहेत ? आपले सगळेच नेते वाईट नाहीत हो , माणूस केव्हाच वाईट नसतो, वाईट असते ती प्रवृत्ती. आजही बरेच नेते स्वताचा नाही

तर आपल्या समाजाचा, आपल्या विभागाचा, आपल्या
राज्याचा, आपल्या देशाचा विचार करतात.

काही बिचारे आदेशांवर कळसूत्री बाहुल्याप्रमाणे
नाचतात.
आणि काही स्वार्थापोटी भ्रष्टाचाऱ्यांचे पाढेच
वाचतात.....

महागाईच्या नावाखाली आंदोलन करायचं
आणि रोजगारावर जगणारयाला उपाशीच मारायचं....

बंद च्या नावाखाली जाळपोळ करायची
गाढवांनो आशानेच तर महागाई वाढवायची...

गरीब गिरणी कामगारांसाठी सरकार लॉटरी योजना
काढते
आणि बांगलादेशीय बांधवांसाठी लिमिट पाच पाच
वर्षांनी वाढते ..

कोळीवाड्यातील गरिबांना अनधिकृतचा कायदा नडतो
पण मंत्र्यांच्या बंगल्यावर करोडोचा धूरळा उडतो...

पक्षांची कार्यालये वाचवायला सगळेच धावतात नेते

आणि गरिबांची घर तोडायला पालिका परमिशन पण देते...

भृणहत्या भृणहत्या करीत आपण रोज फोडतो टाहो
पण रोज रोज मरणाऱ्याला कुणी पाहायला तरी याहो..

नॉलेजमध्ये कंपाउंडर डॉक्टरपेक्षा असतो सरस
मग देश चालवणारयाना शिक्षणाची काय गरज..

पदवी नसल्यान कंपाउंडरला कुणी डॉक्टर नाही म्हणत
राज्यशास्त्राची  गरजच काय, देश चाललाय ना कण्हत...

लोकशाहीपेक्षा मोठा इथं घराणेशाहीचा सुळका
देशाच्या भवितव्याचा फक्त नेतेपुत्रानाच पुळका...

नेत्यांचीच मुल फक्त देश चालवू शकतात
कारण बाकी कार्यकर्ते फक्त हुजर्यांसारखेच वागतात....

कवडीमोल भावात नेता आपल्या बिल्डरमित्रासाठी जागा पाहतो
आणि चोवीस तास घासणारा पोलीस संडासाएवढ्या घरात राहतो...

खड्डे आणि कचरयाने बकाळ दिसायला लागलंय राज्य
पण लोकांच्या विरंगुळयासाठी बगीचे ,स्विमिंग पूल
झालेत सज्ज..

विदर्भातला शेतकरी रोज पाण्यासाठी रडतोय
आणि आम्ही मात्र पाणी रस्ते धुवायला सोडतोय…

शंभर वर्षे जुनी घर बेकायदा म्हणून तोडतोय
पण आदर्शसारख्या घोटाळेबहाद्दरांना मोठा सन्मानानं
सोडतोय

भ्रष्टाचाराची बोटं जेव्हा नेत्यांकडे वळतात
मंत्रालयातल्या फाईली दोन दोन दिवस जळतात...

याच आमच्या नेत्यांचा गौरव करणार आम्ही
यांच्यामुळेच महागाईत, होरपळणार बघा तुम्ही...

आता नका ओरडू मेरा भारत महान
स्वार्थाने पेटलेल्या मुठभरांनी टाकला त्याला गहाण...

बास झालं आता
आता सहन नाही करणार...

अभिमानान जगण्यासाठी
आता फक्त  बेईमानच मरणार ...

खात्री आहे आम्हाला
येईल सुवर्णकाळ आता ...

तयार होईल तुमच्यातूनच
आमच्या जीवाभावाचा  नेता ...........

झिंदाबाद ...... झिंदाबाद ......

( सारे फेर धरून नाचू लागतात. जणू काही कुणाच्या
तरी स्वागताची तयारी करताहेत )

**झिंदाबाद  ! झिंदाबाद! आमचे नेते झिंदाबाद ...**

( सारे फेर धरून नाचू लागतात.)

# अर्पणपत्रिका

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणार्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणार्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस
सदर पुस्तक
समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.
मुंबई.